CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
चेन्नई सुपरकिंग्ज वि. कोलकाता नाईट रायडर्स
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : चिदंबरम स्टेडियम, चेन्नई

सोलापूर | शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १५३ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाची शाखा ही केवळ खेळ खेळण्याचे किंवा व्यायाम करण्याचे ठिकाण नाही, तर ती सज्जनांच्या सुरक्षेचे एक अव्यक्त अभिवचन आहे, तरुणांना अनिष्ट व्यसनांपासून मुक्त ठेवणारे संस्कारपीठ आहे, समाजावर अचानक येणाऱ्या आपत्ती किंवा संकटात त्वरित, निरपेक्ष मदत मिळण्याचे आशेचे केंद्र आहे, महिलांना निर्भयता आणि सुसंस्कृत वर्तनाचे आश्वासन आहे, दुष्ट आणि राष्ट्रविरोधी शक्तींवर आपला वचक निर्माण करणारी शक्ती आहे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट, संघ म्हणजे, समाज जीवनाच्या विविध क्षेत्रांत चारित्र्यवान कार्यकर्ते उपलब्ध करण्यासाठी योग्य प्रशिक्षण प्रदान करणारे विद्यापीठ आहे.

**- बाळासाहेब देवरस,**
रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

# मुलींचा मृत्यू; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचे पालकमंत्र्यांचे आदेश

- **त्या झोपडपट्टीत तातडीचा मदत कक्ष उभारण्यात येणार**
- **म्हेत्रे परिवारास मुख्यमंत्री निधीतून पाच लाख तर पालकमंत्री गोरे देणार स्वत:तर्फे एक लाख**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

बाबू जगजीवनराम झोपडपट्टीतील मृत पावलेल्या ममता अशोक म्हेत्रे, जिया महादेव म्हेत्रे यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री निधीतून प्रत्येकी पाच लाख तर वैयक्तिक एक लाख रुपये मदत देणार आहोत. या झोपडपट्टीत तातडीचा मदत कक्ष उभारण्यात येणार आहे.याप्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी गुरुवारी सोलापुरात दिली.

पालकमंत्री जयकुमार गोरे हे गुरुवारी सायंकाळी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत जाऊन दोन्ही म्हेत्रे कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांच्यासमवेत आमदार देवेंद्र कोठे, शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. ज्योती वाघमारे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे उपस्थित होते.या भेटीनंतर पालकमंत्र्यांनी महापालिकेत येऊन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या समवेत बैठक घेतली. यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे,पोलीस आयुक्त एम. राजकुमार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्या राज्य प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे, माजी नगरसेवक अनंत जाधव आदी उपस्थित होते. महापालिकेतील बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत झालेली घटना ही अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेसंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांना कळविल्यावर मुख्यमंत्र्यांनी प्रत्येकी पाच लाख रुपये देण्यासंदर्भातील निर्णय मला एसएमएसद्वारे कळविले आहे. या मदतीसंदर्भातील प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडून शासनाकडे



पाठविला जाणार आहे. या दोन्ही मुलींचा मृत्यू डेंग्यूने झाला नसून अंतिम निष्कर्ष अद्याप निघणे बाकी आहे. लवकरच वैद्यकीय अहवाल आल्यावर या संदर्भातील स्पष्टता समोर येणार आहे. झालेल्या घटनेच्या मुळाशी जावे लागणार आहे. या झोपडपट्टीत तातडीचा मदत कक्ष उभारण्यात येणार असून यामध्ये आरोग्य, महापालिका व पोलीस खात्याचे अधिकारी राहतील. या भागात लवकरच कायमस्वरूपी दवाखाना उभारण्यात येणार आहे. जगजीवनराम झोपडपट्टीत गटारीतून जलवाहिनी गेल्याने दुर्दैवी घटना घडली. या गटारीतून जलवाहिनी बाहेर काढण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश आपण जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. शहराच्या अन्य भागात गटारीतून जलवाहिनी गेली असेल तर या संदर्भात सर्वे करून आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### ▸ गटाराच्या पाण्यातून गेलेल्या जलवाहिनी वेगळे करण्यासाठी दोन कोटी

बाबू जगजीवनराम झोपडपट्टीतील घटनेनंतर मुळाशी जाण्याचा प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. काहीही लपवले जाणार नाही तरच पुढील उपाय करणे सोपे होणार आहे. दरम्यान, महापालिका आयुक्तांनी सर्वेक्षण केल्यानंतर शहरातील काही झोपडपट्ट्यांमध्ये गटाराच्या पाण्यातून पिण्याच्या पाईपलाईन गेले असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा जलवाहिनी वेगळ्या करण्यासाठी साधारणतः दोन कोटीचा निधी आवश्यक आहे असे आयुक्तांनी सांगितले आहे. यामुळे हा निधी तत्काळ देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असल्याचेही यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले.

### ▸ कारागृहातील पाणीटंचाई; उपाययोजना करण्याचे आदेश

शहरातील अंतर्गत जलवाहिनी बदलण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ८९२ कोटींचा निधी मंजूर केला असून यातील शंभर कोटींचा पहिला हप्ता लवकरच दिला जाणार आहे. जिल्हा कारागृहातील पाणीटंचाईची समस्या अतिशय गंभीर बाब असून यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश आपण महापालिका प्रशासनाला दिले आहेत, असेही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## विनम्र अभिवादन



थोर समाजसुधारक आणि महिलांच्या शिक्षणासाठी आग्रही असणारे महात्मा जोतिबा फुले यांची आज जयंती

# आता तहव्वूर राणाचा हिशेब!

● १७ वर्षांची प्रतीक्षा संपली ● पाकिस्तानी लष्कर, आयएसआयचा बुरखा फाटणार

◆ **नवी दिल्ली, १० एप्रिल**

**११ नोव्हेंबर २००८ मधील मुंबई हल्ल्यातील कटकर्त्यांपैकी एक तहव्वूर राणाला न्यायालयासमोर खेचण्याची प्रतीक्षा १७ वर्षांनी गुरुवारी संपली. मुंबई हल्ल्याच्या प्रमुख कटकर्त्यांपैकी एक असलेला तहव्वूर राणा गुरुवारी रात्री दिल्लीत पोहोचला. एनआयए आणि रॉच्या अधिकाऱ्यांचे विशेष पथक त्याला घेऊन आले. न्यायालयाने त्याला एनआयएच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. त्याच्या प्रत्यार्पणासाठी भारताने दीर्घकालीन कायदेशीर लढा दिला. तहव्वूर राणा भारतात येताच धाबे दणाणलेल्या पाकिस्तानने त्याच्याशी कोणताही संबंध नसल्याचा कांगावा सुरू केला.**

तहव्वूर राणाला घेऊन येणारे विशेष गल्फस्ट्रीम जी-५५० विमान सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास दिल्लीतील पालम विमानतळावर उतरले. त्यानंतर राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने वैद्यकीय तपासणी करीत त्याच्या अटकेची प्रक्रिया औपचारिकपणे पार पाडली.

पालम तांत्रिक विमानतळावर पोहोचताच एनआयएने त्याच्या प्रत्यार्पण व अटकेला दुजोरा दिली. एनआयएच्या पथकाने विमानतळावर आवश्यक ते सर्व कायदेशीर सोपस्कार पार पाडल्यानंतर तहव्वूर राणाला अटक केली, असे एनआयएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

कोणताही धोका न पत्करता केंद्र सरकारने विमानतळावर बुलेटप्रुफ ताफा आणि सशस्त्र कमांडो तैनात केले होते. यूएसडीओजे, यूएस स्काय मार्शलच्या सक्रिय मदतीने एनआयएने संपूर्ण प्रत्यार्पण प्रक्रियेत इतर भारतीय गुप्तचर संस्था व एनएसजीने संयुक्तपणे काम केले. त्याचे प्रत्यार्पण यशस्वी करण्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि केंद्रीय गृह मंत्रालयाने अमेरिकेतील इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत समन्वय ठेवला होता, असे एनआयएने निवेदनात म्हटले आहे.



राणाला बिर्याणी देऊ नये म्हणजे झालं ▶ वृत्त पान ३

### असे आणले भारतात

तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणासाठी राबवण्यात आलेले ऑपरेशन अतिशय गंभीर व महत्त्वपूर्ण होते. या मोहिमेसाठी ऑस्ट्रियाच्या व्हिएन्नातील चार्टर सर्व्हिसकडून गल्फस्ट्रीम जी-५५० विमान भाड्याने घेण्यात आले होते. या जेट विमानाने बुधवारी सकाळी पावणेबारा वाजता मियामी फ्लोरिडा येथून राणाला घेत उड्डाण केले. बुधवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास ते रोमानियाच्या बुखारेस्ट येथे पोहोचले. बुखारेस्ट येथे जवळपास ११ तासांचा थांबा घेण्यात आला. त्यानंतर गुरुवारी सकाळी पावणेनऊ वाजता विमानाने बुखारेस्टमधून उड्डाण केले आणि सायंकाळी ६.३० वाजता दिल्लीत उतरले.

फेब्रुवारीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचा दौरा केला, तेव्हा राणाच्या प्रत्यार्पणाची घोषणा करण्यात आली होती. आम्ही एका अतिशय हिंसक माणसाला भारतात न्याय मिळवून देण्यासाठी तत्काळ पाठवत आहोत, असे १४ फेब्रुवारी रोजी संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करताना डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले होते. ◂(वृत्तसंस्था)

### एनआयएच्या विशेष न्यायालयात चालणार खटला

तहव्वूर राणाच्या विरोधात एनआयएच्या विशेष न्यायालयात खटला चालवला जाणार आहे. या प्रकरणाची सुनावणी दिल्लीतच होणार आहे. त्याला मुंबईत पाठवले जाणार नाही. वरिष्ठ विधिज्ञ दयान कृष्णन् या प्रकरणात सरकारची बाजू मांडतील. कायदेशीर कारवाईचे नेतृत्व करण्यासाठी वरिष्ठ सरकारी वकील नरेंदर पाल त्यांच्यासोबत सहभागी होतील.

### तिहारचा 'पाहुणचार'

तहव्वूर राणाला तिहारचा पाहुणचार मिळणार असून, त्याला या तुरुंगातील उच्च सुरक्षा असलेल्या वॉर्डात ठेवले जाणार आहे, अशी माहिती तुरुंगातील सूत्रांनी दिली. त्याला सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली आहे. तहव्वूर राणा मुंबई हल्ल्याच्या कटकर्त्यांपैकी एक आहे. प्रत्यार्पण रोखण्यासाठी त्याने शेवटचा प्रयत्न म्हणून दाखल केलेली याचिका अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्याला प्रत्यार्पण करून भारतात आणले गेले. विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेले पथक त्याला आणण्यासाठी अमेरिकेत गेले होते.

### पाकिस्तानी सैन्यात होता डॉक्टर

६४ वर्षीय तहव्वूर हुसेन राणा हा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक आहे. तहव्वूर हुसेन हे पाकिस्तानी सैन्यात डॉक्टर म्हणून काम करत होते.

### सुशीलकुमार शिंदेंनी केले स्वागत



मुंबई हल्ल्यातील आरोपी अजमल कसाबला २०१२ मध्ये फाशी झाली तेव्हा शिंदे केंद्रीय गृहमंत्री होते. गुन्हेगार असलेल्या राणाला भारतात आणणे चांगली गोष्ट आहे, असे सुशीलकुमार शिंदे म्हणाले.

**तहव्वूर राणाशी आमचा संबंध नाही; पाकिस्तानचे स्पष्टीकरण** : मुंबई दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख आरोपी तहव्वूर राणा पाकिस्तानी नव्हे, तर कॅनडाचा नागरिक आहे, त्याच्याशी आमचा कुठलाही संबंध नसल्याची भूमिका पाकिस्तानने घेतली. राणा भारतात पोहोचताच पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाने निवेदन जारी केले.

# आम्ही शांत बसणार नाही, किंमत चुकवावी लागणार

**अमेरिकेला खुली धमकी; १२५ टक्के व्यापार शुल्काने चीनचा तिळपापड**

◆ **बीजिंग, १० एप्रिल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर १२५ टक्के आयात शुल्क लादले तर चीन वगळता बहुसंख्य देशांवरील शुल्काला ९० दिवसांची स्थगिती दिली. चीनने प्रत्युत्तरात अमेरिकेवर आयात शुल्कात वाढ करून ते ८४ टक्क्यापर्यंत केले, तसेच लादलेल्या शुल्काविरोधात शांत बसणार नसल्याचा इशारा देत अमेरिकेला किंमत चुकवावी लागेल, अशी धमकी दिली.



चीनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, अमेरिकेच्या मनमानी कृतीविरुद्ध चीन गप्प बसणार नाही, आयात शुल्काचा निर्णय संपूर्ण जगाविरोधात असून जागतिक व्यापार नियमांचे उल्लंघन करणारा आहे. यामुळे व्यापारी व्यवस्था कोलमडणार आहे आणि याचा संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होईल. या निर्णयावर अमेरिका कधीही इतर देशांचा पाठिंबा मिळवू शकणार नाही. आम्ही गप्प बसणार नाही आणि चीनी नागरिकांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही. आम्ही चिनी आहोत आणि आम्हाला चिथावणीची भीती वाटत नाही. अमेरिकेला याची किंमत चुकवावी लागणार आहे, आता लढा सुरू ठेवायचा की संपवायचा हे त्यांच्यावर अवलंबून आहे. व्यापार युद्ध कितीही काळ चालले तरी आपण झुकणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

### व्यापार युद्ध भडकविणे भोवणार : स्कॉट बेसेंट



अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी सांगितले की, ज्या देशांनी अमेरिकेविरोधात संघर्ष करण्याचा पवित्रा घेतला नाही त्यांच्याविरोधातील वाढीव आयात शुल्काला स्थगिती दिली आहे. मात्र व्यापार युद्धाचा पवित्रा घेणाऱ्या देशांविरोधात आयात शुल्कात कायम राहणार आहे. ज्या देशांना आमच्याबरोबर आयातशुल्क कमी करण्यासाठी वाटाघाटी करायच्या आहेत, त्यांचे आम्ही स्वागत करतो. आम्हाला त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायचे आहे.

### प्रत्युत्तरात्मक कारवाई सहन करणार नाही



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले, जगातील ७५ देशांनी आमच्यासोबत चर्चा सुरू केल्याने आम्ही त्यांच्यावर लावलेल्या व्यापार शुल्काला ९० दिवसांसाठी स्थगिती दिली आहे. प्रत्युत्तरात्मक कारवाई करणाऱ्या चीनवर आम्ही १२५ टक्के व्यापारी शुल्क आकारणार आहोत. प्रत्युत्तरात्मक कारवाई आम्ही सहन करणार नाही. मी आधीच सांगितले होते, की जो देश प्रत्युत्तर म्हणून शुल्क लादतील त्याच्यावर मी दुप्पट शुल्क लागू करेन. चीनने प्रत्युत्तरादाखल शुल्क लादल्याने त्यांच्यावर अतिरिक्त शुल्क लादण्यात आले.

## 'वक्फ'ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर बुधवारी सुनावणी

**नवी दिल्ली** : वक्फ सुधारित कायदा-२०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देत एमआयएमचे प्रमुख असदुद्दिन ओवैसी यांनी दाखल केलेल्या याचिकेसह एकूण १० याचिकांवर सरन्यायाधीश संजीव खन्ना प्रमुख असलेले न्यायासन बुधवारी सुनावणी करणार आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. के. व्ही. विश्वनाथन् यांचा समावेश असलेले न्यायासन या याचिकांवर सुनावणी करणार आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर म्हटले आहे. ओवैसी यांच्या याचिकेव्यतिरिक्त आपचे नेते अमानतुल्ला खान, असोसिएशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईट्सचे अर्शद मदानी, समस्त केरळ जमियातुल उलेमा, अंजुम कादरी आदी नेत्यांनी याचिका दाखल केल्या आहेत.

## अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी मिलिंद जोशी

**पुणे** : अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष पदी प्रा. मिलिंद जोशी यांची निवड करण्यात आली आहे.



प्रा. मिलिंद जोशी हे प्रसिद्ध लेखक आणि वक्ते आहेत. तर सुनीताराजे पवार महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह पदाची जबाबदारी सांभाळतील. महामंडळाच्या कोशाध्यक्षपदाची जबाबदारी विनोद कुलकर्णी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे या नव्या पदाधिकाऱ्यांना ९९ वे, १०० वे आणि १०१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाचा मान मिळणार आहे. प्रचंड जनसंपर्क, अफाट व्यासंग, शैलीदार लेखन, अमोघ वक्तृत्व, कुशल प्रशासन आणि सकारात्मक साहित्यकारण यामुळे प्रसिद्ध लेखक आणि वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांचे नाव महाराष्ट्राला सुपरिचित आहेत.

## प्रशांत कोरटकरला जामीन

**कोल्हापूर** : इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी तथा छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक भाष्य केल्याप्रकरणी गत महिन्याभरापासून तुरुंगात असणाऱ्या प्रशांत कोरटकरला अखेर जामीन मंजूर करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने त्याला हा दिलासा दिला आहे. मात्र, न्यायालयातील प्रक्रिया पूर्ण न झाल्याने कारागृहाला जामीनाची कागदपत्रेच मिळाली नाही. त्यामुळे प्रशांत कोरटकरचा आजचा कारागृहातील मुक्काम वाढला आहे. आता तो उद्या बाहेर पडेल.

# एफबी म्हणजे 'फुकटचा बाबूराव'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १० एप्रिल-**


एफबी म्हणजे फुकटचा बाबूराव, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा माजी मुख्यमंत्री उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे. सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे उद्घाटन झाले, या प्रसंगी भाषण करताना एकनाथ शिंदे यांनी जोरदार टोलेबाजी केली आहे. तसेच मी पण एफबी म्हणजे 'फेव्हरेट भाऊ', असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

**एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला; फेसबुक लाइव्ह करून पसरवले फेक नरेटीव्ह**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, खुर्च्या बदलल्या तरी दिल बदलले नाही. लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. आम्ही जे बोललो ते सर्व देणार आहोत. फक्त थोडी थोडी परिस्थिती सुधारू द्या. कर्जमाफी असो किंवा काहीह घोषणा, त्या टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. तसेच आम्ही प्रिंटिंग मिस्टेक म्हणणार नाही, असेही शिंदे म्हणाले. पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे. ते म्हणाले, त्यांनी फेसबुक लाइव्ह करून फेक नरेटीव्ह पसरवले. ते एफबी म्हणजे फुकटचा बाबुराव आहेत. मी सुद्धा एफबी म्हणजे फेवरेट भाऊ आहे, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा टोला लगावला आहे.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# व्यापारी वर्गातून जुबेर बागवान दावेदार; बिलाल बागवानचेही आव्हान

## सोलापूर बाजार समिती निवडणूक होणार चुरशीची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

शेतीमालांच्या विक्रमी उलाढालीत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक यंदाही चांगलीच चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. अर्ज माघारीसाठी आणखी सात दिवस शिल्लक आहेत. सर्वच मतदारसंघांतील इच्छुकांनी आपले देव पाण्यात ठेवले असून विजयी होण्याची क्षमता असलेल्या पॅनलमधून उमेदवारी मिळविण्यासाठी आपापल्या गॉडफादरमार्फत प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

दरम्यान यंदाच्या बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आजवरच्या इतिहासात सर्वाधिक संख्येने अर्ज दाखल झाले आहेत. बाजार समितीच्या निवडणुकीत सोसायटी मतदारसंघातून ११, ग्राम पंचायत मतदारसंघातून ४, व्यापारी प्रतिनिधी म्हणून २ तर हमाल तोलारम धून १ असे १८ संचालक निवडून दिले जातात. अन्य मतदारसंघांप्रमाणेच व्यापारी मतदारसंघातील दोन जागांसाठीही व्यापाऱ्यांमध्ये रस्सीखेच दिसून येत आहे. व्यापारी मतदारसंघातील दोन जागांसाठी भुसार अडत व्यापाऱ्यांमधून एक व कस्तुरबा मार्केट आणि राणी लक्ष्मीबाई मार्केट यापैकी एकाला संधी देण्याची आजवरची परंपरा आहे. गतवर्षी कस्तुरबा मार्केटमधून केदारनाथ उंबरजे यांना संधी मिळाली होती. त्यामुळे यंदा अपेक्षेप्रमाणे राणी लक्ष्मीबाई मार्केटला संधी मिळणार आहे. यावेळी येथून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान हे प्रबळ दावेदार आहेत. इतरांप्रमाणे बागवान यांनीही बाजार समितीच्या राजकीय आखाड्यात दंड थोपटले आहेत.

व्यापाऱ्यांमध्ये संचालकपदासाठी राजकारण होत नाही. व्यापारी संघटना जे नाव ठरवेल ते अंतिम असते. येथे राजकीय समीकरणांचा विचार झाला तर बागवान यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे व्यापारी व अडते यांच्या समस्यांसाठी धावून येणारा व वेळ देणारा युवा चेहरा म्हणून बागवान यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे व्यापाऱ्यांचेही त्यांच्या नावावर एकमत झाल्याची चर्चा आहे. व्यापारी मतदारसंघात ३६ उमेदवारांचे अर्ज असून यात भुसार अडत व्यापारी १०, राणी लक्ष्मीबाई मार्केट १४ आणि कस्तुरबा मार्केट १२ उमेदवारांचा समावेश आहे. व्यापाऱ्यांतून यंदा राणी लक्ष्मीबाई मार्केटला संधी असल्याने येथून जुबेर बागवान यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. नियोजन समितीतही विविध प्रश्न मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. याशिवाय अलीकडेच त्यांन बागवान जमियत संघटना स्थापन करून त्या माध्यमातून गोरगरीब व वंचितांसाठ मदतीचा हात पुढे ठेवला आहे.

### बिलाल बागवान (यू.जी.) यांचे असणार आव्हान

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये व्यापारी वर्गातून राणी लक्ष्मीबाई मार्केटमधील व्यापारी जुबेर बागवान प्रमुख दावेदार मानले जात असले तरी त्यांच्यासमोर बिलाल बागवान (यू.जी) यांचे आव्हान असणार आहे. त्यांचे नाव देखील यासाठी समोर येत आहे. राणी लक्ष्मीबाई मार्केट मधील एकूण १३ व्यापाऱ्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामधील एका व्यापाऱ्याच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. सध्याचे जुबेर बागवान आणि बिलाल बागवान यांच्या नावात चुरस निर्माण झाली आहे. संघटना आपल्या बैठकीत जे नाव निश्चित करतील त्या नावावर व्यापारी मतदारसंघातून शिक्कामोर्तब केला जातो. त्यामुळे इतर व्यापाऱ्यांनी संघटनेचे नेतृत्व मान्य करत त्या नावालाच पाठिंबा देत असतात.

जुबेर बागवान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत कार्यरत आहेत. युवक अध्यक्ष तसेच आता शहर कार्याध्यक्ष पदावरील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. मार्केट यार्डात व्यापाऱ्यांमध्येही ते लोकप्रिय आहेत. कोरोनासारख्या महामारीच्या काळामध्ये लॉकडाउन असताना मार्केट यार्डातील माथाडी कामगारांना तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाठपुरावा करून प्रत्येकी ३ हजार रुपये मिळवून दिले होते. नियोजन समितीतही विविध प्रश्न मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. याशिवाय अलीकडेच त्यांन बागवान जमियत संघटना स्थापन करून त्या माध्यमातून गोरगरीब व वंचितांसाठ मदतीचा हात पुढे ठेवला आहे.

### बाजार समितीवर काम करण्याची संधी मिळाली तर पदाला नक्कीच न्याय देईन

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणूक व्यापारी वर्गातून निवडणुकीला सामोरे जाण्याचे ठरवले आहे. यंदा राणी लक्ष्मीबाई मार्केटला उमेदवार देण्याची संधी आहे. संघटनेने जर उमेदवारी देण्याची जाहीर केले. तर मार्केट कमिटीवर काम करण्याची संधी मिळेल. त्या संधीचे नक्कीच सोने करून व्यापाऱ्यांच्या तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना राज्यस्तरावर वाचा फोडून त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न राहील.

**- जुबेर बागवान, व्यापारी**

---

## महत्त्वाचे...



### जिल्हा परिषद शाळा एसआरपी कॅम्पमधील विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एस आर पी कॅम्प मध्ये इयत्ता सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १० चे समादेशक सहाय्यक महेश मते यांच्या अध्यक्षतेखाली व शेडमाळे, कोरे, म्हेत्रे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रियांका माळी यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला. सागर लिंबितोटे, गायत्री काळुंके, प्रज्ञा जमादार, मानव चव्हाण, प्रीती खांडेकर, नंदिनी बंडगर, जेनिफर बद्दीपुडी या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. श्रीशैल समदुर्ले यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांना कंपास व शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. शाळेत अप्रगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या स्वयंसेविका रेखा आरणकेरी, देवकर यांचा सन्मान महेश मते यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षक बाळासाहेब खटाळ श्रीशैल समदुर्ले, प्रियंका माळी यांनी भाषणे केले. जिलेबी व चिवडा याचा अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक पुंडलिक कलखांबकर, बाळासाहेब खटाळ, सारिका राठोड, कृपा राठोड, श्रीशैल समदूर्ले, अंगणवाडी सेविका राजश्री करकंटी, कल्पना बिराजदार, श्वेता उंबरजे यांनी परिश्रम घेतले.



### दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत लक्ष्मीकांत कोगनुरे यांचा वाढदिवस साजरा

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे महादेव कोगनुरे यांचे चिरंजीव लक्ष्मीकांत कोगनुरे यांच्या वाढदिवसानिमित्त यलगुलवार प्रशालेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देवून साजरा करण्यात आला. आपण आपल्या वाढदिवसाच्या निमित्त लाखो रुपये खर्च करून वेगवेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा करतो पण लक्ष्मीकांत कोगनुरे या तरुणाने आपला वाढदिवस दिव्यांग मुलांच्या बरोबर साजरा केला. लक्ष्मीकांत कोगनुरे यांने समाजाला व आजच्या तरुण पिढीला आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो याची प्रचितीच करून दिली. एकीकडे आजचा युवक आपल्या वाढदिवसाच्या निमित्त विनाकारण फटाके, बँड, केक यांच्यामध्ये लाखोंची उधळून करून वाढदिवस साजरा करतो पण लक्ष्मीकांत कोगनुरे यांनी असे न करता अनाथ व मतिमंद मुलांच्या बरोबर वाढदिवस साजरा केला. दिव्यांग विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देवून लक्ष्मीकांत कोगनुरे यांने आभार मानले.

### गिग व प्लॅटफॉर्म कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी : कामगार आयुक्त

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

कामगार व रोजगार मंत्रालय, राज्य सरकारच्या सहकार्याने ७ ते १७ एप्रिल दरम्यान एक विशेष राष्ट्रव्यापी नोंदणी मोहीम राबवत आहे ज्यामध्ये सर्व प्लॅटफॉर्म कामगारांना ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले जात आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत व्यापक आरोग्य कव्हर प्रदान करण्याच्या दिशेने हे अभियान एक महत्त्वाचे पाऊल आहे. साधारणतः गिग व प्लॅटफॉर्मवर कामगार म्हणजे शेअरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टिक सेवा देणारे कामगार,मेझॉन, फ्लिपकार्ट, झोमॅटो, स्विगी इत्यादी अशा वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणारे कामगार या व्याख्येत येतात. या मोहिमे अंतर्गत देशभरात प्रत्यक्ष नोंदणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. तसेच प्लॅटफॉर्म कामगारांना त्यांच्या हक्कांची माहिती देण्यासाठी जागरूकता उपक्रम आयोजित केले जात आहेत व प्लॅटफॉर्म कामगारांना त्यांची ई-श्रम नोंदणी पूर्ण करण्यास मदत दिली जात आहे. सर्व प्लॅटफॉर्म आधारित गिग कामगारांना या मोहिमेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. ज्यांना शिबिरात सहभागी होता येत नाही ते खालील लिंकद्वारे ई-श्रम पोर्टलवर स्व-नोंदणी देखील करू शकतातः https://register.eshram.gov.in//user/platform-worker-registration चला असे भविष्य घडवूया जिथे प्रत्येक प्लॅटफॉर्म कामगाराला ओळखले जाईल, संरक्षित केले जाईल आणि सक्षम केले जाईल.

### पत्र्याच्या शेडमध्ये बेशुध्द अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर** - गंगामाई हॉस्पिटल परिसरातील पत्र्याच्या शेडमध्ये बेशुध्द अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे. नरसिंह लक्ष्मण म्त्रेहे (वय ६०, रा. उपलपती सोलापूर) असे मृत्यू पावलेल्या व्यक्तींचे नाव आहे. बुधवारी दुपारी एक वाजता नरसिंह हे पत्र्याच्या शेडमध्ये बेशुध्द अवस्थेत आढळून आले. सदर बाजार पोलीस ठाण्यातील हवालदार काळे यांनी त्यांना उपचाराकरिता दोन वाजता शासकीय रुग्णालय दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी तपासणीनंतर घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### घरगुती कारणातून अंत्रोळीत महिलेला मारहाण

**सोलापूर** - दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंत्रोळी गावात घरगुती कारणातून महिलेला मारहाण करण्यात आली. ही मारहान गुरुवारी सकाळी साडेसहा वाजता झाली. मुबीना इकबाल सय्यद (वय ३५, या. अंत्रोळी या. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास मुबिना या त्यांच्या राहत्या घराजवळ थांबल्या होत्या. त्यावेळी मकबूल व इतर एक यांनी घरगुती कारणातून त्यांना लाथाबुक्क्यांनी मरहाण केली. यात सर्वांगास मुक्कामार लागल्याने सकाळी १०:४५ वाजता त्या स्वतः शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल झाल्या. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

---

## 'दक्षिण'मधील तांड्यावरील हातभट्ट्यांवर कारवाई

### साडे आकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

आगामी काळातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा, बक्षि हिप्परगा तांडा, सेवा व सिताराम तांड्यावरील हातभट्ट्यांवर कारवाई करीत ११ लाख ४४ हजार ८६३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

आगामी काळात सोलापूर जिल्ह्यात जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. त्याच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने ८ आणि ९ एप्रिल रोजी मुळेगाव तांडा, बक्षी हिप्परगा तांडा, सेवा व सिताराम तांड्यावरील चोरून चालणाऱ्या हातभट्टयांवर कारवाई केली. या कारवाईत



१३ हजार ४५० लिटर गुळमिश्रीत रसायन, ७५० लिटर तयार हातभट्टी असा मुद्देमाल जप्त केला. तसेच अवैधरीत्या देशी-विदेशी मद्याची वाहतूक करणारे एक चारचाकी वाहन जप्त करून त्यातून ८.६४ बल्क लिटर देशी मद्य, ४.५ लिटर विदेशी मद्य, एक दुचाकी असा एकूण ११ लाख ४५ हजार ४६३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई अधिक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्ही घाटगे, राकेश पवार, पंकज कुंभार, सचिन भवंड, दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, नांगरे, पडवळ, अंजली सरवदे, राम निंबाळकर, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपूरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, इस्माईल गोडीकट, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, पवन उगले, योगीराज तोग्गी, महिला जवान शिवाजी मुढे, रशिद शेख, दिपक वाघमारे यांनी केली.

## 'ड्रीम'तर्फे ७५ तास वाचन अभ्यास उपक्रम

### ७ दिवस रोज ११ तास वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

ड्रीम फौंडेशन, जय हिंद करियर ॲकॅडमी व चाणक्य गुरुकुलतर्फे शालेय विद्यार्थी, युवक, वाचनप्रेमी लोकांना मिळणार ७५ तास वाचन अभ्यास उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे संयोजक काशिनाथ भतगुणकी यांनी कळविले आहे. यात सहभागी लोकांना रोख ७, ०७५ रुपये बक्षीस, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र,१० युवकांना ७५ हजारांची स्पर्धा परीक्षा शिषवृत्ती,१० विद्यार्थ्यांना ७५ दिवस अभ्यासिका, १० लोकांना ७५ तास कौशल्य विकास प्रशिक्षण असे भरघोस पारितोषक मिळणार आहेत. भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्तीनिमित व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती, आद्यसमाजसुधारक महात्मा बसवेश्वर जयंती औचीत्याने ड्रीम फाउंडेशन,जयहिंद करियर अकॅडमी व चाणक्य गुरुकुल हे अभिनव उपक्रम आयोजित केले असून या प्रेरणादायी उपक्रम

७५ तास वाचन अभ्यास अभिवादन ७ दिवस रोज ११ तास वाचन करण्यात ये. याचे उद्घाटन सोमवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ६ वा होईल व समारोप २० एप्रिल सायंकाळी ७ वा होईल. रोज सकाळी ६ ते रात्री ९ वाजता वचन उपक्रम जयहिंद अभ्यासिका जयहिंद हाऊस ३ रा मजला कोटणीस नगर पनाश समोर विजापुर रोड सोलापूर येथे होणार असून जास्तीत जास्त लोकांनी यात सहभागी होण्यासाठी काशीनाथ भतगुणकी मो ७२१९०९९९५५, श्री समर्थ माने देशमुख यांच्याकडे नाव नोंदणी करावेत अधिक माहितीसाठी संगीता पाटील (८२७५७२८३८८) यांच्याशी संपर्क साधावा. वाचन अभ्यास उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तक, चहा, अल्पोपहार, भोजन सुविधा उपलब्ध करण्यात येईल ७ दिवसात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून सहभागी लोकांना संवाद साधणार आहेत

---

## चारचाकीच्या धडकेत महिला जखमी

**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

चारचाकीने धडक दिल्याने दुचाकीस्वार महिला जखमी झाल्याप्रकरणी चारचाकी गाडीच्या चालकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माधवी चंदन जवळगेकर (वय ४५, रा. मोरया सोसायटी, विजापूर रोड) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ एप्रिल रोजी सव्वा दहाच्या सुमारास सात रस्ता येथून माधवी जवळगेकर या त्यांच्या एमएच १३ एएम ५१७१ वरून जिल्हा न्यायालयाकडे जात होत्या. त्यावेळी एमएच १२ पीए ८८३क्रमांकाच्या चारचाकी वाहनाच्या चालकाने वाहन भरधाव चालवून माधवी जवळगेकर यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात जवळगेकर या जखमी झाल्या असून दुचाकीचे नुकसान झाले आहे.

## कवी माधव पवार यांच्या कवितेत मानवी मूल्यांचा जागर

### डॉ. श्रीपाल सबनीस; गरुडभरारी काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

कवी माधव पवार यांच्या कवितेत त्यांनी भारतीयतेच्या पलीकडे जाऊन मानवतेचा जागर केलेला आहे. माधव पवार यांच्या कविता सर्वधर्मसमभावाने प्रेरित असून जागतिक एकोप्याचा आग्रह धरणारी आहे. सत्याशी एकनिष्ठ असणारा हा कवी आहे. मृत्यूशी साथसंगत धरून वेदनेवर मात करणार आहे. जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा आहे असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

ते कविवर्य रा.ना. पवार प्रतिष्ठान व शिवप्रज्ञा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कवी माधव पवार यांच्या 'गरुडभरारी' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी लोकमान्य टिळक सभागृहात प्रमुख अतिथी म्हणून बोलत



होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुहास पुजारी हे होते.

यावेळी मंचावर सुदाम भोरे, डॉ. श्रीकांत येळेगावकर, माधव पवार, चारूलता पवार, राजेंद्र भोसले आदी उपस्थित होते. पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य व कला कादमीचे अध्यक्ष कृषिभूषण सुदाम भोरे यांनी माधव पवार यांच्या काव्यप्रतिभेची मुक्तकंठाने स्तुती केली. माधव पवार यांचे बंधू मुकुंद पवार यांनी मनोगत व्यक्त केले. गिरीश दुनाखे यांनी या वेळी फ.मुं. शिंदे यांनी लिहिलेल्या 'गरुडभरारी' या काव्यसंग्रहाच्या मलपृष्ठाचे वाचन केले. अध्यक्षीय समारोप डॉ. पुजारी यांनी केले. प्रास्ताविक कविवर्य रा.ना. पवार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. प्रकाशकीय मनोगत शिवप्रज्ञा प्रकाशनाचे संचालक राजेंद्र भोसले यांनी केले. सूत्रसंचालन म.सा.प. जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले तर आभार रामचंद्र धर्मसाले यांनी मानले. कार्यक्रमास दत्ता सुरवसे, योगिराज वाघमारे, पुरुषोत्तम सदाफुले, समीर गायकवाड, मारुती कटकधोंड, हेमकिरण पत्की, गोविंद काळे, डॉ. शिवाजीराव देशमुख, डॉ. नसिमा पठाण, देवेंद्र औटी, मयूरेश कुलकर्णी, रामप्रभू माने, अतुलकुमार माने, नरेंद्र गुंडेली, डॉ. श्रीकांत कामतकर उपस्थित होते.

## शेतजमिनीमध्ये बेकायदेशीर बोर्ड लावणाऱ्याविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

नेहरू नगर येथील शेतजमिनीमध्ये बेकायदेशीर बोर्ड लावणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रघुनाथ आनंद रोकडे (रा. सेक्टर २५, प्राधिकरण निगडी, पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बाबासाहेब लक्ष्मण औटी (रा. संभाजी नगर, काळेवाडी, थेरगाव, पुणे) आणि एक अज्ञात व्यक्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रघुनाथ रोकडे यांची नेहरू नगर येथे शेतजमिन आहे. या शेतजमिनीमध्ये २ एप्रिल रोजी दुपारी बाबासाहेब औटी व एका अनोळखी व्यक्तीने घुसखोरी करून शेतातील कंम्पौड जेसीबीच्या सहाय्याने तोडून ४ ते ५ लाखांची नुकसान केले. ६ एप्रिल रोजी शेतजमिनीमध्ये जबरदस्तीने बेकायदेशीरपणे ॲड गणेश भगवान सावंत व बाबासाहेब लक्ष्मण औटी यांच्या नावाचा जाहिर बोर्ड लावला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

---

# उन्हाळ्यात पाणी टंचाई दूर करण्यासाठी सतर्कता बाळगा

## भिमा पाठबंधारे आणि नीरा भाटगर विभागाला आ.समाधान आवताडे यांनी दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल -**

सध्या उन्हाळा मोठया प्रमाणात जाणवत आहे. यामुळे पाण्याची भीषण टंचाई होणार आहे. यामुळे पाणी टंचाई होणार नाही याची खबरदारी भिमा पाटबंधारे आणि निरा भाटगर विभागाने घेण्यासाठी योग्य त्या उपययोजना कराव्यात आशा सूचना पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी दिल्या आहेत.

पंढरपूर येथील शासकीय विश्राम गृहात गुरुवारी भीमा पाटबंधारे आणि निरा भाटघर विभागातील संबंधित सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार आवताडे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. माण नदीतील बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्यात यावेत. ज्या शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही त्या शेतकऱ्यांना प्राधान्याने पाणी



देण्यात यावे अशा सूचनाही देण्यात आल्या. या बैठकीसाठी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील गावातील प्रमुख कार्यकर्ते बैठकीसाठी बोलावण्यात आले होते. या बैठकीमध्ये या उपस्थित कार्यकर्त्यांनी आपापल्या भागातील पाणी प्रश्न संदर्भात प्रश्न उपस्थित केले. त्या प्रश्नावर आमदार समाधान आवताडे यांनी अधिकाऱ्यांना त्या समस्या सोडविण्याबाबत सूचना केल्या.

वाखरी आणि गादेगाव या ग्राम पंचायतीच्या पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी ओढ्याच्या काठावर असल्यामुळे त्या ओढ्यामध्ये पाणी सोडण्यात यावे . उंबरगाव, बोहाळी, कोर्टी ओढ्यासह जांभूळबेट ओढ्यालाही पाणी सोडून देण्याची सूचनाही आमदार आवताडे यांनी यावेळी केली. ज्या शेतकऱ्यांना पाणी मिळण्यासाठी अडचण होत आहे. ती अडचण दुर करण्यासाठी मशीनने वापर करून शेतकऱ्याना पाणी पोहचवा असेही सुचित करण्यात आले आहे.

या बैठकीचे वेळीं भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हरसुरे सो, उपकार्यकारी अभियंता इंगोले मॅडम, मीरा भाटकर विभागाचे उप अभियंता पासलकर सो, विविध भागातील कर्मचारी, व कार्यकर्ते उपस्थित होते.

मंगळवेढा तालुक्यातील उन्हाळी हंगाम आवर्तन २२ एप्रिल २०२५ पासून सुरु होणार असून मंगळवेढा तालुक्यातील लाभ क्षेत्रातील मागेल त्या गरजू शेतकऱ्यांना पाणी द्या अशा सूचनाही आमदार समाधान आवताडे यांनी दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# नवीन आरोग्य उपकेंद्रांना नऊ कोटींचा निधी मंजूर

● खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे प्रयत्न

## माढा मतदारसंघातील गावांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० एप्रिल-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रयत्नांतून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत माढा, करमाळा, माळशिरस, सांगोला आणि पंढरपूर या तालुक्यांतील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आणि बीपीएचयू बांधकामाच्या प्रकल्पांना सुमारे नऊ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे.



यामध्ये माढ्यात ग्रामीण रुग्णालयातील (BPHU) बांधकामासाठी ५० लाख, करमाळ्यातील कारंजे, नियोरे, फिसरे, मांगी या गावांसाठी २ कोटी ९५ लाख, माळशिरसमधील कोथळे, मैडद, शिंगोर्णीसाठी २ कोटी ३५ लाख, ग्रामीण रुग्णालय सांगोला बीपीएचयूसाठी ५० लाख आणि पंढरपूरमधील होळे, जळोली व पेहे या गावांसाठी २ कोटी ३५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. यामध्ये प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये बीपीएचयू उभारणीचा समावेश आहे. ज्यामुळे स्थानिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

खासदार मोहिते पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील आरोग्य सुविधांच्या वाढीवर विशेष भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे नागरिकांना लवकरच चांगल्या आरोग्य सुविधा मिळणार आहेत. या कामांना तातडीने सुरुवात होण्याची अपेक्षा असून, संबंधित प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर बांधकामाला गती देण्याचे नियोजन सुरू आहे. माढा लोकसभा मतदारसंघातील या विकास प्रकल्पांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवांना नवा आयाम मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना मार्चचे निम्मेच वेतन

● निधी कमतरतेचे कारण; कामगार संघटनांचा संताप ● महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल**

एसटी महामंडळाला यंदा शासनाकडून मागणीच्या तुलनेत निम्माच निधी मिळाला. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे ५६ टक्केच वेतन मिळणार आहे. त्याबाबतची सूचना राज्यातील सर्व विभाग नियंत्रक कार्यालयांना देण्यात आली आहे. सोलापुरात कर्मचाऱ्यांचे गुरूवारी निम्मचे वेतन झाले. त्यामुळे सोलापूर एस टी विभागातील एसटी कर्मचारी आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.

सरकारकडे एसटी महामंडळाच्या आर्थिक कोंडीवर उपाय नाही. आता कर्मचाऱ्यांचे वेतनही रखडणार आहे. हे कर्मचाऱ्यांचे शोषण आहे, असा आरोप महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेने केला. महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन आणि एलआयसीसह इतर निधी पकडून महिन्याला ४६६ कोटी रुपयांची गरज आहे. परंतु शासनाकडून ३०५.२९ कोटी रुपयांचाच निधी मिळाला. त्यामुळे कर्मचाऱ्यांना ५६ टक्के वेतन दिले गेले. इतर निधीची शासनाकडे मागणी केली आहे. हा निधी मिळताच शिल्लक वेतन दिले जाईल. असे एसटी महामंडळाकडून सांगण्यात येत आहे. शासनाकडून एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दर महिन्याला सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कम दिली जाते. प्रत्येक महिन्यात मागणीप्रमाणे निधी मिळत नाही त्यामुळे तूट वाढवून पीएफ ग्रॅज्युएटी बँक कर्ज एलआयसी अशी साधारण ३,५०० कोटी रुपयांची देणे संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होऊन सुद्धा महामंडळाकडून संबंधित संस्थांकडे वर्ग गेली गेली नाहीत. यंदा महामंडळाने शासनाकडे मार्च महिन्याच्या वेतनासह इतर थकीत देण्यासाठी ९२५ कोटींची निधीची मागणी केली होती. परंतु २७२ कोटी ९६ लाख रुपये मिळाले त्यामुळे ८७ हजार कर्मचाऱ्यांना मार्चच्या महिन्याचे वेतनापैकी केवळ ५६ टक्केच निधी मिळालेला आहे.

दरम्यान वेतन देण्यासाठी इतका विलंब झाल्यावर ही आता कमी वेतन मिळणार असल्याने एसटी कर्मचारी संघटना संतापल्या आहेत. काही संघटनाने तीव्र आंदोलनाची तयारी केली आहे. सोलापूर एसटी विभागातील कर्मचाऱ्यांनी सोलापूर आगारासमोर काही काळ निदर्शने करत आपला रोष व्यक्त केला. ऐन उन्हाळी हंगामात जादा बसेस वाहतूक सुरू असताना कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर देणे बंधनकारक असताना शासनाने पगार वेळेवर न देता निम्माच पगार देऊ केला. तोही वेळेत न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे कुटुंब आर्थिक चणचणीत आले आहे. अशा अवस्थेत कर्मचारी कशा पद्धतीने कर्तव्यावर रुजू होणार, असा सवाल ही आता कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

### महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनाचे निवेदन

सोलापूर एसटी विभागातील कर्मचाऱ्यांची उर्वरित पगार येत्या दोन दिवसात बँक खात्यात जमा करा. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कामगार संघटनेने निवेदनाद्वारे मुख्य कार्यालयास कळवले आहे. त्यानुसार येत्या दोन दिवसात शासनाने कर्मचाऱ्यांचा उर्वरित पगार जमा न केल्यास, होणाऱ्या आर्थिक नुकसानीस शासन व महामंडळ जबाबदार राहील. असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

**- संतोष जोशी, अध्यक्ष**



# सांगोला महाविद्यालयात ५७ विद्यार्थ्यांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० एप्रिल-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयामध्ये लायन्स क्लब सांगोला, रेवनील रक्त पेढी, सांगोला आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

शिबिरात ५७ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. यावेळी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी मनोगतात महाविद्यालयीन जीवनापासून मला रक्तदानाची आवड होती. मी विद्यार्थी दशेपासूनच विविध रक्त पेढींचा सदस्य असून नियमित रक्तदान करून समाज सेवेच काम करत आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून त्यामुळे आपण दुसऱ्या कोणाला तरी जीवनदान देत असतो. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव अँड. उदयबापू घोंगडे, प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, रेवनील रक्तपेढीचे प्रमुख सोमेश्वर यावलकर, लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेष आटपाडीकर, प्रा.अमोल गायकवाड उपस्थित होते. या रक्तदान शिबिराचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.नवनाथ शिंदे, डॉ.सदाशिव देवकर, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख कॅ.प्रा.संतोष कांबळे यांनी केले. या शिबिरासाठी प्रा.संतोष लोंढे, प्रा.गणेश पैलवान, सिद्धेश्वर स्वामी, भाऊ गायकवाड, सुनील शिंदे यांचे सहकार्य लाभले.

टीजेएसबी बँकेचे २०२४-२५ आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर; यशस्वी टप्प्यांचा गौरव

# व्यवसायाचा एकूण २३ हजार कोटींचा टप्पा पार

**ठाणे, १० एप्रिल २०२५ -**

देशातील बहुराज्जीय सहकारी बँकांपैकी एक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने सलग दहा वर्षांहून अधिक काळ दरवर्षी १० एप्रिल रोजी आर्थिक निकाल जाहीर करण्याची परंपरा जपत आज २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. नव्या कोर बँकिंग प्रणाली (CBS) अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवरही बँकेने सातत्य कायम ठेवत पारदर्शकता आणि वेळेवर आर्थिक माहिती सादर केली आहे.

| मुख्य आर्थिक ठळक बाबी | |
|---|---|
| एकूण उलाढाल | २३,१०४.८२ कोटी |
| ठेवी | १४,८४८.६४ कोटी |
| कर्जे | ८,२५६.१८ कोटी |
| ढोबळ नफा | २५२.०७ कोटी |
| निव्वळ नफा | १८५.३८ कोटी |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.५९% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | ०% |

बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. निखिल आरेकर म्हणाले, शासन निर्णय आणि यशस्वी विलीनीकरण हे आमच्या गुणवत्तापूर्ण सेवा व नावीन्यपूर्ण दृष्टिकोनाचे फलित आहे. या टप्प्यामुळे आम्हाला शासकीय विभागांची,कर्मचाऱ्यांची सेवा करण्याची आणि आमचे नेटवर्क वाढवण्याची संधी मिळाली आहे. गोवा राज्यातील आमचे अस्तित्व अधिक सशक्त झाले असून, बँकेची एकूण शाखा संख्या आता पाच राज्यांत १४९ वर पोहोचली आहे.पुढील वाटचालीत, बँक शाखा विस्तार, डिजिटल सेवा व वित्तीय समावेशनाला चालना देण्यावर लक्ष केंद्रीत करणार आहे, असेही श्री. निखिल आरेकर यांनी स्पष्ट केले.

नव्या कोर बँकिंग प्रणालीची अंमलबजावणी यशस्वीपणे पूर्ण करत, बँकेने ग्राहक सेवा, गती आणि कार्यक्षमतेत मोठी सुधारणा केली आहे. टीजेएसबी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सीए वैभव सिंगवी, मान्यवर संचालक मंडळ सदस्य आणि वरिष्ठ अधिकारी या पत्रकार परिषदेस उपस्थित होते. टीजेएसबी बँक विषयी: १९७२ मध्ये स्थापनेपासून, टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड ही बहुराज्य अधिसूचित सहकारी बँक ग्राहक-केंद्रित दृष्टीकोन, नाविन्यपूर्ण सेवा आणि मजबूत आर्थिक आधारामुळे ओळखली जाते. सध्या पाच राज्यांमध्ये १४९ शाखांचे विस्तृत जाळे असलेली ही बँक वैयक्तिक ग्राहकांसोबतच व्यवसायिकांच्या पसंतीचीही बँक ठरली आहे.

**२०२४-२५ मधील यशस्वी टप्पे :** टीजेएसबी सहकारी बँकेने या वर्षी अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयामुळे आता बँकेला शासकीय अधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठीचे खाते आणि निवृत्ती वेतनधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरिता; तसेच सार्वजनिक उपक्रम/महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकरिता प्राधिकृत मान्यता मिळाली आहे. यावर्षी टीजेएसबी बँकेमध्ये सिटिझन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, गोवा यांचे यशस्वी विलीनीकरण झाले असून, बँकेच्या नेटवर्कमध्ये सहा नवीन शाखांची भर पडली आहे. बँकेने नवीन कोर बँकिंग प्रणाली (उइड) अंमलात आणून ग्राहक अनुभव व कार्यक्षमतेत मोठी सुधारणा केली आहे.

**नेतृत्वाचा दृष्टीकोन :** बँकेचे अध्यक्ष श्री. शरद गांगल म्हणाले, या वर्षीची कामगिरी केवळ आमच्या मजबूत आर्थिक पाया सिद्ध करत नाहीतर, सहकारी बँकिंगमधील नवे मापदंडही निश्चित करते. नव्या कोर बँकिंग प्रणालीमुळे व्यवहारांची गती, सुरक्षितता आणि उपलब्धता वाढली आहे. ग्राहक प्रथम हेच आमचे धोरण असून, भविष्यातील नवकल्पनांचा पाया मजबूत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ते पुढे म्हणाले, आमचे ध्येय हे सहकारी बँकिंग क्षेत्रात आघाडीवर राहणे आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि वैयक्तिक सेवा यांचे समन्वयाला आमचे प्राधान्य आहे. डिजिटल नवकल्पना, ग्राहक-केंद्रित उपाययोजना आणि धोरणात्मक वाढ यावर आम्ही सतत भर देत आहोत.

# एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी प्रताप सरनाईक

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १० एप्रिल-**


महायुती सरकारमधील भाजपा व एकनाथ शिंदे गटातील अंतर्गत वादामुळे चर्चेत आलेल्या परिवहन विभागाचे अध्यक्षपद अखेर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. शनिवारी ११ वाजता पदभार स्वीकारणार आहेत.

नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात आल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे पद परिवहन विभागाचे सचिव संजीव शेट्टी यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यामुळे शिंदे गट नाराज झाले होते. मात्र अखेर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अध्यक्षपदाचा पदभार मंत्री सरनाईक यांच्याकडे सोपविला. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम व आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र परिवहन महामंडळाची १९६० स्थापना करण्यात आली. र.गो.सरैय्या हे महामंडळाचे पहिले अध्यक्ष होते.

# कन्हेरगांव येथे १७ तोळे सोन्याची धाडसी चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १० एप्रिल-**

टेंभुर्णी पोलीस ठाण्यांतर्गत कन्हेरगांव (ता.माढा) येथे बंद घरे चोरट्यांच्या टार्गेटवर असून कन्हेरगाव अज्ञात चोरट्यानी माने यांच्या शेतातील बंद घराचे कुलूप तोडून घराच्या कपाटात ठेवलेले ८ लाख ३८ हजार रुपये किमतीचे सतरा तोळे सोने धाडसी चोरी करून चोरून नेले आहे. ही घटना आज गुरुवारी दु.१.२० वा. ते २.१९ वा. सुमारास घडली आहे.या घटनेने ग्रामीण भागात खळबळ उडाली आहे.



याबाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यातून मिळालेली अधिक माहिती अशी की, मौजे कन्हेरगाव येथील माने यांच्या शेतातील वस्तीवर गुरुवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून बेडरूम मधील कपाटाचे लॉक तोडून कपाटात ठेवलेले १७ तोळे सोन्याचे दागिने चोरी केले. यामध्ये १२ हजार ४७० रु.किमतीची अंगठी,७६ हजार रु.किमतीची १५ ग्रॅम वजनाची अंगठी,४ लाख रु.किमतीचे आठ तोळे वजनाचे सोन्याचे गंठन,१ लाख ५० हजार रु.कितीचे तीन तोळ्यांची सोन्याची मोहन माळ,दोन लाख रु.किमतीचे चार तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या असा सुमारे आठ लाख,३८ हजार ६७० रु.किमतीचे सतरा तोळे सोन्याचे दागिने चोरी झाले आहेत.या घटनेने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटनेची अनिता विजय माने यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोसई कुलदीप सोनटक्के हे अधिक तपास करीत आहेत.

# महिलेचा विनयभंग; दोघांना पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१० एप्रिल**

एका २६ वर्षीय महिलेस तुम्ही आमचे विरूध्द पोलिस ठाणेत दाखल केलेली पोलिस केस माघारी घेतली नाही तर तुझ्या नवर्याला जीवंत सोडणार नाही असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी करीत त्या महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी समाधान महादेव घोडके, रमेश उध्दव ठेंगील (रा.मुंढेवाडी) या दोघांना पोलिसांनी अटक करून मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील २६ वर्षीय फिर्यादी महिला दि.७ रोजी रोजी सकाळी ११.१५ वा. तीच्या घरासमोर कपडे धुवत असताना वरील दोघे आरोपींनी मोटर सायकलवरून येवून फिर्यादीस आमचे विरूध्द पोलिस ठाण्यात दाखल केलेली पोलिस केस माघारी घेतली नाही तर आम्ही तुझ्या नवर्याला जीवंत सोडणार नाही असे म्हणत शिवीगाळ,दमदाटी करीत आरोपींनी जवळ येवून सदर महिलेचा हात पकडून विनयभंग केला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तपासिक अंमलदार तथा पोलिस हवालदार मनोज खंडागळे यांनी तात्काळ दोघा आरोपींना अटक करून मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने दि.११ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान,तपास अधिकार्यांनी गुन्हयातील मोटर सायकल जप्त केली आहे. आरोपींची शुक्रवारी पोलिस कोठडीची मुदत संपत असल्याने पुन्हा न्यायालयात उभे केले जाणार आहे.

# मंत्रिमंडळ बैठकीसाठी मंत्री, सचिव आयपॅडचा वापर करणार

## राज्य सरकारचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १० एप्रिल-**

महायुती सरकारमधील मंत्री व सचिव आता कार्यालय कामासाठी आयपॅडचा वापर करणार असून मंत्रिमंडळ बैठकीत त्यांचा वापर केला जाणार आहे. सर्व मंत्री व सचिवांच्यासाठी नवीन आयपॅड खरेदी केले जाणार आहे.

शासन व नागरिक यांच्यातील दुरावा कमी करून प्रशासन अधिक जवळ आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. 'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल, असे सांगण्यात येत आहे. महाराष्ट्राने डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित ई-गव्हर्नन्सच्या दिशेने उल्लेखनीय प्रगती केली आहे. 'ई-ऑफिस', 'सेंट्रल रजिस्ट्री युनिट' (जे मंत्रालयातील सर्व पत्रव्यवहारांचे डिजिटायझेशन करते), 'आपले सरकार' व 'जिल्हास्तरीय सुशासन निर्देशांक यांसारख्या अनेक ॲप्लिकेशन्स व प्रणालींमुळे ही प्रगती शक्य झाली आहे. याशिवाय, प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी लिपीक वर्गापासून ते मंत्र्यांपर्यंत ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर शासकीय यंत्रणेतील सर्वच स्तरांवर करण्यात येतो आहे.

गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व आमदार व विधानपरिषदेतील सदस्य सभागृहातील कामकाजासाठी टॅबलेटचा वापर करत आहेत, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया कागदविरहित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून व डिजिटल इंडिया अभियानाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाने नागरिक सेवा अधिक प्रभावीपणे डिजिटल स्वरूपात पुरवण्याचा संकल्प केला आहे.

## ॥ उसंतवाणी ॥

१४७६



अधिवेशनात । गायब प्रियंका ।
टीकाकार शंका । विचारती ॥१॥

संसद वा पक्ष । नाही दोन्हीकडे ।
नाराज चौघडे । वाजती का? ॥२॥

संसदेचे नाही । जराही महत्व ।
कोणते हे तत्व । राजकीय ॥३॥


पक्षासाठीसुद्धा । मिळेना का वेळ ।
कोणता हा खेळ । चाललेला ॥४॥

निवडणुकीला । सज्ज हो बिहार ।
आहे का तय्यार । पक्ष तिथे? ॥५॥

मतदारसंघ । जपा वायनाड ।
हितबंध आड । मुस्लिमांचा ॥६॥

कांत काँग्रेसी हे । बबली नि बंटी ।
पक्षहित घंटी । वाजविती ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१० एप्रिल २०२५



## अग्रलेख...

# पुढच्या पराभवाची पूर्वतयारी!

पश्चिमेच्या क्षितिजास स्पर्श करणाऱ्या सूर्याच्या विभ्रमकारी कलांचे दर्शन झाल्यावर मन मोहून जाते. त्याच्या किरणांच्या शेकडो रंगछटा आसमंत उजळून टाकतात, तरीही त्याला कोणी सूर्योदय मानत नाहीत. तो मावळतीकडे झुकणाराच सूर्य असतो. हा सूर्य कितीही तेजस्वी भासत असला, तरी त्याचा अस्त ठरलेला असतो. देशाच्या पश्चिमेला गुजरात राज्यातील अहमदाबादेत सुरू असलेल्या काँग्रेस महासमितीच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना भाषणाकरिता निमंत्रित करण्यापूर्वी त्यांचा उल्लेख 'नया सवेरा' असा करण्यात आला, तेव्हा तेथे टाळ्यांचा कडकडाट करून घोषणांचा पाऊस पाडणाऱ्या गांधीनिष्ठ काँग्रेसी भक्तजनांच्या मनात असाच भाबडा आशावाद उफाळून आला असेल.

एक गोष्ट नक्की झाली; ती म्हणजे, राहुल गांधी यांची वाटचाल त्यांच्या आजीच्या, म्हणजे इंदिरा गांधींच्या एकाच विचाराचे संस्कार सोबत घेऊन सुरू राहणार आहे. आपल्याला जे योग्य वाटेल तेच आपण करतो, लोक काय म्हणतील, भविष्यकाळ आपली कशी नोंद घेईल, याची पर्वा न करता, आपण आपल्या मार्गाने चालतच राहणार आहोत, असे राहुल गांधी यांनी स्पष्टपणे सांगितले. तेव्हा सभास्थानी किंचित टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला, पण राहुल गांधींना जे वाटते तसेच ते करणार या त्यांच्या भूमिकेमुळेच, देशावर दीर्घकाळ सत्ता गाजविणारा, देशाचे नेतृत्व करणारा आणि महात्मा गांधी, सरदार पटेल यांच्यापासून मनमोहनसिंग यांच्यापर्यंतच्या दिग्गज नेत्यांचा वारसा सांगणारा हा पक्ष आज राहुल गांधींच्या दावणीला पुरता बांधला गेला आहे, याची जाणीव पक्षातील विचारी मनांमध्ये निश्चितच उमटली असेल. याच पक्षातील दोन नेत्यांच्या विचारसरणीमधील भिन्नतादेखील या निमित्ताने अधोरेखित झाली. भविष्यकाळ आपल्या कारकीर्दीची कशी नोंद घेईल, याची आपल्याला चिंता नाही. आपण आपल्या मार्गाने काम करीत राहणार, असे म्हणणाऱ्या इंदिरा गांधी आणि त्याच विचाराने आपल्या कार्यपद्धतीची दिशा ठरविणारे राहुल गांधी या गांधी घराण्याच्या पिढ्यांच्या दरम्यान याच पक्षाने पंतप्रधानाच्या रूपाने डॉ. मनमोहनसिंग यांचेही नेतृत्व अनुभवले होते. भविष्यात मात्र जेव्हा आपल्या कामाचे मूल्यमापन केले जाईल, तेव्हा लिहिला जाणारा इतिहास आपली दखल निश्चितच घेईल, असे सांगणारे डॉ. मनमोहनसिंग याच पक्षाचे शिलेदार होते. त्यामुळे लोक काय म्हणतील, याची पर्वा न करणारे राहुल गांधी आणि भविष्यकाळाने नोंद घ्यावी, अशा कर्तबगारीचा ठसा उमटविण्याची उमेद बोलून दाखविणारे संयत नेतृत्वशील मनमोहनसिंग हा काँग्रेसी परंपरेच्या विचारसरणीतील विसंगतीचा एक नमुना म्हणावा लागेल. देशाच्या पश्चिमेकडील गुजरातच्या किनाऱ्यावरून देशाच्या अतिपूर्वेकडील ईशान्येपर्यंत काँग्रेसचा झेंडा फडकविण्याची उमेद व्यक्त करणारा संकल्प या बैठकीत व्यक्त झाला. अर्थात, या संकल्पाच्या पूर्तीचे शिलेदार म्हणून अवघी काँग्रेस राहुल गांधी यांच्याच नेतृत्वाकडे आशेने पाहात असल्याचेही या बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे राहुल गांधींच्या मनात भविष्याविषयी काय चालले आहे आणि काँग्रेसच्या वाटचालीसंबंधी काँग्रेसजनांच्या भावना काय आहेत, याचे कल्पनाचित्र रंगतदार ठरू शकते. गेल्या १० वर्षांत असंख्य निवडणुकांमध्ये केवळ पराभव पाहावा लागणाऱ्या काँग्रेसने भविष्यातील विजयाचा संकल्प ज्या गुजरातच्या रणभूमीवरून सोडला, तेथील विधानसभा निवडणुकांना अद्याप सुमारे दोन वर्षांचा अवधी आहे. देशाच्या सत्ताकारणात महत्त्वाची भूमिका असलेल्या बिहार राज्यात या वर्षअखेरीस नोव्हेंबरात विधानसभेची निवडणूक होऊ घातली आहे. त्यापाठोपाठ म्हणजे २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि आसाममधील निवडणुका होतील आणि २०२७ मध्ये गुजरात विधानसभा निवडणूक होईल. देशाच्या कानाकोपऱ्यात विजयाचा झेंडा फडकवण्याची उमेद बाळगणाऱ्या या पक्षाने नजिकच्या भविष्यात सत्ताकारणाचा असलेल्या कोणत्याही राज्यात पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक न घेता, दोन वर्षांनंतर निवडणुका असलेल्या गुजरातेची निवड विजय संकल्पाचे रणशिंग फुंकण्यासाठी करावी, याचे अनेकांना आश्चर्य वाटलेही असेल. पण लोक काय म्हणतील, त्यांना काय वाटेल याची पर्वा न करता आपल्याला पाहिजे तेच आपण करणार, अशी स्पष्टोक्ती राहुल गांधी यांनी अगोदरच केलेली असल्याने, केवळ अनुयायाच्या भूमिकेतून गांधी घराण्याशी निष्ठा दाखविणाऱ्यांनी ते आश्चर्य दडपून ठेवले असेल. राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या या राज्यांच्या निवडणुका काँग्रेसने बाजूला ठेवल्या असाव्यात का किंवा या राज्यातील विजयाविषयी पक्षश्रेष्ठींच्याच मनात शंका असाव्यात का, याची उत्तरे आता शोधावीच लागतील. अलिकडेच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या एकूण कामगिरीतून त्या उत्तरांचे संकेत मिळालेलेच असल्याने काँग्रेस महासमितीच्या विस्तारित कार्यकारिणीची गुजरातेतील बैठक म्हणजे भविष्यातील विजयाचे रणशिंग फुंकण्याचा संकल्प की आगामी निवडणुकांतील पराजयाची पूर्वतयारी असेल, एवढेच आता ठरावयाचे आहे.

भारतीय जनता पार्टीचा भक्कम बालेकिल्ला असलेल्या गुजरातमध्ये पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक घेऊन भाजपाला आणि गुजरातमध्ये नेतृत्व घडलेल्या नरेंद्र मोदी, अमित शहा यांना शह देण्याचा काँग्रेसचा इरादा आहे, हे स्पष्ट आहे. मात्र, काळ आणि वेळ यांचे गणित पाहता, या बैठकीचा प्रभाव हा राहुल गांधी यांनी भारत जोडो असे नाव देऊन केलेल्या देशभ्रमणाच्या प्रभावासारखाच ठरेल, याची जाणीव पक्षाच्या अनेक जाणत्या नेत्यांना असेलच. लोकसभेच्या निवडणुका तोंडावर येण्याआधी राहुल गांधी यांनी भारत जोडो याचेच निमित्त साधून देशाच्या कानाकोपऱ्यात भ्रमण केले, तेव्हा लोकसभा निवडणुकीत काँग्रेस हा भाजपाला आव्हान देणारा समर्थ पर्याय ठरेल, असे अनेकांना वाटू लागले होते. इंडिया आघाडी या नावाने बांधलेली भाजपाविरोधी पक्षांची मोट काँग्रेसच्या तंबूखाली आणण्याचे प्रयत्न झाले, पण राहुल गांधी यांनी आघाडीचे नेतृत्व करावे, यास अन्य पक्षांचे नेते फारसे अनुकूल नसल्याचे स्पष्ट झालेच आणि लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर या यात्रेच्या प्रभावाच्या वातावरणाचा फुगा फुटून काँग्रेससह सर्वच विरोधकांना वास्तवाची आणि वर्तमानातील गलितगात्र राजकीय स्थितीची जाणीवही झाली होती. त्यामुळेच अन्यांची पर्वा न करता आपल्या मनाला वाटेल, तेच करण्याचा राहुल गांधी यांचा अट्टहास त्या वेळीही पराभवास कारणीभूत ठरल्याची भावना पक्षातील बुजुर्ग नेत्यांनी व्यक्त केली, पण त्यांचा आवाज क्षीणच ठरला. आता पुन्हा राहुल गांधी यांनी स्वतःच्या मनास वाटेल तेच करण्याचा चंग बांधला आहे. लोकसभेच्या ताज्या निकालाच्या पुनरावृत्तीची ही पूर्वतयारीच आहे.

जाती-धर्मांच्या आधारावर देशातील लोकसंख्येचे विभाजन करणे ही फूट पाडणारी भूमिका ठरेल, असे भाजपा मानते, तर जातिनिहाय लोकसंख्येचे प्रमाण स्पष्ट झाल्यावर देशाच्या साधनसंपत्तीमध्ये कोणाची किती भागीदारी आहे हे निश्चित होईल, असा राहुल गांधींचा आग्रह आहे. अहमदाबादेतील बैठकीच्या सत्रामध्ये बोलताना त्यांनी या आग्रहाचा पुनरुच्चार केला. आगामी दीड ते दोन वर्षांत ज्या पाच राज्यांत विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत, त्यासाठी काँग्रेसी रणनीती काय असेल, याचे संकेत राहुल गांधी यांनी दिले आहेत, असे दिसते. याखेरीज महात्मा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांचा वारसा सिद्ध करण्याचा काँग्रेसचा आटापिटा राहील, असेही स्पष्ट झाले. गुजरातमध्ये मोदी सरकारने उभारलेला सरदार पटेल यांचा जागतिक कीर्तीचा भव्य पुतळा आणि पटेलांच्या नेतृत्वाचा वारसा अंगीकारण्याचे भाजपाचे धोरण यामुळे मुळच्या काँग्रेसी पक्षाचा हक्क हातून निसटू पाहात असल्याची अस्वस्थ जाणीव काँग्रेसमध्ये उमटली आहे. भाजपाची मुख्य पकड असलेल्या मुद्यांवर घाव घालण्याचा प्रयत्न काँग्रेसने सुरू केला असला, तरी हे मुद्दे हिसकावून आपली मोहोर त्यावर उमटविण्याची राहुल गांधी यांच्या नेतृत्वाची क्षमता असेल का, याची खात्री काँग्रेसला असेलच असे नाही. राहुल गांधींच्या नेतृत्वाने पराभवाचा पायंडा पाडला असून पुढच्या निवडणुकांतही याच पराजयाच्या परंपरेची पुनरावृत्ती करण्याची पूर्वतयारी तर येथून सुरू झाली नसावी ना, असा प्रश्न बैठकीत उमटलेल्या एककल्लीपणाच्या अट्टहासी सुरातून जाणवत काँग्रेसजनांना पडला असेल.

## प्रासंगिक

# आता बांगलादेशचे आव्हान

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

डॉ. मोहम्मद युनूस हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ असले, तरी चांगले राजकारणी नाहीत, हा अनुभव जगाला येत आहे. बांगलादेशला अडचणीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याऐवजी ते चीनसारख्या देशाच्या पुढ्यात ढकलून मोकळे होत आहेत. त्यासाठी त्यांनी केलेल्या तत्त्वशून्य तडजोडींमुळे भारत आणि बांगलादेशचे संबंध सर्वात खालच्या पातळीवर पोहोचले आहेत. युनूस यांनी अलिकडेच केलेल्या वक्तव्यामुळे भारतातील लोक संतप्त झाले आहेत. युनूस चीनच्या दौऱ्यावर होते. या वेळी त्यांनी भारतावर दबाव आणण्यासाठी आणि चीनला खूश करण्यासाठी काही विधाने केली. युनूस यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत बीजिंगमध्ये बैठक घेतली. बांगलादेशमधील तांत्रिक आणि आर्थिक विकासाबाबत चर्चा केली. या भेटीत त्यांनी चीनला बंगालच्या उपसागरात येण्याचे आमंत्रण दिले. युनूस म्हणाले की, भारतातील ईशान्येकडील सात राज्यांना 'सेव्हन सिस्टर्स' म्हणून ओळखले जाते. हे भूपरिवेष्टित क्षेत्र आहे. चीन इथे गुंतवणूक करू शकतो, असे त्यांनी म्हटले. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ भारताची ईशान्येकडील सात राज्य भारतातील 'लॅण्डलॉक्ड एरिया' आहे. त्यांना समुद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग नाही. या संपूर्ण परिसरात बांगला देश हा एकमेव समुद्राचा रक्षक आहे. या बढाईमुळे त्यांच्याबद्दल नाराजी पसरली.

'चिकन नेक' हा पश्चिम बंगालच्या शेजारी वसलेला एक अरुंद भाग आहे. हा २०-२२ किलोमीटर रुंद आणि ६० किलोमीटर लांब आहे. याला 'सिलीगुडी कॉरिडॉर' असेही म्हणतात. हा मार्ग ईशान्येकडील राज्यांना जोडतो. त्याला 'सेव्हन सिस्टर्स' असेही म्हणतात. हा कॉरिडॉर नेपाळ, भूतान, चीन, बांगलादेश या शेजारी राष्ट्रांनी वेढलेला आहे. चीनची नजर भारताच्या महत्त्वाच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'वर आहे. चीन तिबेट स्वायत्त प्रदेशा (टीएआर) च्या चुंबी खोऱ्यात आपला संपर्क मजबूत करीत आहे. हा भाग भारताच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'च्या जवळ आहे. 'सिलीगुडी कॉरिडॉर' हे केवळ व्यावसायिक आणि भौगोलिकदृष्ट्याच नाही, तर सामरिकदृष्ट्याही भारताचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. पूर्व कमांडर लेफ्टनंट जनरल मनोज पांडे यांनी सिलीगुडीचे वर्णन संवेदनशील म्हणून केले होते. सर्वांचे लक्ष लडाख सीमेवरील 'पीपल्स लिबरेशन आर्मी'च्या अतिक्रमणावर असताना, चीन शांतपणे इतरत्र आपली आक्षेपार्ह क्षमता वाढवत आहे. यामध्ये भारताच्या 'चिकन नेक'जवळ भूतान प्रदेशातील रस्तेबांधणीचा समावेश आहे. पश्चिम बंगालमध्ये असलेला कॉरिडॉर ६० किलोमीटर लांब आणि २० किलोमीटर रुंद आहे आणि उत्तर-पूर्व भागाला उर्वरित भारताशी जोडतो. हा केवळ महत्त्वाचा व्यापारी मार्ग नाही, तर दक्षिण पूर्व आशियाचा एक महत्त्वाचा गेटवे आहे. हा प्रदेश बांगलादेश, नेपाळ, भूतान आणि चीनसह अनेक आंतरराष्ट्रीय सीमांनी वेढलेला आहे. तिबेटची चुंबी व्हॅली चिकन नेक कॉरिडॉरपासून फक्त १३० किलोमीटर अंतरावर आहे. युद्धाच्या प्रसंगी ती महत्त्वाची भूमिका बजावू शकते. 'सिलीगुडी कॉरिडॉर'ला रस्ते आणि रेल्वेने जोडलेले आहे. या कॉरिडॉरमधूनच त्यांना सर्व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो. युद्ध झाल्यास 'सिलीगुडी कॉरिडॉर'मधून शस्त्रे आणि सैन्य सहज जमवता येते. या महत्त्वाच्या क्षेत्राच्या रक्षणाची जबाबदारी भारतीय लष्कराची त्रिशक्ती कॉर्प्स पार पाडत आहे. भारतीय हवाई दलाने या प्रदेशातील हाशिमारा एअरबेसवर १८ फ्रेंच राफेल लढाऊ विमानांचा एक स्क्वॉड्रनदेखील तैनात केला आहे. तसेच, 'एमआयजी' विमानांचे सर्व प्रकार या भागात तैनात आहेत. त्याचबरोबर भारतीय लष्कराने ब्रह्मोस मिसाईल रेजिमेंट तैनात करून या भागाची सुरक्षा मजबूत केली आहे. 'सिलीगुडी कॉरिडॉर'ची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारतीय लष्कर आणि हवाई दलाने त्यांची लष्करी रचना आणखी मजबूत केली आहे. चीन आणि बांगलादेशच्या कारवाया पाहता भारत या प्रदेशात सर्व संभाव्य सुरक्षा उपाय करत आहे; जेणेकरून कोणत्याही संभाव्य आव्हानाला चोख प्रत्युत्तर देता येईल. 'बेल्ट अॅण्ड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय) च्या माध्यमातून चीन आधीच बांगलादेशमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे. अशा स्थितीत युनूस यांच्या चीन दौऱ्याकडे भारताविरुद्धची मुत्सद्दी खेळी म्हणून पाहिले जाऊ शकते. काही काळापूर्वी 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' जनरल अनिल चौहान यांनी चिकन नेक भागात सशस्त्र दलांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी उत्तर बंगालच्या अग्रेषित भागांना भेट दिली होती.

२०१७ मध्ये भारत-चीन-भूतान सीमेवरील त्रिकोणी भागात भारत आणि चीनचे सैन्य दोन महिने एकमेकांसमोर उभे ठाकले होते. या वेळी चीनने भूतानच्या भूभागातील डोकलाममध्ये रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला होता. भारतीय लष्कराने भूतानच्या हद्दीत घुसून चीनला रस्ता बांधकाम थांबवण्यास भाग पाडले. चीनने डोकलाम पठार ओलांडून यशस्वीपणे रस्ता बांधला असता, तर सिक्कीमच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'ला धोका निर्माण करून ते जामफेरी रिजच्या जवळ पोहोचले असते.भारताने चिकन नेक भागात चीनची आक्रमकता रोखण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. ब्रह्मोस हे जमिनीवर हल्ला करणारे सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र आहे. भारत ते रशियाच्या सहकार्याने बनवते. हे क्षेपणास्त्र प्रचंड वेगाने २९० किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावरील लक्ष्य नष्ट करण्यास सक्षम आहे. भारताने ब्रह्मोस-ए ही ब्रह्मोसची हवाई प्रक्षेपित आवृत्ती विकसित केली आहे. त्याची रेंज ४०० किलोमीटर आहे. चीनला कोणत्याही लष्करी साहसापासून रोखण्यासाठी भारतीय लष्कराने चिकन नेक भागात ब्रह्मोस क्षेपणास्त्र रेजिमेंट तैनात केली आहेत. दसॉल्ट राफेल हे बहु-भूमिका असलेले लढाऊ विमान हवाई संरक्षण, हवाई अडथळे आणि आक्रमणाची भूमिका बजावू शकते. ब्रह्मोस जमिनीवर हल्ला करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्रांसोबतच राफेल हवाई दलाला मजबूत आक्षेपार्ह शक्ती प्रदान करते.

एस-४०० पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली एस-४०० सॅम ही पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली आहे, जी ४०० किलोमीटरहून अधिक अंतरावरील शत्रूची लढाऊ विमाने, क्रूझ आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे नष्ट करू शकते. भारताने रशियाकडून या प्रणालीच्या पाच रेजिमेंट पाच अब्ज डॉलर खर्चून खरेदी केल्या आहेत. त्यापैकी रशियाने भारताला तीन रेजिमेंट दिल्या आहेत. पाकिस्तान आणि चीनच्या पश्चिम आणि उत्तर सीमांचे रक्षण करण्यासाठी पंजाब प्रदेशात पहिली रेजिमेंट तैनात करण्यात आली होती. भारतीय हवाई हद्दीत चिनी लढाऊ विमानांचा प्रवेश रोखण्यासाठी 'सिलीगुडी कॉरिडॉर'मधील चिकन नेक भागात दुसरी रेजिमेंट तैनात करण्यात आली आहे. प्रगत आकाश प्रणालीमध्ये नवीन साधक तंत्रज्ञान, अंतराळ-कार्यक्षम डिझाईन आणि ३६०-डिग्री प्रतिबद्धता क्षमता समाविष्ट आहे. अर्थात या भागाच्या रक्षणासाठी भारताची संरक्षण सिद्धता झाली असली, तरी बेसावध राहून चालणार नाही. म्हणूनच युनूस यांच्या बेजबाबदार विधानांची देशभरात निंदा करण्यात आली.


## वेध

**संजय रामगिरवार**

# 'कमवा-शिका' योजनेचे दुर्दैव!

*'किस उम्र तक पढा जाए,*
*किस उम्र तक कमाया जाए,*
*ये शौक नही, हालात तय करते है...'*

वैदर्भीय विद्यार्थ्यांची साधारणतः अशीच काहीशी स्थिती आहे. त्यांच्यासाठी उच्च शिक्षण आजही जिकरीचे आहे. कुठेतरी वाचल्याचे आठवते, अमेरिकेत म्हणे विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी पालकांकडून पैसेच घेत नाही तर कॉलेज संपल्यानंतर कुठेतरी अंशकालीन काम करतो आणि मिळालेल्या पैशातून शिक्षण घेतो. आपल्याकडे सर्वांची चिंता वाहण्याची संस्कृती आहे. बहुजनांच्या शिक्षणाचे वटवृक्ष म्हणून आपण ज्यांना ओळखतो ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजनेची मुहूर्तमेढ रोवली. पुढे साऱ्याच विद्यापीठांनी ती स्वीकारली. नव्याने स्थापन झालेल्या गोंडवाना विद्यापीठातही विद्यार्थी विकास विभागाद्वारे ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना राबविली जाते. ज्यांच्या पालकांचे उत्पन्न तीन लाखांच्यावर नाही, अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी महाविद्यालयात साधारणतः दोन-तीन तास बागकाम, गवत कापणे, वाचनालयातील पुस्तके व्यवस्थित ठेवणे, काही कार्यालयीन कामे करणे, ज्यांना टंकलेखन येते त्यांनी त्या कामात मदत करणे, ज्यांच्याकडे कौशल्य आहे त्यांनी विजेची किंवा प्लम्बिंगची कामे करणे आणि तासाला ५० रुपये याप्रमाणे महिन्यात एक ठरावीक रक्कम शिकता शिकताच कमावणे, अशी ही योजना आहे. हा पैसा त्यांच्या शिक्षणासाठी कामी यावा, अशी अपेक्षा या योजनेद्वारे केली जाते.



गोंडवाना विद्यापीठाने गत वर्षीपर्यंत दोन भागात विभागलेल्या या योजनेसाठी ७० लाखांची तरतूद केली होती. आधीपासून लागू 'कमवा व शिका' योजनेंतर्गत २० लाख आणि विद्यापीठाच्या दशमानोत्सवानिमित्त लागू केलेल्या वीर बाबूराव शेडमाके 'कमवा व शिका' योजनेंतर्गत ५० लाख अशी अंदाजपत्रकातच तरतूद होती. आता मात्र, दोन्ही योजना एकत्र करून तब्बल ८० लाख रुपयांची तरतूद विद्यापीठाने केली आहे, ज्यासाठी हे विद्यापीठ अभिनंदनास पात्र आहे.

पण, या विद्यापीठाला एक तप पूर्ण झाले असतानाही कोविडपर्यंत 'कमवा व शिका' योजनेची साधी माहितीही महाविद्यालयांपर्यंत पोहोचली नव्हती; किंबहुना महाविद्यालयांनी ती गांभीर्याने घेतली नव्हती. ७० लाखांची तरतूद असतानाही २१६ संलग्नित महाविद्यालयांच्या या गोंडवाना विद्यापीठात केवळ ७ ते ९ महाविद्यालयांचेच प्रस्ताव येत असे. तरतूद केलेला निधी शिल्लक राहायचा. पण महाविद्यालयांकडून त्याचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नव्हता. हा मुद्दा विद्यापीठाच्या सिनेटमध्ये गाजला. नंतरच्या काळात विभाग गतिशील झाला आणि महाविद्यालयांत जाऊन-जाऊन प्रस्ताव मागितले गेले. तेव्हा कुठे गेल्या वर्षी दोन्ही योजनेतून प्रत्येकी २०-२० प्रस्ताव आलेत. या योजनेंतर्गत तरतूद वाढवून ७५ लाख रुपये विद्यापीठाने विविध महाविद्यालयांपर्यंत पोहोचविले.

आता या योजनेची खरी मेख किंवा दुर्दैव असे की, महाविद्यालये त्यांच्या प्रस्तावात भली मोठी यादी पाठवायचे आणि या योजनेतून विद्यापीठाने दिलेला पैसा आपल्या खात्यात जमा करायचे. तो पैसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही, अशी ओरड झाली आणि मग विद्यार्थी विकास विभागाने निर्णय घेऊन थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात या योजनेचे पैसे पाठवायला सुरुवात केली. असे होताच, अनेक महाविद्यालयांचा तिळपापड झाला. विद्यार्थी महाविद्यालयाच्या शुल्काची रक्कम भरत नाही म्हणून आम्ही या योजनेची रक्कम विद्यार्थ्यांच्या वतीने आमच्या खात्यात जमा करीत होतो. त्यामुळे ही रक्कम आमच्याच खात्यात टाका, अशी उलट ओरड सुरू झाली. खरे तर हा प्रकार या योजनेचा उद्देशच धाब्यावर बसवणारा आहे. मुळात खरेच विद्यार्थ्यांकडून कामे करवून घेतली जातात का, हाही प्रश्नच आहे. ज्यांच्याकडे शिक्षण शुल्क प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्यांची नावे या योजनेसाठी विद्यापीठांकडे पाठविणे, त्यातून आलेला पैसा महाविद्यालयाच्या खात्यात वळता करणे अशी कामे काही महाविद्यालयांकडून होत आहे. त्यास आता अंकुश बसला म्हणून उलट ओरड सुरू झाली आहे. जे आधी मोठ्या प्रमाणात प्रस्ताव पाठवायचे त्यांचे प्रस्ताव येणे बंद झाले आहे. विद्यार्थी कल्याणच्या योजनेवर असा डोळा ठेवणे महाविद्यालयांच्या प्रशासनाला शोभते का, हा येथे गंभीर मुद्दा आहे. या कल्याणकारी योजनेला हरताळ फासणारा हा एकूणच प्रकार लांच्छनास्पद आहे.

९८८१७१७८३२

## दखल

# शरद पवारांच्या मनात काय?

**मोरेश्वर बडगे**

शिल्लक राष्ट्रवादीचे सुप्रीमो शरद पवारांना समजून घ्यायला शंभर जन्म लागतील असे ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत म्हणाले होते, ते कधी कधी खरं वाटायला लागतं. सध्या सत्ताकारणात मोठ्या घडामोडी होत आहेत. पण शरद पवार गायब आहेत. त्यांनी अडीच वर्षाचे मुख्यमंत्रिपद देऊन फिटवलेल्या उद्धव ठाकरे यांची मात्र आदळआपट सुरू आहे. त्यामुळेच या दोघांचं नक्की चाललंय काय, असा प्रश्न पडतो. वक्फ सुधारणा विधेयक नुकतेच संसदेत संमत झालं. विरोधकांनी प्रतिष्ठेचा विषय बनवलेले हे महत्त्वाचे विधेयक. मात्र राज्यसभेतल्या मतदानाला शरद पवारांनी दांडी मारली. ठाकरे सेनेच्या खासदारांनी मात्र विरोधाची भूमिका पार पाडली. वक्फ विधेयक कुठल्याही परिस्थितीत पास होऊ देणार नाही अशी वेळोवेळी गर्जना करणाऱ्या शरद पवारांची ही गुगली काँग्रेसलाही चक्रावून गेली. वक्फला विरोध ही भूमिका 'इंडिया आघाडी'ने मागेच स्पष्ट केली असताना पवारांच्या असल्या वागण्याने संशयकल्लोळ वाढला आहे. पवार मतदानाला गेले असते तरी निकालात फरक पडला नसता. गायब राहून पवारांनी स्पष्ट संदेश दिला आहे. 'इंडिया आघाडी' संपली आहे. वक्फच्या मतदानाला न जाऊन पवारांनी 'इंडिया आघाडी'च्या शवपेटीवर शेवटचा खिळा ठोकला. पवारांनीच बाळंतपण केलेली महाविकास आघाडीही मोडीत निघाली आहे. तुम्ही पहा. या आघाडीतल्या घटक पक्ष नेत्यांची एकमेकांशी बोलती बंद आहे. बैठका दूर राहिल्या. भयाण शांतता आहे.

शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी जुळवून घ्यायला सुरुवात केली आहे का? पुण्यात झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आमंत्रण द्यायला खुद्द शरद पवार मोदींकडे गेले होते. नागपुरात झालेल्या दंगलीविषयीही पवार फारसे बोलले नाहीत. संभ्रमावस्था हा पवारांचा 'डीएनए' आहे. स्वतःला संशयाच्या कोशात ठेवून पवार राजकारण खेळले. आज त्यांचे वय ८४ वर्षे आहे. मग पवारांना रिटायर व्हायचे आहे का? ते शक्य नाही. निवृत्ती हा शब्द पवारांच्या डिक्शनरीत नाही. अजून तर मुलीचं करीअरही 'सेट' झालेलं नाही. मनात आणलं असतं तर पवारांना सुप्रिया सुळे या आपल्या मुलीला केव्हाही मुख्यमंत्रिपदी बसवता आले असते; पण ते झालं नाही. आता करतो म्हटलं तर ते शक्य नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचं किमान दोन-तीन निवडणुकीचं अॅडव्हान्स बुकिंग झालं आहे. मग या कोंडीत काय करणार? पुतण्या मागेच अख्खी पार्टी पळवून घेऊन गेला. आता शिल्लक पक्ष मुलीकडे देऊन मोकळे व्हायचे म्हटले तर पुन्हा पक्ष फुटणार. सुप्रिया सुळे यांचे नेतृत्व अनेकांना मान्य नाही. शरद पवारांकडे पाहून जुने सहकारी दिवस काढत आहेत. या वयातही शरद पवार दाबून राजकारण करू शकले असते. मात्र त्यांची विश्वासार्हता संपली आहे.



इतरांचे सोडा, त्यांचे जवळचे सहकारीही त्यांना विश्वासात घ्यायला तयार नाहीत. पवारांपुढे आता दोनच मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे भाजपाला पाठिंबा देऊन मोकळे व्हायचे. दुसरा मार्ग म्हणजे आपला उरलासुरला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करून टाकायचा. पवार कुठेही जाऊ शकतात. सोनिया गांधी विदेशी आहेत, असे सांगून त्यांनी राष्ट्रवादीचे दुकान मांडलं होतं. थोडा दम घ्या. एक दिवस असाही येईल, ज्या दिवशी पवार म्हणतील, कोण ठाकरे?

महाराष्ट्राच्या राजकारणात एवढा चिखल कधीही झाला नव्हता. उद्धव ठाकरे यांच्या सत्तालोलूप स्वभावाने राजकारण पार नासवले. २०१९ च्या निवडणूक निकालानंतर उद्धव ठाकरे पवारांच्या सापळ्यात अडकले नसते तर आज महाराष्ट्राचे राजकारण काही वेगळे असते. ती निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून लढवली होती. लोकांनी युतीच्या बाजूने कौल दिला. पवारांनी कान फुंकले. मुख्यमंत्री करतो म्हणाले. केवळ आणि केवळ मुख्यमंत्री व्हायच्या स्वार्थाने उद्धव तिकडे गेले. त्यांचे घोडे गंगेत न्हाले. मात्र अडीच वर्षांतच घरी बसावे लागले. तुम्ही इतिहास पहा. पवारांच्या मागे गेले ते सारे संपले. उद्धव ठाकरेंची शिवसेना भाजपासोबत होती तोपर्यंत ताकद होती. पवारांच्या नादी लागले तर बंड झाले नसते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंड केले. भाजपासोबत सत्ता मिळवली. उद्धव यांचे हात आज रिकामे आहेत. पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले, मुख्यमंत्रिपद गेले. उद्धव यांचा डोळा मुस्लिम व्होट बँकेवर होता. हिरव्या लुंगीत आलो तर मुसलमानांची मतं मिळतील अशा भ्रमात ते होते. आपण हिंदुत्व सोडलेले नाही असे आजही उद्धव म्हणतात. पण त्यांनी जे धरले ते तमाम हिंदूंना जागं करून गेले. लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटिव्ह चालला. त्याचा भाजपाला तडाखा बसला. मोदींची उडी कमी पडली. त्या नंतर अवघ्या चार महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने चुकीची दुरुस्ती केली. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा बनू पाहणारी ठाकरे सेना अवघ्या २० आमदारांवर लोकांनी गुंडाळली. यातले १० आमदार तर मुंबईतले आहेत. पवारांच्या नादी लागण्याची फळं उद्धवच नव्हे तर काँग्रेसही भोगत आहे. महाराष्ट्रात पूर्वी चार पक्षात राजकीय लढाया व्हायच्या. शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फुटले. चारचे सहा पक्ष झाले. यातले दोन पक्ष २०२९ च्या निवडणुकीत संपलेले असतील. उद्धव आणि शरद पवार यांच्या पक्षांना भवितव्य नाही. शरद पवारांना तशीही शिवसेना संपवायची होती. संपेल. पवारांचं राजकारणही संपेल. पवारांनी कुठला पक्ष वाढवला आहे? एक उदाहरण सांगा. त्यांच्यासोबत गेले ते सारे संपले. भविष्यात भाजपा आणि राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेस असे दोनच पक्ष जिवंत राहतील. राष्ट्रीय पक्ष असल्याने इकडून तिकडून दोन आकडी स्कोअर काँग्रेसला मिळू शकतो. पण तुम्ही लिहून घ्या. काँग्रेस आता सत्तेत येणे शक्य नाही. राहुल नावाचा ब्रँड तीनदा लाँच करूनही फेल गेले. लोक मोदींना कंटाळतील तेव्हा आपलीच सत्ता अशा स्वप्नरंजनात राहुल गांधी आहेत. पण धर्मनिरपेक्षतेचा बागुलबुवा पुढे करून किती काळ वाचवायचे? काँग्रेसला वाचवण्याच्या धडपडीत आपल्याला हुतात्मा व्हावे लागेल, हे कार्यकर्त्यांनाही पूर्णपणे उमगू लागले आहे.

या पृष्ठभूमीवर भाजपाने अवघ्या ४४ वर्षांत कमावलेली कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. विश्वासार्हता आणि राष्ट्रवाद या जोरावर भाजपाची ही कमाई आहे. २४ तास इलेक्शन मोडमध्ये असतो. मुख्य म्हणजे इच्छाशक्ती आहे. स्थापना दिनाच्या निमित्ताने भाजपाने उपराजधानी नागपुरात स्वतःचे प्रशस्त पक्ष कार्यालय उभे करायचे योजिले आहे. जुने कार्यकर्ते आनंदराव ठवरे यांनी या कामी स्वतःची देणगी जाहीर केली तेव्हा नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यांसारख्या दिग्गज नेत्यांनी देणग्यांचा पाऊस पाडला. काँग्रेसलाही स्वतःचं टोलेजंग ऑफिस उभं करता आलं असतं. अनेक वर्षे काँग्रेसची राज्यात सत्ता होती. पण काँग्रेसवाले देवडिया भवनापलीकडे विचार करू शकले नाहीत. ३०-४० वर्षांपूर्वी भाजपाच्या कार्यकर्त्यांना खेड्यात घर शोधताना खूप विचार करावा लागे. आज भाजपा खेडोपाडी पसरला आहे. नितीन गडकरी यांची तपश्चर्या यामागे आहे. गडकरींनी विदर्भात भाजपा वाढवला. सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे अशा ताकदीचे नेते गडकरींनी पक्षात आणले. पुढे देवेंद्र फडणवीसांनी पक्षाला मोठ्या उंचावर नेले. 'हमारे पास गडकरी, फडणवीस है' असे कार्यकर्ते अभिमानाने म्हणतात. काँग्रेसवाल्यांकडे घ्यायला नाव आहे?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## मंदिरांची संपत्ती आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी

प्रलंबित वक्फ विधेयक पारित झाल्यानंतर समाजामध्ये विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी या पृष्ठभूमीवर हिंदू मंदिरांचे सरकारीकरण करून त्यांच्या संपत्तीचा ताबा घेण्याची मागणी केली आहे. एका लेखात असे नमूद करण्यात आले होते की, मंदिरांमधील दानपेट्यांमध्ये कुजत पडलेल्या संपत्तीचा वापर देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी करावा. धर्मनिरपेक्ष देशामध्ये केवळ एका विशिष्ट धर्माच्या प्रार्थनास्थळांवरील संपत्तीचा ताबा सरकारने घेणे कितपत योग्य आहे? हा प्रश्न येथे उपस्थित होतो. शिवाय, मंदिरांमधील संपत्ती कुजत पडलेली असते, हा दावा चुकीचा आहे. तिरुपती बालाजी ट्रस्ट, शिर्डी साईबाबा ट्रस्ट, गुरुवायूर मंदिर ट्रस्ट यांसारख्या संस्था वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात कोट्यवधींची गुंतवणूक करीत असतात. म्हणजेच ही संपत्ती कुजत नाही, तर समाजोपयोगी कार्यात वापरली जाते. नुकत्याच पार पडलेल्या कुंभमेळ्यामुळे प्रचंड आर्थिक उलाढाल झाली. देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली. आंतरदेशीय पातळीवरील मोठे गुंतवणूकदार तेथे गुंतवणूक करायला उत्सुक आहेत. यावरून स्पष्ट होते की, मंदिर- कुंभमेळ्यासारखी धार्मिक आयोजने ही देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणारी ठरतात. आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न अत्यंत गंभीर आणि संवेदनशील आहे. केवळ कर्जमाफी हे एकमेव उपाय नाही. यामागील कारणे शोधायला हवीत. कुणी शेतीशिवाय अन्य कर्जातही अडकलेला असू शकतो, तर कुणी व्यसन आणि कमी कालावधीत जास्त उत्पन्न घेण्याच्या मोहात पडून नुकसान झालेला असू शकतो. शेतकऱ्यांना शाश्वत आधार देण्यासाठी शेतीसाठी समस्यांच्या मुळावर उपाय करणे आवश्यक आहे. व्यसन आणि प्रलोभनांच्या आहारी गेलेल्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी मार्गदर्शन करणे, मूलभूत सुविधा प्रदान करणे, प्रगत तंत्रज्ञान आणि त्याचे प्रशिक्षण देणे, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे, सिंचन व्यवस्था, कृषी शिक्षण आणि सहकारी कंपन्यांची निर्मिती अशा विविध उपाययोजना करणे आवश्यक आहेत. म्हणूनच मंदिरांची संपत्ती वापरून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील, हा दृष्टिकोन व्यवहार्य नाही आणि तो एका बाजूने पक्षपाती ठरतो.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### हनुमंताच्या कार्यातून मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास

हजारो वर्षांपासून आपण रामभक्त हनुमानाची भक्ती करीत आलो आहोत. हनुमंताची दास्यभक्ती हे परमोच्च आदर्शाचे प्रतीक आहे. प्रभू रामासारख्याच उच्च स्थानावर हनुमंताचे स्थान आपल्या हृदयात आहे. हनुमंताचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमेला झाला. जन्मताच त्यांनी आपल्या अद्‌भुत शक्ती चे प्रदर्शन केले आणि सूर्याला फळ समजून गिळण्यासाठी झेप घेतली. सप्तचिरंजीवांपैकी एक असलेले वीर हनुमान हे केवळ त्यांच्या शौर्यासाठीच प्रसिद्ध नाहीत, तर ते सकल शास्त्रांचे अभ्यासक होते. तत्त्वज्ञान, राजनीती, संगीत, भाषाशास्त्र, बुद्धीचे वरदान आणि वक्तृत्वकला या सर्व गुणांमध्ये ते पारंगत होते. आजकाल आपण मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेगवेगळ्या वर्गांना प्रवेश देतो. मात्र, जर पालकांनी मुलांना हनुमानाचे चरित्र वाचायला दिले, तर त्यांच्या कार्यातून व विचारांमधून मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास नक्कीच घडू शकतो. उदाहरणच द्यायचे राहिले तर रामायणातील एक प्रेरणादायी प्रसंग सांगू शकतो. भगवान श्रीराम सीतेचा शोध घेत असताना ऋष्यमूक पर्वताजवळ आले. त्यावेळी सुग्रीवाने त्यांना पाहिले. त्याला वाटले की, वालीनेच त्यांना आपल्याला मारण्यासाठी पाठवले आहे. म्हणूनच तो त्यांची पारख करण्यासाठी हनुमंताला पाठवतो. हनुमंत ब्राह्मणाचा वेष धारण करून श्रीराम आणि लक्ष्मण यांच्याकडे जातो. वेदशास्त्रसंपन्न असलेला हनुमंत आपल्या संभाषण चातुर्याने राम-लक्ष्मणाचा परिचय जाणून घेतो. अतिशय आदराने त्यांचे मनोगत जाणून घेतो आणि संपूर्ण खात्री झाल्यावरच आपले खरे रूप प्रकट करतो आणि रामाच्या चरणी नतमस्तक होतो. श्रीरामांनी मात्र त्याला केव्हाच ओळखलेले असते. दूत म्हणून संवाद कसा साधावा, याचा आदर्श हनुमंत दाखवतो. हनुमंताची रामभक्ती, समर्पण, चातुर्य, बुद्धिमत्ता, कौशल्य हे सगळं आत्मसात करायचे असेल तर हनुमानाला शरण जाऊया. उत्साहात आणि भक्ती भावात हनुमान जयंती साजरी करूया.

**रमा देशमुख**/नागपूर

### पाणीपुरवठ्याची समस्या

गेल्या अनेक दिवसांपासून लक्ष्मीनगर झोनमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पाण्याची कमतरता भासते आहे. अनेक घरांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाहीये. चौकशी केली असता आमचे काम सुरू आहे. लवकरच सुरळीत पाणी पुरवठा सुरू होईल असा दिलासा मिळतो, परंतु अजूनही समस्येचे निराकरण झालेले नाही. त्यामुळे सामान्य जनता त्रस्त आहे. उन्हाळ्याच्या पृष्ठभूमीवर नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा व्हायला हवा. या संदर्भात मनपाकडे अनेक तक्रारी येतात. इतक्यात बरेच ठिकाणी दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने तशी आगाऊ नोटीस देऊन पूर्ण दिवस पाणी पुरवठा बंद केला जातो. तो सुरू केल्यानंतर कमी दाबाने पाणी पुरवठा केला जातो. यावर तातडीने उपाययोजना व्हावी.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



सोलापूर : होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांची २७० वी जयंती होमिओपॅथी संघटनेच्यावतीने साजरी झाली. याप्रसंगी पुष्पहार अर्पण केल्यानंतर डॉ. सुनील वरळे, अनिरूद्ध वरळे.




सोलापूर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सोलापूर विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले तसेच आ. देवेंद्र कोठे यांनीही पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार उपस्थित होते.



### सोलापूर विद्यापीठात ध्यान आणि अध्यात्मिक विज्ञान कार्यक्रम संपन्न

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सोलापूर स्पिरिचुअल सायन्स सोसायटी मुव्हमेंटतर्फे येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ध्यान आणि अध्यात्मिक विज्ञान या विषयावर कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे अध्यक्ष होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, वित्त व लेखा अधिकारीमहादेव खराडे उपस्थित होते. सिनियर पिरॅमिड मास्टर्स दीपा मेहता व उन्मनी जंगे यांनी ध्यानाचे विज्ञान व श्वास विज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. सोलापुरात जुना विडी घरकुल हैदराबाद रोड येथील यशोधरा हॉस्पिटलच्या बाजूला गणेश पिरॅमिड ध्यान मंदिरात दररोज सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत ध्यान मंदिर सर्वांसाठी खुले असते. तेथे दर रविवारी सकाळी ८ ते ९ सामूहिक ध्यान घेतले जाते. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रशेखर रेड्डी यांनी यावेळी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य बी.बी. पुजारी व आनंद गांगजी यांचे लाभले. तसेच स्वाती दुधणकर, कविता मिरजगावकर, व्यंकटेश आडम, प्रकाश पागुल, विनायक धारा, श्रीनिवास पुला यांनी परिश्रम घेतले आहे.

### पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

चारित्र्याच्या संशयावरून व पैशासाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आकांक्षा अमर तुपदौर (वय २३, रा. मेथोडीस्ट चर्चजवळ, मसिहा चौक, मोदी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अमर, सासू कविता, नणंद श्रृती (रा. गणेश चाळ, देहू रोड, पुणे), नणंद प्रिती सुकनपल्ली, नंदावा राजशेखर (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जानेवारी २०२१ ते ६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आकांक्षा या पती अमर व त्याच्या कुटुंबियासमवेत सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती अमर व इतरांनी मिळून आकांक्षा हिस लग्नात मानपान केला नाही म्हणून पाच तोळे सोने व दहा लाख रुपये माहेरून आण म्हणून मारहाण करून शिवीगाळ करून छळ केला. तसेच पती अमर याने आकांक्षाच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मानसिक त्रास दिला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

Classifieds

**पाहिजेत**

नॅशनल मेडिकल, लष्कर येथे होलसेल व रिटेलमध्ये कामासाठी सेल्समन व डिलीव्हरी बॉय पाहिजेत.
संपर्क:
7219068881

**घर भाड्याने देणे आहे**

सुसज्ज आणि प्रशस्त 2 BHK 2 फ्लॅट शाकाहारी कुटुंबास भाड्याने देणे आहे. आयएमएस पासून जवळ श्री राम चौक, कासार सोसायटी, जुळे सोलापूर. २४ तास पाणी, शांत आणि सुसज्ज परिसर, सीसीटीव्ही आणि पार्किंगची सोय.
- संपर्क नंबर -
9860139889 / 9822162454

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराची सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# ‘वक्फ’ वरुन उद्धव ठाकरे यांचे फाडले पोस्टर

## उबाठा शिवसेना उपशहरप्रमुख चव्हाण यांनी दिला राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

वक्फ बोर्ड सुधारणा विधायकावरून उबाठा शिवसेना गटाचे उपशहरप्रमुख ओंकार चव्हाण यांनी गुरुवारी दुपारी चार हुतात्मा पुतळा चौकात पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचे पोस्टर फाडत निषेध नोंदवित पदाचा राजीनामा दिला. तर माथेफिरु असलेल्या भाजपचा हस्तक ओंकार चव्हाण याला यापूर्वीच विधानसभा निवडणूकीत भाजप चे काम केल्याने पदावरून हटवले असून तो सामान्य सभासद ही नाही, अशा भ्याड कृत्यामुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या असून त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाईची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांनी केली आहे.



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विरोधात गुरुवारी दुपारी सोलापुरातील चार हुतात्मा पुतळा चौकात उपशहरप्रमुख ओंकार चव्हाण यांनी उद्धव ठाकरे यांचे पोस्टर फाडत निषेध नोंदविला. या घटनेमुळे शिवसैनिकांमध्ये तीव्र संताप पसरला.

उद्धव ठाकरे यांनी वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध करत बिल मंजूरीला खासदारानी विरोध केला आणि त्यांनी हिंदुत्व सोडले. त्यामुळे आपण पक्षाचा राजीनामा देत आहोत असे ओंकार चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

## कायदेशीर कारवाई करण्याची उबाठा शिवसेनेची मागणी



ओंकार चव्हाण यांनी निषेध व्यक्त केल्यानंतर काही वेळातच शिवसैनिकांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त करीत ही केवळ खाजगी वैयक्तिक मतांची आक्रमक पद्धतीने मांडणी नसून पक्षविरोधी व अनुशासनभंग करणारा प्रकार असल्याचे सांगितले. या माथेफिरूवर तत्काळ कारवाई करून अटक करावी अन्यथा शिवसैनिक त्याला त्याची जागा दाखवतील असे जिल्हाप्रमुख अजय दासरी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले. पक्षविरोधी कारवाई केल्याने ओंकार चव्हाण याला पदावरून यापूर्वीच हटवले असून, त्याचे पक्षाशी कोणतेही संबंध नाहीत, असेही जाहीर केले आहे. याचबरोबर शिवसेना पदाधिकाऱ्यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी उपजिल्हाप्रमुख दत्ता गणेशकर यांनी केली.यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, शहरप्रमुख महेश धाराशिवकर, दत्ता वानकर, विधानसभाप्रमुख दत्ता माने, निवडणुक यंत्रणा प्रमुख शशिकांत बिराजदार, कामगार सेना सचिव अजय खांडेकर, उपशहरप्रमुख चंद्रकांत मानवी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## व्हॅलेंटाईन सर्कल स्कूल येथे समर कॅम्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये समर कॅम्प उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये डॉज बॉल, क्रिकेट, बेसबॉल, बॉस्केट बॉल,तर चित्रकला विभाग मध्ये आर्ट क्राफ्ट व डान्स मध्ये क्लासिकल डान्स ठेवण्यात आले आहे.

सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील, शिवाजी आवताडे व लावण्या दुस्सा, इंद्रजीत चव्हाण व ऐश्वर्या पवार यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर पर्यवेक्षिका सौ सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा ,मेहजबीन शेख, उमा कोडम, रेखा बाबानगरे, भगतलाल सुतार,मधुस्मिता अच्युगटला, भाग्यश्री गिडवीर, नता लोहार उपस्थित होते. तसेच शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष श्री उमाकांत मेंढापुरे उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## आयटी क्षेत्रातील व्यवसायिकांसमवेत संवाद

### सोलापूर सोशल फाउंडेशनचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

सोलापूर शहरातील आयटी क्षेत्रातील व्यावसायिक व उद्योजकांच्या समवेत सोलापूर सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष आ. सुभाष देशमुख यांनी संवाद साधत शहरातील सध्याच्या आयटी क्षेत्रातील व्यवसाय वाढीसाठी असणाऱ्या संधी व अडचणीबाबत चर्चा केली.

या बैठकीला डॉ. राजीवकुमार मेंते, डॉ. नरेंद्र काटीकर, सोलापूर सोशल फाउंडेशन मुख्य समन्वयक विजय पाटील, शाम येमूल, हर्षदा महाजन, प्रियांका स्वामी, अमृता बडे, यांच्यासह प्रा. प्रतिभा येळगी, सोमशेखर आळंद, अमोल काळे, शशांक देशपांडे, तपन मंगेपल्ली यांच्यासह, विविध आयटी व्यावसायिक, प्राध्यापक उपस्थित होते. या बैठकीत उपस्थितांचे आयटी क्षेत्रातील सध्याचे अनुभव व शासन स्तरावर अथवा व्यवसाय वाढीसाठी काय आवश्यक आहे याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी सोलापूर शहरात कार्यरत असणार्या आयटी कंपन्या व उत्तीर्ण होणारे विद्यर्थ्यांमध्ये समन्वय साधने, सोलापूरमधील कार्यरत आयटी कंपन्यांमध्ये स्टाफ भरतीसाठी स्वतंत्र वेबसाईट तयार करणे, आयटी क्षेत्रातील कार्यरत कर्मचार्यांच्या विकेंड साठी सोलापुरातील पर्यटन वाढीस प्रोत्साहन देणे, आयटी कंपन्यांच्या माध्यमातून बचत गटांच्या उत्पादित मालाला ऑनलाइन प्लॅटफॉर्म मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, शहर व जिल्ह्यातील प्रसिद्ध स्थळांचे मार्केटिंगसाठी स्वतंत्र ॲप विकसित करणे, शहरात छोट्या छोट्या आयटी कंपन्या रजिस्टर करून रोजगार उपलब्ध करून देणे, आयटी व्यवसायात आर्थिक गरजेसाठी बँकांचा सपोर्ट मिळवून देणे, इंजिनियरिंग झालेला विद्यार्थ्याला सोलापूर मध्येच नोकरी करेल यासाठी कार्यशाळा आयोजित करणे आदी विषयांवर आ. देशमुख यांनी व्यावसायिकांशी सविस्तर चर्चा केली.



### सोलापुरातच रोजगार निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा

सोलापुरातील तरूणांनी मा. सुधा मूर्ती यांचे उदाहरणं डोळ्यासमोर व्यवसायात काम करायला हवे, सोलापूरची उंची वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, सोलापुरातील तरुणांसाठी सोलापुरातच रोजगार निर्मिती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करावी, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

## समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहचावी

### अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

शहरी व ग्रामीण भागातील जनतेच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासन विविध लोखाभिमुख योजना राबवित आहे. या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचला पाहिजेच तसेच एकही पात्र लाभार्थी शासनाच्या योजनांपासून वंचित राहणार याची दक्षता घ्यावी, अशा सूचना अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी केल्या.

शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत उत्तर तहसिल कार्यालय सोलापूर यांच्यावतीने विशेष शिबिराचे आयोजन रंगभवन येथील सभागृहात केले होते. आमदार सुभाष देशमुख, महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, तहसिलदार निलेश पाटील, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, गट विकास अधिकारी बाबासाहेब पाटील तसेच अधिकारी कर्मचारी व लाभार्थी नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.



यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर म्हणाल्या, शासनाच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना भुमिहिन लाभार्थी, शिधापत्रिका वाटप, गोपिनाथ मुंढे अपघात विमा सानुग्रह अनुदान योजना अशा विविध योजना मोठ्या प्रमाणावर राबविल्या जात आहे. या योजना पात्र लाभार्थी पर्यंत पारदर्शी पोहोचविण्यासाठी आवश्यक दक्षता घेवून कार्यवाही करावी.

शिबिरात ४२ ब सनद- ९० लाभार्थी, ४२ ड सनद- ३५ लाभार्थी, पोटखराब प्रकरणे -२८० लाभार्थी, कलम ५५ आदेश- २५ लाभार्थी, भुविकास बैंकेचा बोजा नोंद कमी २९ लाभार्थी, तगाई बोजा नोंद कमी-१३६ लाभार्थी, संगायो लाभार्थी आदेश १२० लाभार्थी, गोपिनाथ मुंढे अपघात विमा सानुग्रह अनुदान योजना प्रकरणे-२ लाभार्थी, शिधापत्रिका वाटप-५० लाभार्थी, प्रधानमंत्री आवास योजना भुमिहिन लाभार्थी-८ एकुण लाभार्थी ७७५ यांना यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात आदेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी निमंत्रीत मान्यवरांनी उपस्थित लाभार्थी व नागरिक यांना शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत विशेष शिबीराच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी केले व आभार तहसिलदार निलेश पाटील यांनी केले.

### जाहीर नोटीस

आमचे अशिलांनी सांगितलेवरून व त्यांनी दिलेले माहितीवरून तमाम लोकांस ॲड. निलीमा नरहर खिरे यांचेमार्फत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करून कळविणेत येते की,

तुकडी सोलापूर पोट तुकडी तालुका सांगोला पैकी मौजे राजुरी हद्दीतील सोलापूर अधिकार क्षेत्रातील सांगोला पंचायत समिती हद्दीतील राजुरी ग्रामपंचायत हद्दीतील गाव मौजे राजुरी येथील खालील परिशिष्टामधे नमुद केलेली जमीनी तीचे विद्यमान मालक श्री. अजय रमेष मुंदडा, राहणार १३२/२, गुरूवार पेठ, माधवनगर, सांगली ४१६४०६, यांचे खरेदी मालकी वहीवाटीचे आहे.

अ) गट नं.७१२/३/१ एकुण क्षेत्र १३२ हेक्टर २८ आर पैकी क्षेत्र १४ हेक्टर ०० आर पैकी क्षेत्र ०३ हेक्टर २० आर यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - गट नं.५९४, दक्षिणेस - गट नं.७१२/१, पश्चिमेस - गट नं.७१३, उत्तरेस - गट नं. ७११.

ब) गट नं.७११/२/इ/२ एकुण क्षेत्र ०४ हेक्टर ०० आर पैकी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर ६३ आर यांसी चतुःसिमा :-

पुर्वेस - गट नं. ७११ भाग, दक्षिणेस - गट नं. ७१२ भाग, पश्चिमेस - स्वप्नील मोकाशी यांची मिळकत, उत्तरेस - गट नं. ७११/१ भाग.

क) गट नं.७११/१ एकुण क्षेत्र २१ हेक्टर ९२ आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर ५२ आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर १२ यांसी चतुःसिमा :- पूर्वस - गट नं. ७११ भाग, दक्षिणेस - गट नं. ७१२ भाग २, पश्चिमेस - स्वप्नील मोकाशी यांची मिळकत, उत्तरेस - गाव मौजे जवाला शीव.

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक अविभक्त हिश्याचे क्षेत्र त्यामधील दगडमाती, झाडझाडोरा, बांधताली, पाणी येण्याजाण्याचे मार्ग, येण्याजाण्याचे रस्ते, हवा उजेड घेण्याचे हक्क वगैरे तदंगभुत वस्तु व तदनुषंगिक वहिवाटीचे हक्कांसहित. (येथुन पुढे 'सदर जमीन' म्हणून संबोधली आहे.)

वर नमुद केलेल्या जमीनी मुख्य रस्त्यापासमन सदर जमीनीत प्रवेश घेण्याचे हक्कासह तीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांना खरेदी देण्याबाबत बोलणी चालू असून सदर जमीनी निर्वेध व बोजारहीत असलेबाबत त्यांनी आमचे अशिलांना भरवसा दिलेला आहे.

तरी वरील जमीनींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, लिन, व्यवस्थापत्र, पोटगी, कुळ, हक्क, खंड, करार, ताबा, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, अथवा तत्सम कोणत्याही स्वरुपाचा हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर येवून मुळ कागदपत्रांनिषी आमची खात्री पटवून द्यावी. याप्रमाणे ठरलेले मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास सदर जमीन ही संपूर्णपणे बोजारहीत, निर्वेध अषी असून सदर जमीनीवर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क व अधिकार नाही व तसा तो असल्यास त्यांनी तो जाणिवपुर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल ठरल्याप्रमाणे सदरचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसलीही तकार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. निलीमा नरहर खिरे.
बी.कॉम.एल.एल.बी.
डि/१, हरनाम रेसिडेन्सी, भांगरवाडी,
लोणावळा ४१०४०१
मो.नं.९८२२५४२४९६/९७६७२१४६१३

### भारत सरकार
### रेल्वे मंत्रालय

रेल्वे भर्ती बोर्ड
असिस्टंट लोको पायलट (एएलपी) ची भरती 01/2025
सांकेतिक सूचना

खालील तक्त्यामध्ये दिलेल्या असिस्टंट लोको पायलट पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे.

**अर्ज उघडण्याची तारीख : 12-एप्रिल-2025, अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : 11-मे-2025 (23:59 वाजता)**

| पदनाम | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतन स्तर | प्रारंभिक वेतन (रु.) | शैक्षणिक आणि वैद्यकीय मानक | 1.7.2025 अनुसार वय | एकूण रिक्त पदे (सर्व आरआरबी) |
|---|---|---|---|---|---|
| असिस्टंट लोको पायलट (एएलपी) | 2 | 19,900/- | तपशिलवार सीइएनचे परिशिष्ट-अ | 18 - 30 वर्षे | 9970 |

उमेदवारांनी भर्ती प्रक्रीयेच्या प्रत्येक टप्प्यावर आधारकार्ड नसलेल्या अर्जांची विशेष तपशीलवार छाननी केल्यामुळे होणारी गैरसोय आणि अतिरिक्त विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरताना आधारकार्डचा वापर करून आपला प्राथमिक तपशील पडताळावा, अशी सक्त सूचना करण्यात येत आहे. आधार कार्डचा वापर करून पडताळणी यशस्वीपणे पार पाडण्याच्या उद्देशाने आधार कार्डमधील नाव आणि जन्मतारीख ही दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्रामध्ये उपलब्ध असलेल्या पूर्ण नाव आणि जन्मतारखेशी 100 % जुळण्यासाठी आधारकार्ड अद्यावत केलेले असावे. त्याचप्रमाणे ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी नवीनतम फोटो आणि नवीनतम बायोमेट्रिक्स (हाताचे ठसे आणि डोळ्यांची बुबुळे) सह आधारकार्ड अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे.

ही अधिसूचना पूर्णपणे सूचक स्वरुपाची आहे. संपूर्ण तपशिलासाठी, अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी सीइएन क्र.01/2025(एएलपी) तपशिलवारपणे वाचून काढावा, असे सुचित करण्यात येते. उपरोक्त भर्तीशी संबंधित कोणतेही शुद्धीपत्र / पुरकपत्र / महत्वपूर्ण सूचना वेळोवेळी खाली सूचीबद्ध केलेल्या आरआरबीच्या वेबसाईट वरून जारी केली जाईल.

| सीईएन 01/2025 मध्ये भाग घेणाऱ्या आर आर बी च्या वेबसाईट | | | |
|---|---|---|---|
| अहमदाबाद www.rrbahmedabad.gov.in | अजमेर www.rrbajmer.gov.in | भोपाळ www.rrbbhopal.gov.in | भुवनेश्वर www.rrbbbs.gov.in |
| बिलासपूर www.rrbbilaspur.gov.in | चंडीगड www.rrbcdg.gov.in | चेन्नई www.rrbchennai.gov.in | गुवाहाटी www.rrbguwahati.gov.in |
| जम्मू श्रीनगर www.rrbjammu.nic.in | कोलकाता www.rrbkolkata.gov.in | मालदा www.rrbmalda.gov.in | मुंबई www.rrbmumbai.gov.in |
| मुझफ्फरपूर www.rrbmuzaffarpur.gov.in | पटना www.rrbpatna.gov.in | प्रयागराज www.rrbald.gov.in | रांची www.rrbranchi.gov.in |
| सिकंदराबाद www.rrbsecunderabad.gov.in | सिलीगुडी www.rrbsiliguri.gov.in | तिरुवनंतपुरम www.rrbthiruvananthapuram.gov.in | गोरखपूर www.rrbgkp.gov.in |

क्र. आरआरबी/एससी/भरती/सीइएन 01/2025(एएलपी)
दिनांक : 11-04-2025
अध्यक्ष
रेल्वे भर्ती बोर्ड

SUN 23 “टाउट्स, दलाल आणि जॉब रॅकेटर्सपासून सावध रहा”

### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर येथील मध्यवर्ती रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 07-2025-SrDENC | दोन वर्षांच्या कालावधीसाठी SSE/P.Way/USFD/SUR अंतर्गत USFD ओपन लाइन टीमसोबत काम करण्यासाठी सेवा प्रदान करणे. | रु. ४,१६,८३,९३१.५० | रु. ३,५८,४००.०० | २४ महिने | शुन्य |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | ०५.०५.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत | | | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | ०५.०५.२०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता | | | | |

या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.In.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 66 अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर येथील मध्यवर्ती रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 08-2025-SrDENC | FB वेल्डेड जॉइंट्सची टप्प्याटप्प्याने ॲरे अल्ट्रासोनिक चाचणी (PAUT) एका वर्षाच्या कालावधीसाठी ADEN/PVR आणि ADEN/LUR उपविभागांतर्गत RDSO सत्यापित PUT वेल्ड टेस्टर वापरून साइटवरील मोबाइल FB प्लांटद्वारे केली जाते. | रु. ४,४८,०५,९९२.४० | रु. ३,७४,०००.०० | १२ महिने | शुन्य |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | ०८.०५.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत | | | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | ०८.०५.२०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता | | | | |

या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.In.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 67 अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेसाठी गुकेशला आनंदचा पाठिंबा

**मुंबई** : आगामी २६ मे ते ६ जून दरम्यान स्टॅव्हेंजर येथे या वर्षीची नॉर्वे बुद्धिबळ २०२५ बुद्धिबख स्पर्धा होणार असून जगातील सर्वात अपेक्षित स्पर्धेत सर्वात तरुण विश्वविजेता गुकेश डोम्मराजू आणि प्रथम विश्वमानांकित नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन सामना करणार आहेत. या स्पर्धेत गुकेशच जिंकेल, आपला त्याला पूर्ण पाठिंबा असेल, असे पाच वेळा विश्वविजेता विश्वनाथन आनंदने म्हटले आहे. नॉर्वे बुद्धिबळ आणि क्रीडा पत्रकार संघटना (एसजेएएम) द्वारे मुंबईत आयोजित एका कार्यक्रमाला आभासी माध्यमातून संबोधित करताना आनंद बोलत होता. चेन्नईच्या डी. गुकेश या प्रतिभावान खेळाडूला आपला पूर्ण पाठिंबा असेल. त्याला मॅग्नस कार्लसनचा पाठलाग करण्यासाठी प्रेरणा किंवा दृढनिश्चयाची कमतरता भासणार नाही, असे आनंद आभासी माध्यमाने कार्यक्रमात उपस्थित राहून म्हणाला. १८ वर्षीय गुकेशने २०२४ मध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्याने टाटा स्टील मास्टर्स जिंकले आहेत, बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. कॅण्डिडेट स्पर्धेत वर्चस्व गाजवले आहे आणि शेवटी क्लासिकल बुद्धिबळात अंतिम पारितोषिक जिंकले आहे: गत डिसेंबरमध्ये सिंगापूरमध्ये झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपदही पटकावले आहे.

### सॅमसनला २४ लाखांचा दंड

**अहमदाबाद** : बुधवारी सायंकाळी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्ध ५८ धावांनी पराभव पत्करावा लागला तेव्हा राजस्थान रॉयल्सचा (आरआर) कर्णधार संजू सॅमसनला संथ गतीने षटके टाकल्याबद्दल २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सॅमसन आणि संपूर्ण आरआर संघाला आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत दंड ठोठावण्यात आला आहे. इम्पॅक्ट प्लेअरसह अंतिम एकादशमधील उर्वरित सदस्यांना ६ लाख रुपये किंवा त्यांच्या संबंधित सामना शुल्काच्या २५ टक्के, जे कमी असेल ते दंड ठोठावण्यात येईल, असे आयपीएलने गुरुवारी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. हा आरआरचा दुसरा गुन्हा आहे. यापूर्वी आरआरचा पहिला गुन्हा रियान परागच्या नेतृत्वाखालील झाला होता, तेव्हा त्याला गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) विरुद्धचा सामना जिंकल्यानंतर १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्या सामन्यात, सॅमसन त्याच्या बोटाच्या दुखापतीमुळे केवळ इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळत होता.

### लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये कम्पाऊंड तिरंदाजीचा समावेश

**नवी दिल्ली** : २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये कम्पाऊंड तिरंदाजीचा ऑलिम्पिक पदार्पण होत असल्यामुळे भारताचा दिग्गज तिरंदाज रजत चौहानने आनंद व्यक्त केला आहे. माझे स्वप्न प्रत्यक्षात येत आहे, असे तो म्हणाला. २०१४ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या या खेळाडूने नेहमीच ऑलिम्पिक पदकाचे स्वप्न पाहिले. २०१६ मध्ये त्याच्या उजव्या हातावर पाच ऑलिम्पिक रिंगचे टॅटू सुद्धा काढला आहे. हा संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा क्षण आहे, कारण कम्पाऊंड तिरंदाजी संघाला अखेर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. मला २०१६ मध्ये ऑलिम्पिक टॅटू मिळाला होता. ही बातमी कळली, तेव्हा मला रात्रभर झोप लागली नाही. मी खूप उत्साहित आहे, असे चौहानने सांगितले. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने लॉस एंजेलिसमधील तिरंदाजी कार्यक्रमात कम्पाऊंड मिश्र संघ स्पर्धेचा समावेश करण्याची घोषणा केल्यानंतर कम्पाऊंड तिरंदाजांसाठी पहिले ऑलिम्पिक पदक २०२८ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत देण्यात येणार आहे. कम्पाऊंड मिश्र संघ स्पर्धा सध्याच्या पाच रिकर्व्ह स्पर्धांमध्ये सहभागी झाली आहे - पुरुष आणि महिला वैयक्तिक, पुरुष आणि महिला संघ आणि मिश्र संघ- ज्यामुळे उपलब्ध असलेल्या तिरंदाजी पदकांची संख्या सहा झाली आहे.

# संघर्षशील सीएसके, केकेआर आमने-सामने

**चेन्नई, १० एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये एम. ए. चिदम्बरम् स्टेडिमवर शुक्रवारी चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. यशापासून वंचित असलेल्या समर्थकांसमोर पराभवांची निराशाजनक मालिका मोडून काढण्यासाठी अडचणीत सापडलेल्या पाच वेळच्या विजेत्या चेन्नई सुपर किंग्जसमोर गतवर्षीच्या विजेत्या कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धचे आव्हान असेल.

दहा संघांच्या आयपीएल गुणतालिकेत सध्या केकेआर चार गुणांसह सहाव्या स्थानावर आहे, तर सीएसके दोन गुणांसह तळाच्या नवव्या स्थानावर आहे. या महत्त्वाच्या सामन्यात पराभवामुळे सीएसकेला अधिक अडचणी येऊ शकतात. मुल्लानपूर येथे झालेल्या गत सामन्यात चेन्नई संघाला पंजाब किंग्जकडून १८ धावांनी पराभव पत्करावा लागला होता, मात्र या सामन्यात सीएसकेच्या फलंदाजांनी प्रभावी कामगिरी केल्यामुळे थोडा दिलासा मिळाला. आता त्यांना



ऋतुराज गायकवाड



अजिंक्य रहाणे

एम.ए. चिदम्बरम् स्टेडियमच्या खेळपट्टीवर नशीब बदलण्याची आशा आहे. या खेळपट्टीने या हंगामात आतापर्यंत त्यांना पूर्वीसारखा फायदा मिळवून दिला नाही. त्यामुळे काही दिवसांपूर्वी आरसीबीविरुद्ध झालेल्या पराभवानंतर प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनाही निराशा व्यक्त करावी लागली. खेळपट्टी लक्षणीयरीत्या बदलल्यामुळे त्यांना बचाव करणे व जुळवून घेणे कठीण झाले आहे.

सीएसकेला गुणतालिकेत आपली स्थिती सुधारण्यासाठी येथील परिस्थितीशी जुळवून घेण्याशिवाय पर्याय नाही. त्यांच्या फिरकी गोलंदाजांना अशा ठिकाणी यशस्वी होण्याचे मार्ग शोधावे लागतील.

सीएसकेला विजयी मार्गावर परत येण्यासाठी फलंदाजी व गोलंदाजीत सुधारणा करावी लागणार आहे.गत काही आठवड्यांप्रमाणेच पुन्हा एकदा अनुभवी महेंद्र सिंह धोनीवर लक्ष केंद्रित केले जाईल. पंजाबविरुद्ध धोनीने १२ चेंडूत तीन षट्कार व एका चौकारासह २७ धावा फटकावल्या. डेव्हॉन कॉनवे, रचिन रवींद्र व शिवम दुबेसारखे खेळाडू संघाला सन्मानजनक धावसंख्या उभारून देण्यासाठी प्रयत्न करतील. या कठीण काळात सीएसकेसाठी ही सकारात्मक बाब आहे. पंजाब किंग्जविरुद्धच्या अपयशानंतर कर्णधार ऋतुराज गायकवाड शुक्रवारी जोरदार खेळ करण्याचा प्रयत्न करेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**चेन्नई सुपर किंग्ज वि. कोलकाता नाईट रायडर्स**
**स्थळ** :एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### दुखापतीमुळे गायकवाड बाहेर, धोनी कर्णधार



गुरुवारी चेन्नई सुपर किंग्जला (सीएसके) मोठा धक्का बसला. नियमित कर्णधार ऋतुराज गायकवाड कोपराच्या दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर झाला. त्यामुळे महेंद्र सिंह धोनीला पुन्हा सीएसकेच्या नेतृत्वाची भूमिका मिळाली आहे.सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी या घटनेची पुष्टी केली.'कोपराला फ्रॅक्चर झाल्यामुळे ऋतुराज गायकवाड आयपीएलमधून बाहेर झाला. धोनी कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारेल, असे फ्लेमिंग यांनी गुरुवारी पत्रकारांना सांगितले.जोफ्रा आर्चरच्या आखुड टप्प्याच्या चेंडूमुळे गायकवाडला दुखापत झाली.

# लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये सहा क्रिकेट संघांचा समावेश

**नवी दिल्ली, १० एप्रिल**

२०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे पुनरागमन झाले असून या ऑलिम्पिकमध्ये सहा क्रिकेट संघ विजेतेपदासाठी झुंजताना दिसतील, असे आयोजकांनी सांगितले.





१९०० च्या पॅरिसमधील ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा शेवटचा समावेश होता व तिथे ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांच्यात दोन दिवसांचा सामना झाला होता, जो आता अनधिकृत कसोटी म्हणून ओळखला जातो.

लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट टी-२० स्वरूपात खेळला जाणार आहे. यात पुरुष व महिला दोन्ही स्पर्धांमध्ये सहा संघ भाग घेणार आहे.

प्रत्येक संघ १५ सदस्यीय संघाची घोषणा करू शकेल. पुरुष व महिला विभागासाठी एकूण ९० खेळाडूंचा कोटा निश्चित करण्यात आला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेत अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, भारत, आयर्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडीज आणि झिम्बाब्वे हे १२ पूर्ण सदस्य आहेत. सहयोगी सदस्य गटात आणखी ९४ देश आहेत.

२०२८ ऑलिम्पिकच्या क्रिकेट स्पर्धेसाठी पात्रता निकष अद्याप निश्चित झालेले नाहीत, परंतु यजमान राष्ट्र म्हणून अमेरिकेला या चतुर्भुज महोत्सवात थेट स्थान मिळण्याची शक्यता आहे, म्हणजेच पात्रता प्रक्रियेतून केवळ पाच संघांनाच स्थान मिळू शकेल.

पुढील ऑलिम्पिक खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या पाच नवीन खेळांपैकी क्रिकेट हा एक आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये बेसबॉल/सॉफ्टबॉल, ध्वज फुटबॉल, लॅक्रोस (षटकार) व स्क्वॅशसह २८ मध्ये क्रिकेटचा समावेश करण्यास मान्यता दिली आहे. (वृत्तसंस्था)

# आयओसीने केला ऑलिम्पिकमधून ७५ किलो वजन गट रद्द

### लवलीना बोर्गोहेन ७० किलो वजनी गटातून खेळण्याची शक्यता

**नवी दिल्ली, १० एप्रिल**

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने मुष्टियुद्धातील ७५ किलो वजनी गट रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे आता टोकियो ऑलिम्पिक पदक विजेती भारताची लवलीना बोर्गोहेन २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी आपला सध्याचा ७५ किलो वजन वर्ग रद्द केल्यामुळे आता ती ७० किलो वजन गटात जाऊ शकते. त्यामुळे लवलीनाला नवीन वजन गट निवडावा लागेल.

आयओसीने अलिकडेच लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी इव्हेंट प्रोग्राम व ॲथ्लिट कोटा जाहीर केला. या फेरबदलासह, बोर्गोहेनला एकतर ७० किलो वजन कमी करावे लागेल किंवा +८० किलो वजन वाढवावे लागेल.

ही माझ्यासाठी अगदी नवीन माहिती आहे. ही खूपच धक्कादायक आहे,असे लवलीना बोर्गोहेनने गुवाहाटीहून वृत्तसंस्थेला सांगितले.

मला वाटते की मला ७० किलो वजन कमी करावे लागेल, कारण +८० किलो वजन वाढवणे माझ्यासाठी कठीण होईल, असे ती म्हणाली.

तिच्या वैयक्तिक प्रशिक्षक प्रणमिका बोरा या घडामोडीमुळे आश्चर्यचकित झाल्या, पण त्यांनी सांगितले की अंतिम निर्णय केवळ तंदुरुस्ती व वैद्यकीय मूल्यांकन केल्यानंतरच घेतला जाईल.

सध्या तिचे नैसर्गिक वजन ७४ किलो आहे व जास्त वजन कमी केल्यामुळे तिची ताकद कमी होऊ शकते. म्हणून तिला काय अधिक फायदेशीर आहे, ते आपण पाहू, असे असे बोरा म्हणाली. (वृत्तसंस्था)

# कपिला-क्रॅस्टो उपांत्यपूर्व फेरीत


**आशियाई बॅडमिंटन**

### सिंधू, राजावतचा पराभव

**निंगबो (चीन), १० एप्रिल**

येथे सुरु असलेल्या आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू व आशादायक प्रियांशु राजावतचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. पुरुष व महिला एकेरीत भारताची मोहीम संपुष्टात आली आहे. तथापि, मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला व तनिषा क्रॅस्टो या जोडीने चीन तैपेईच्या ये हाँग वेई व निकोल गोंझालेस चान या जोडीचा १२-२१, २१-१६, २१-१८ असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

जगात १७ व्या क्रमांकावर असलेल्या २९ वर्षीय सिंधूला एक तास व सहा मिनिटे चाललेल्या महिला एकेरीच्या उप-उपांत्यपूर्व सामन्यात जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर आणि स्पर्धेतील तिसरी मानांकित असलेल्या जपानच्या अकाने यामागुचीकडून १२-२१, २१-१६, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला.



तनिषा क्रॅस्टो व ध्रुव कपिला

पुरुष एकेरीच्या स्पर्धेत राजावतला जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर आणि पाचव्या क्रमांकावर असलेल्या जपानच्या कोडाई नारोकाविरुद्ध १४-२१, १७-२१ असा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत किरण जॉर्जचाही पराभव झाला. त्याला जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या थायलंडच्या कुनलावुत वितिदसारनविरुद्ध २१-१९, १३-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. कपिला व क्रॅस्टो यांचा पुढील सामना हाँगकाँगच्या पाचव्या मानांकित चुन मान तांग व यिंग सुएत त्से यांच्याशी होईल, पण आशिथ सूर्या व अमृता प्रमुथेश या भारतीय मिश्र दुहेरीत अव्वल मानांकित चीनच्या जियांग झेन बँग व वेई या झिन या जोडीकडून ११-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# पंढरपूरच्या वीर सावरकरने जालनाच्या बॉस फायटरला नमविले

### रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : मुंबईच्या परेल वर्कशॉपचीही बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल:-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत पंढरपूरच्या वीर सावरकर संघाने जालनाच्या बॉस फायटर संघाचा ४६ धावांनी पराभव केला. येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धे तील दुसऱ्या सामन्यात परेल वर्कशॉप संघाने ग्लोबल क्रिकेट क्लबवर नऊ गडी राखून दणदणीत विजय मिळवला.

अथर्व देशमाने व निशांत शिवलकर हे सामन्याचे मानकरी ठरले. हे पुरस्कार अतुल बांडीवाडीकर व लियाकत शेख यांच्या हस्ते देण्यात आले.

प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत पंच म्हणून दयानंद नवले व मजहर मंगोली आणि चिराग शाह व मंजुनाथ बिराजदार तर गुणलेखक म्हणून





गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक :**

वीर सावरकर पंढरपूर :१७ षटकात ९ बाद ८९ (ओंकार रोकडे १३, मारुती कांबळे १२, गौरव गायकवाड १२, अखिल पटेल व तोसिफ पठाण ३ बळी, कौशल विरपणकर २ बळी)

**विजयी विरुद्ध बॉस फायटर जालना:** १२.४ षटकात सर्व बाद ४३( सूरज खंडेलवाल २१, अथर्व देशमाने व वैभव बडवे ३ बळी, सागर खिलारे, ओंकार रोकडे व दिनेश शिंगाडे प्रत्येकी १ बळी)

ग्लोबल क्रिकेट क्लब : १७ षटकात ७ बाद १०९ ( सागर माळी ३६, श्रीकांत भोसले २२, रिशब शर्मा व रुपेश अंबोकर २ बळी, विवेक गायकवाड १ बळी) पराभूत विरुद्ध परेल वर्कशॉप : १२.२ षटकात १ बाद ११३ ( निशांत शिवलकर नाबाद ५४, आमिर शेख ४६, मल्लिकार्जुन आवटे १ बळी)

**आजचे सामने**

१) नॅशनल क्रिकेट क्लब (ब)विरुद्ध परेल वर्कशॉप. २) वीर सावरकर पंढरपूर विरुद्ध सोलापूर पोलीस.

# अमेरिकेच्या व्हिसा विलंबामुळे भारताला विश्वचषक तिरंदाजीत पदकाचा फटका : प्रशिक्षक तेजा

**नवी दिल्ली, १० एप्रिल**

भारतीय महिला कम्पाऊंड तिरंदाजी संघाला व्हिसाच्या विलंबामुळे अमेरिकेत हंगामाच्या सुरुवातीच्या विश्वचषक पहिल्या चरणाच्या तिरंदाजी स्पर्धेतून बाहेर व्हावे लागले, परिणामी भारतीय संघाला पदकाचा फटका बसला, असे राष्ट्रीय तिरंदाजी प्रशिक्षक जीवनजोत सिंग तेजा यांनी म्हटले.

२०२४ मध्ये जिंकण्यासाठी असलेल्या तीनही सुवर्णपदके जिंकणाऱ्या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या भारतीय महिला कम्पाऊंड संघाला स्पर्धेत सहभागी होता आले नाही, कारण तीन सदस्य - विश्वविजेती अदिती स्वामी, मधुरा धामणगावकर आणि तनिपार्थी चिकिथा या संघाला वेळेवर अमेरिकेचा व्हिसा न मिळाल्यामुळे संघ ऑरबर्नडेल, फ्लोरिडा येथे जाऊ शकला नाही, असे त्यांनी सांगितले.

त्यामुळे भारतीय संघाची पदक जिंकण्याची संधी हुकली. महिला सांघिक स्पर्धेत आम्हाला १०० टक्के संधी होती. गत वर्षी आम्ही शांघाय, येचियोन आणि अंताल्या येथे झालेल्या तीनही विश्वचषक सुवर्णपदके जिंकलीत.



दुर्दैवाने, यावेळी आम्ही आमचे जेतेपद राखू शकलो नाही, असे तेजा यांनी दुःख व्यक्त केले. तेजा स्वतः अमेरिकेला जाऊ शकले नाही.

तेजा यांच्या अनुपस्थितीत अभिषेक वर्मा, ओजस देवतळे व ऋषभ यादव यांच्या भारतीय पुरुष कम्पाऊंड संघाने बुधवारी कांस्यपदक जिंकून काही अभिमान बाळगला.

२०२२ मध्ये द्रोणाचार्य पुरस्कार विजेता तेजाने २०२१ मध्ये टोकियो येथे भारताच्या पहिल्या पॅरालिम्पिक तिरंदाजी पदक (कांस्य) साठी हरविंदर सिंगला मार्गदर्शन केले होते.

गत वर्षी पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये हरविंदरने ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले होते. २०२३ मध्ये विश्वविजेती बनलेली आणि त्याच वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकणारी १८ वर्षीय आदिती स्वामीची अनुपस्थिती वैयक्तिक विभागातही भारताच्या पदकांच्या संधींसाठी मोठा धक्का होता. तीन वर्षांनी महाराष्ट्राची मधुरा धामणगावकर राष्ट्रीय संघात परतली होती.

२४ वर्षीय चिकिथाने २०१८ मध्ये तैपेई येथे झालेल्या आशिया चषक स्पर्धेत पदार्पण केले होते व तिने २०२२ च्या मेडेलिन विश्वचषकात भाग घेतला होता, पण तिला अद्याप आंतरराष्ट्रीय पदक जिंकता आलेले नाही. तीन वेळा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेती भारताची ज्योती सुरेखा वेन्नम ही फ्लोरिडातील कम्पाऊंड विभागात भाग घेणारी एकमेव भारतीय महिला होती. तिने पाचवे मानांकन मिळवले. (वृत्तसंस्था)

# विनेशने नाकारली सरकारी नोकरीची ऑफर रौप्यपदकाचे रोख बक्षीस घेण्यास सहमती

**नवी दिल्ली, १० एप्रिल**

काँग्रेस आमदार ऑलिम्पिक कुस्तीपटू विनेश फोगटने हरयाणाच्या भाजप सरकारकडून सरकारी नोकरी किंवा भूखंडाची ऑफर नाकारली आहे. तिने सरकारकडून केवळ ४ कोटी रुपये रोख मागितले आहेत. या तीन ऑफर सरकारने विनेशला दिल्या होत्या. त्यानंतर त्याने रौप्य पदक विजेत्या खेळाडूने ४ कोटी रुपयांचे रोख बक्षीस घेण्यास सरकारशी सहमती दर्शवलीआहे. तथापि, विनेश फोगट ऑलिम्पिकमधून पदकाशिवाय देशात परतली होती.

क्रीडा विभागाला विनेश फोगटचे रोख पुरस्काराबाबतचे संमतीपत्र मिळाले आहे. त्यानंतर पैसे देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



२०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये विनेश अंतिम सामन्यात पोहोचली होती. तथापि, १०० ग्रॅम वजन वाढल्यामुळे अंतिम सामना खेळण्यापूर्वीच तिला बाहेर काढण्यात आले. तेव्हा मुख्यमंत्री नायब सैनी यांनी विनेशला रौप्यपदक विजेता म्हणून सन्मानित करण्याची घोषणा केली होती. मात्र, जेव्हा तिला काहीही मिळाले नाही, तेव्हा विनेशने विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सांगितले होते की सरकारने तिला रौप्य पदकाच्या बरोबरीचा सन्मान देण्याची घोषणा केली आहे. ८ महिने झाले पण काहीही झाले नाही. त्यानंतर, मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर विनेशला राज्याच्या २०१९ च्या रोख पुरस्कार क्रीडा धोरणानुसार सरकारी नोकरी किंवा एचएसव्हीपी भूखंड किंवा ४ कोटी रुपयांचा रोख पुरस्कार यापैकी एक निवडण्याचा पर्याय दिला. (वृत्तसंस्था)

# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

### चेक अँड मेट चषक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल -**

'चेक अँड मेट चषक' खुल्या तसेच ९ व ७ वर्षाखालील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेत सोलापूरचा आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर श्रेयांस शहा, विजय पंगुडवाले, विशाल पटवर्धन, बार्शीचा शंकर साळुंके, बीएसएनएलचा राष्ट्रीय खेळाडू चंद्रशेखर बसरगीकर, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त पवन राठी, प्रसन्ना जगदाळे, सागर गांधी, उस्मानाबादचे ज्येष्ठ खेळाडू नंदकुमार सुरू, साईराज घोडके, वेदांत मुसळे, आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे, सृष्टी गायकवाड, हिमांशु व्हानगावडे यांच्यासह २७ आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली.

कोमलताई अजय साळुंखे - ढोबळे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री.बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री गिरिजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय व सोलापुर चेस अक्ॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजीत ही स्पर्धा जुळे सोलापूर येथील



मातोश्री गिरीजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सुरु आहे. या स्पर्धेत सोलापुर शहरासह माळशिरस, करमाळा, पंढरपुर, मंगळवेढा, बार्शी, अक्कलकोट, माढा तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील १७६ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. ९ वर्षाखालील गटात नैतिक होटकर, आदित्य जंगवाली, अद्विक ठोंबरे, आरुष माने, अन्वी बिटला, तन्वी बागेवाडी, ईशा पटवर्धन या उदयोन्मुख खेळाडूदेखील उत्कृष्ट खेळ करत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे व मातोश्री गिरीजाबाई ढोबळे महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वासंती पांढरे यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली. यावेळी संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, यश इंगळे, प्रा. गुरव डी. एफ., प्रा. हेडे एस. एस., प्रा. जाधव आर. बी, प्रा. माने व्ही. एल, प्रा. कोळी आर. पी, ग्रंथपाल साळुंखे आर. एम व लिपिक धसाडे आर. ए. शिंदे अमर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. वासंती पांढरे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये समर कॅम्प साजरा

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**
व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये समर कॅम्प मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये स्पोर्ट्स, चित्रकला, सेमी क्लासिकल डान्स ठेवण्यात आले आहे. ९ एप्रिल रोजी समर कॅम्प चालू करण्यात आला आहे. यामध्ये डॉज बॉल, क्रिकेट, बेसबॉल, बॉस्केट बॉल,तर चित्रकला विभाग मध्ये आर्ट क्राफ्ट व डान्स मध्ये क्लासिकल डान्स ठेवण्यात आले आहे.या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख श्री संतोष पाटील, शिवाजी आवताडे व लावण्या दुस्सा, इंद्रजीत चव्हाण व ऐश्वर्या पवार यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ कल्याणी जी एच उपमुख्याध्यापिका सौ मीना दुधनीकर पर्यवेक्षिका सौ सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा ,मेहजबीन शेख,उमा कोडम,रेखा बाबानगरे, भगतलाल सुतार,मधुस्मिता अच्युगटला, भाग्यश्री गिडवीर,निता लोहार व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.तसेच शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष श्री उमाकांत मेंढापुरे उपाध्यक्ष सौ यमूना दिड्डी सचिव संतोष गड्डम व उपसचिव श्री नागेश शेंडगे यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### तरूणास लोखंडी पाईपने मारहाण; सहाजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१० एप्रिल-**
तरूणास लोखंडी पाईपने मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आकाश विष्णू शिंदे (वय ३०, रा. बालाजी अपार्टमेंट, गोंधळे वस्ती, विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कल्लप्पा वाघमोडे, सिध्दप्पा वाघमोडे, प्रविण जमादार, परशुराम कोळी, आरूण काळे, सिध्दू स्वामी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश शिंदे याने कल्लप्पा व सिध्दप्पा वाघमोडे यांच्याकडे भाडे तत्वावरती चालविण्यासाठी दिलेला जेसीबी चालू आहे का बंद आहे हे पाहण्यासाठी ७ एप्रिल रोजी दुपारी अक्कलकोट रोडवरील इस्कॉन मंदीराजवळ शिंदे गेला होता. त्यावेळी वाघमोडे यांनी तुला काय करायचे आहे, जेसीबी चालू असू नाही तर बंद असू दे असे बोलून कल्लप्पा याने शिंदे यास मागून येऊन लोखंडी पाईपने तर सिध्दप्पा याने प्लास्टीक पाईप उचलून डोक्यात मारहाण केली. त्यामुळे शिंदे खाली पडल्यानंतर वाघमोडे याच्या गाड्यावरती ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या जमादार, कोळी, काळे, स्वामी याने तिथे येऊन शिंदे याचे हात-पाय धरून बांधले. त्यानंतर वाघमोडे यांनी पाईपने मारहाण केली आणि जबरदस्तीने दारू पाजली. पोलिस ठाण्यात तक्रार केली तर तुला जीवे ठार मारून टाकतो अशी धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनसुडे पुढील तपास करीत आहेत.

### आधी इस्टिमेट दाखवा, मगच काम सुरु करा : ॲड. विजयसिंह गिड्डे

**मोडनिंब,दि.१० एप्रिल-**
मोडनिंब (ता.माढा) येथील मुख्य रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याने आधी इस्टिमेट दाखवा मगच काम सुरू करा असे खडे बोल सुनावत इस्टेमेट प्रमाणेच काम होण्याची मागणी ॲड. विजयसिंह गिड्डे यांनी केली आहे. मोडनिंब येथील स्टेशन रोडचे काम सोमवारपासून सुरू झाले आहे. येथील काम इस्टिमेट प्रमाणे काम सुरू नसल्याचा आक्षेप त्यानी घेतला. पोलिसांनी काम थांबविल्याबद्दल उपस्थितांना विचारणा केली. सायंकाळी उपविभागीय अभियंता आणि शाखा अभियंता यांनी भेट दिली. माजी सरपंच कुरण गिड्डे, ॲड. विजयसिंह गिड्डे, संजीव शिंदे, बाळासाहेब वागज, प्रकाश कोळी यांच्याशी उपविभागीय अभियंता सुनील हेळकर, शाखा अभियंता सय्यद यांनी चर्चा केली.नागरिकांनी कामाची तपासणी करण्याची मागणी केली आहे. जर कामात तातडीने सुधारणा झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला. आहे. सदर कामाबद्दल अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देत आहेत. अधिकाऱ्यांची बोलण्याची भाषा उद्धटपणे आहे. सदर रस्त्याबद्दल योग्य माहिती न दिल्यास मी कोर्टात जाणार असल्याचे ॲड गिड्डे यांनी सांगितले.

## निधन वार्ता

### मयूर केमकर



**मंद्रूप, दि. १० एप्रिल-**
मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) येथील मयूर संजय केमकर (वय २०) यांचे गुरूवारी पहाटे हृदविकाराने निधन झाले. मंद्रुप येथील हिंदु स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई , वडील, भाऊ असा परिवार आहे. उच्च शिक्षण सुरू ठेऊन बँक ऑफ इंडीया मंद्रुप येथे मदतनीस म्हणून कार्यरत होते. मनमिळावू स्वभावामुळे त्यांचे सर्वांशी घनिष्ठ संबंध होते.

### महानंदा सुनगार



**अक्कलकोट, दि. १० एप्रिल-**
अक्कलकोट तालुक्यातील पान मंगरूळ येथील महानंदा बसवराज सुनगार (वय ६२) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.अक्कलकोट तालुक्यातील खानापूर येथील तलाठी धनंजय सुनगार यांच्या त्या मातोश्री होत.

### सुभाष पटवा



**सोलापूर, दि. १० एप्रिल-**
येथील सुभाष मोतीचंद पटवा- खर्डेकर (वय ८९) यांचे गुरुवारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, कुंकूबाई नेत्र रुग्णालय, जैन सोशल ग्रुप, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यासह अनेक संस्थांच्या कार्यकारी मंडळावर त्यांनी अनेक वर्षे विश्वस्त म्हणून काम केले आहे. तसेच गेली पन्नास वर्षे त्यांनी फार्मसी कंपनी चालविली आहे. पटवा फोटोग्राफर यांचे ते बंधू होत.

# बाजार समितीसाठी नेते लागले पॅनलच्या तयारीला

### नेतेमंडळींचा दक्षिण तालुक्यात गावभेट दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**
सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसंदर्भात कानोसा घेण्यासाठी दक्षिण सोलापुरातील नेत्यांनी गावोगावी जाऊन थेट मतदारांशी संवाद साधला. या गावभेट दौऱ्यात त्यांनी मतदारांशी चर्चाही केली.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीतील संभाव्य पॅनलबाबत तर्क-वितर्क लढविले जात आहेत. अक्कलकोटचे भाजपा आ. सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आमदार दिलीप माने यांचे निवडणुकीत स्वतंत्र पॅनल परस्परांविरोधात लढतील आशी सध्या तरी चर्चा आहे, मात्र या संदर्भात राजकीय हालचाली सध्यातरी थांबलेल्या दिसत आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १६ एप्रिल असून तोपर्यंत बराच वेळ असल्याने थेट मतदारांशी संवाद साधण्यासाठी गाव भेट दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. माजी सभापती राजशेखर शिवदारे, माजी उपसभापती सुरेश हसापुरे, बाळासाहेब शेळके आणि श्रीशैल नरोळे यांनी सकाळी गाव भेट दौऱ्यास सुरुवात केली. हत्तूर येथून सुरू झालेला हा भेट दौरा वडकबाळ, वांगी, अकोले ( गुंजेगाव, वडापूर, गावडेवाडी, कंदल अंत्रोळी, खानापूर, कुसुर, भंडारकबाळगी येथे संपला. आणखी दोन दिवस हा दौरा चालणार असून दक्षिण नंतर उत्तर सोलापूर तालुक्यात दौरा करण्याचा त्यांचा मानस आहे. यावेळी सहकारी सोसायटी ग्रामपंचायतीच्या सदस्यासह ग्रामस्थांशीही चर्चा केली. संभाव्य पॅनलबाबत निर्णय नाही. मात्र मतदारांच्या काय अपेक्षा आहेत याचा कानोसा घेतल्याचे यावेळी सांगण्यात येत आहेत.

दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यातील विविध मतदारांशी भेट घेऊन बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आलेल्या शेतकऱ्यांना नेमक्या कोणत्या समस्या भेडसावत आहेत. शेतमाला व शेतमालाची पट्टी या संदर्भात चर्चा विनिमय करण्याचा आले. बाजार समितीच्या कामकाजात अधिक सुधारणा करण्यासाठी सज्ज असल्याचे यावेळी नेते मंडळीकडून आश्वासन देण्यात आले.

### आर्थिक दुर्बल घटकांमधून अर्ज दाखल केला नाही

आर्थिक दुर्बल घटकांमधून उमेदवारीचा अर्ज भरलाच नसल्याने, या संवर्गाचा प्रश्नच उद्भवत नाही. थकबाकी आणि सातबारावर बोजा हा प्रश्न महत्त्वाचा आहे. परंतु थकबाकी आणि बोजा या दोन्ही बाबी वेगवेगळ्या आहेत. निवडणूक लढवताना थकबाकी नसावी, बोजा असावा किंवा नसावा याचा कोणताही प्रश्न निवडणुकीसाठी उद्भवत नाही. आर्थिक दुर्बल घटकातून नामनिर्देशन अर्ज भरलाच नसल्याने यामध्ये कोणतेही तथ्य नाही. पणन संचालकांनी राखून ठेवलेला निकाल लागल्यानंतर संभाव्य पॅनल तयार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**- श्रीशैल नरोळे,**
**माजी उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

# पंढरपूर- लोणंद रेल्वे प्रकल्पाच्या कामाचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**
पंढरपूर लोणंद रेल्वे मार्गाच्या क्षेत्राच्या संपादन बाबत विभागीय महसूल आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी नियोजन भवन येथे आढावा घेतला. महसूल विभागाकडील नोंदी, गाव नकाशे तसेच भूमि अभिलेख यांच्याकडील नोंदी व नकाशे याद्वारे या रेल्वे मार्गाच्या क्षेत्राची तपासणी करण्यात यावी, असे त्यांनी सुचित केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, माळशिरस च्या उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक श्री. घोडके, रेल्वे विभागाचे अधिकारी तसेच मंडल अधिकारी व तलाठी उपस्थित होते.

पंढरपूर लोणंद रेल्वे प्रकल्पाचे भूसंपादनाबाबतचे जुने रेकॉर्ड रेल्वे विभागाकडे असू शकते त्या अनुषंगाने रेल्वे विभागाच्या रेकॉर्ड ची जबाबदारी असलेल्या कार्यालयाने त्यांच्या स्तरावर अभिलेखाची तपासणी करावी व ते रेकॉर्ड सोलापूर जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून द्यावे. या अनुषंगाने सोलापूर जिल्हा प्रशासन चांगले काम करत असून रेल्वे विभागानेही त्यांना तेवढेच सहकार्य करावे, अशी सूचना विभागीय डॉक्टर पुलकुंडवार यांनी केली. पंढरपूर लोणंद रेल्वे प्रकल्प अंतर्गत माळशिरस तालुक्यातील बारा व पंढरपूर तालुक्यातील ५ गावांचा समावेश आहे. सद्यस्थितीत जुन्या गावांची विभागणी झाल्याने माळशिरस तालुक्यात तीन गावे तर पंढरपूर तालुक्यात दोन गावे वाढलेली असून एकूण गावांची संख्या २० इतकी झालेली आहे. हा रेल्वे मार्ग ब्रिटिश खालील रेल्वे मार्ग आहे. या मार्गाच्या क्षेत्राचे संपादन हे मूळ जमाबंदीच्या वेळी झाल्याने त्याचा स्वतंत्र सातबारा तयार झालेला नाही. प्रत्येक गावाच्या आकारबंधाचे तेरजस रेल्वेचे क्षेत्र नमूद आहे. सन १९२९ मध्ये या जमीन गटाचे नोंदी घेण्यात आलेल्या होत्या तर सन १९४९ साली वरील संपादित जमीन अधिक धान्य पिकवा या योजनेखाली एकसाली लागवडीने देण्यात आलेल्या आहेत.

# बार्शी खादी ग्रामोद्योग सोसायटीचे संचालक मंडळ बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.१० एप्रिल**
बार्शी तालुका खादी ग्राम उद्योग कुंझ्युमर को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड बार्शी संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक खेळीमुळीच्या वातावरणामध्ये पार पडून चेअरमनपदी बाबासाहेब टमके यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर व्हाईस चेअरमनपदी प्रा. शशिकांत धोत्रे, सचिवपदी पुष्पा होनमोठे यांची बिनविरोध निवड तर संचालक मंडळ पुढीलप्रमाणे- महादेव धावणे, शेखर भोसले, ॲड. नितीन सोडळ, ओंकारेश्वर हलगणे, रमण गोणेकर, सुनील शेटे, निता टमके, शोभा चिपडे, कैलास नवले, अण्णासाहेब पाटकुलकर. नूतन संचालकांचा सत्कार व स्वागत गणेश कानडे, जयंत हिंगमिरे, उमेश कानडे, निलेश भैय्या पवार, रंगनाथ नवले, रवी देवकर यांनी केले.

# १४७ व्या श्री स्वामी पुण्यतिथी निमीत्त धर्मसंकीर्तन

### धर्मसंकीर्तन महोत्सवात नामवंताची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १० एप्रिल-**
श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त १३ ते २५ एप्रिलअखेर धर्मसंकीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जगदविख्यात कलाकारांची हजेरी लागणार असल्याची माहिती श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.



या पुण्यतिथी महोत्सवात पहाटे ४ वा.नगरप्रदक्षिणा, ५ वाजता काकड आरती, दिनांक १९ एप्रिल पासून वीणा सप्ताह, सकाळी ८ ते ११ या वेळेत देवस्थान विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली दिनांक १५ एप्रिल ते दिनांक २५ एप्रिल अखेर श्री गुरुलिलामृत ग्रंथाचे सामुदायिक पारायण होईल. पुण्यातील प्रसिध्द सनई वादक दिनेश मावडीकर हे उत्सव कालावधीत पहाटे ४ वाजता व सायंकाळी ७ वाजता सनई चौघडा वादन करतील. प्रतिदिनी दुपारी १२ ते ४ या वेळेत भजन सेवा संयोजक यांच्या अधिपत्याखाली भजनी मंडळांची भजनसेवा स्वामींच्या चरणी रुजू होईल.

धर्मसंकीर्तन महोत्सवात दिनांक १३ एप्रिल रोजी ह.भ.प.कृष्णा बुवा माळकर, (रा.डोंबीवली) यांची किर्तनसेवा, दिनांक १४ एप्रिल रोजी प्रशांत देशपांडे व सहकारी, (रा.मुंबई) यांची भक्ती संगीतसेवा, दिनांक १५ एप्रिल रोजी आरती मुनिश्वर, (रा. डोंबीवली) यांची प्रवचनसेवा, तसेच चि. सार्थक बावीकर, (रा.सोलापूर) यांची भक्ती संगीत सेवा, दिनांक १६ एप्रिल रोजी ह.भ.प. रत्नप्रभा सहस्त्रबुध्दे (रा.सोलापूर) यांची किर्तनसेवा, दिनांक १७ एप्रिल रोजी श्रीमती तमन्ना नायर - अश्विनी जोशी व सहकलाकार (रा. ठाणे) यांचा कथ्थक व भरत नाट्यम नृत्याविष्कार, दिनांक १८ एप्रिल रोजी ह.भ.प.कुलदीप साळुंके (रा.कारभारवाडी-कोल्हापूर) यांची प्रवचन सेवा, तसेच कु.गौरी गंगाजळीवाले (रा. पुणे) यांची भक्ती संगीत सेवा, दिनांक १९ एप्रिल रोजी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ह.भ.प.स्वामी चरणाश्रीत गिरीमहाराज (महामंडलेश्वर) (रा.हरिद्वार) यांची प्रवचनसेवा, दिनांक २० एप्रिल रोजी योगेश रामदास व सहकारी, (रा.बेळगांव) यांची भक्ती संगीत सेवा, दिनांक २१ एप्रिल रोजी निखील महामुनी व सहकलाकार (रा. पुणे) यांची भक्ती संगीत सेवा, दिनांक २२ एप्रिल रोजी कु.वैष्णवी पवळे व केदार केळकर (रा.पुणे) यांची भक्ती संगीत सेवा, दिनांक २३ एप्रिल रोजी ह.भ.प.संदीप बुवा मांडके (रा.पुणे) यांची किर्तनसेवा, दिनांक २४ एप्रिल रोजी गौतमी चिपळूणकर व सहकारी (रा.कोल्हापूर) यांची भक्ती संगीत सेवा, दिनांक २५ एप्रिल रोजी देविदास जोशी, (रा. पुणे) यांची प्रवचनसेवा तर पंडीत प्रसन्न गुडी व भार्गवी कुलकर्णी (रा.धारवाड) यांची भक्ती संगीत सेवा इत्यादी धार्मिक कार्यक्रम देवस्थानातील कै. कल्याणराव उर्फ बाळासाहेब इंगळे सभा मंडपातील व्यासपीठावर दुपारी ४ ते सायं ७ या वेळेत संपन्न होतील. दिनांक २६ एप्रिल रोजी श्री. स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी उत्सवाचा मुख्य दिवस आहे. त्या दिवशी पहाटे २ ते ४ प्रभातफेरी, पहाटे ४ ते ५ नामस्मरण, पहाटे ५ वा. काकड आरती, यानंतर श्रींचे दर्शन, ११ वाजता महानैवेद्य आरती, दुपारी १२ वाजता अक्कलकोट राजघराण्याचा महानैवेद्य श्रींना अर्पण होईल. दुपारी १२ ते ४ महाप्रसाद, व प्रसाद वाटप होईल. दुपारी २ ते ४ या वेळेत स्वामी भक्त सुहास पाटील यांच्या श्री स्वामी समर्थ भजनी मंडळ महाद्वार कोल्हापूर यांची भजनसेवा संपन्न होईल. सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत अक्कलकोट शहरातून श्रींचा सवाद्य पालखी सोहळा संपन्न होईल. दिनांक २७ एप्रिल रोजी दुपारी ४ ते ७ या वेळेत गोपाळकाला होवून श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा सांगता समारंभ होईल अशीही माहिती महेश इंगळे यांनी दिली .

### हनुमान जन्मोत्सवानिमित्त भीमानगर मारूती मंदीरात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**
जुळे सोलापूर परिसरातील ज्ञानेश्वर नगर बस स्टॉपजवळील भीमानगर दक्षिणमुखी मारूती मंदीरात विविध कार्य़क्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त येथे दररोज महिला भजनी मंडळाचे भजन होत आहे. आज दि. १० एप्रिल रोजी हभप अपर्णा सहस्त्रबुध्दे यांचे कीर्तन झाले. गुणेश दाते यांनी त्याना तबल्याची साथसंगत केली. शनिवारी पहाटे येथे भजन होऊन सूर्योदयाला गुलालाचा कार्यक्रम होणार आहे.

त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. परिसरातील भाविक येथे मोठ्या संख्येने दश४नासाठी उपस्थित राहतात. सायंकाळी येथे परिसरातील तरूण कलाकार भजन संध्या कार्यक्रम सादर करणार हेत. यामध्ये विविध गीतांचे सादरीकरण केले जाते.

# खाजगी कारखानदारांना सहकाराचा आत्मा कळणार नाही



### करंजेच्या सभेत आ.नारायण पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१० एप्रिल-**
आदिनाथ कारखाना हा सहकारी तत्वावर चालणारा कारखाना असुन खाजगी कारखान्यातील व्यक्तीना सहकारचा आत्मा ओळखता येणार नाही असे प्रतिपादन आ.नारायण (आबा) पाटील यांनी करंजे येथील प्रचारसभेत केले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, देशभक्त नामदेवराव जगताप व कर्मयोगी गोविंद बापु पाटील यांच्या प्रेरणेतून श्री आदिनाथ कारखाना संजिवनी पॅनल'च्या प्रचाराची सभा करंजे (ता करमाळा) येथे झाली. माजी सरपंच दादासाहेब सरडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी कृषीभूषण नामदेवराव साबळे, सभापती अतुलभाऊ पाटील, अंकुश शिंदे, विठ्ठल शिंदे, बाप्पा आतकरे, दत्ता डौले, नवनाथ कापले, पांडूरंग हाके, अशोक घरबुडवे, बलभिम पवार, जयद्रत शिंदे, श्रीराम सुखसे , बाळासाहेब सरडे, युवराज जाधव, बलभिम पवार, भिमराव फुके, राघू उबाळे, विशाल पवार, विलासदादा पवार, डॉ.पांडूरंग हजारे, एकनाथ हजारे, लक्ष्मण लांडगे, राजाभाऊ सरडे, आजिनाथ सपकाळ, सोमनाथ तरंगे आदी उपस्थित होते.

गटातटाचे राजकारण आजही चालू ठेवले तर आदिनाथ आणखी तोट्यात येईल. मी सभासदांना विनती करतोय की तुम्ही तुमचे कारखान्यावरील हक्क अबाधित रहावा म्हणून श्री आदिनाथ कारखाना संजिवनी पॅनलला निवडुन द्या असे आवाहन आमदार पाटील यांनी केले. यावेळी सभापती अतुल पाटील, बाजार समिती संचालक देवानंद बागल, डॉ अमोल घाडगे, पं स सदस्य विधीज्ञ राहुल सावंत, अंकुश शिंदे आदिनी विचार मांडले. प्रास्ताविक सुनील तळेकर यांनी केले. आभार भाऊसाहेब फुके यांनी मानले. सुत्रसंचलन निवेदक प्रा समाधान कोळेकर यांनी केले. या सभेस कंरजे, भालेवाडी, करमाळा, गौंडरे, निमगाव, कोळगाव आदि गावातील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आदिनाथ ला मामांसारख्या अभ्यासू नेतृत्वाची गरज

**राजकुमार देशमुख (राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष, सोलापूर) यांचे प्रतिपादन**



**करमाळा दि.९ एप्रिल**
आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे, अनेक आरोप प्रत्यारोप होत आहेत. मात्र या आधी तालुक्यातील प्रत्येक नेत्याने कारखान्यावर आपली सत्ता स्थापना केली मात्र एकालाही सभासद, शेतकरी आणि कारखाना यांना न्याय देता आला नाही.एखादी संस्था, कारखाना चालवण्यासाठी अनुभव आणि त्या त्या परिस्थिती नुसार निर्णय घेण्याची क्षमता लागते आणि ती माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या कडे आहे. त्यांच्या कामाचा परिचय तालुक्याला गेल्या पाच वर्षात आलेला आहे त्यामुळे आता लोकांनी डोळसपने या निवडणुकीकडे बघावं, मागील विधानसभा वेळी झालेली चूक सुधारून घ्यावी असे प्रतिपादन राजकुमार देशमुख (राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष, सोलापूर) यांनी केले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित पवार यांनी करमाळ्यात आल्यानंतर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी जाहीर आवाहन केले होते की संजयमामा ला निवडून द्या कारखाना जागेवर आणतो कारण दादा मामाचे सलोख्या चे संबधं सगळ्यांना माहित आहेत आणि याच गोष्टीचा फायदा कारखाना पूर्वपदावर आणायला होणार आहे.त्यामुळे मामांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या आदिनाथ बचाव पॅनल ला निवडून आणण्याचे आवाहन राजकुमार देशमुख यांनी केले आहे.

### आदिनाथ साखर कारखाना संजयमामांच्या नेतृत्वात उभारी घेईल : ॲड. अजित विघ्ने



करमाळा तालुक्यातील सहकाराचे मंदीर असणारा आदिनाथ सहकारी साखर कारखाना सहकारी तत्वावर चालावा व रसातळाला गेलेल्या आदिनाथ कारखान्याने पुन्हा गतवैभव प्राप्त करावे ही सर्व सामान्य सभासंदाची इच्छा असुन, सभासदांच्या इच्छेनुसारच आदिनाथचे सभासद असणाऱ्या संजयमामा शिंदे यांनी या निवडणुकीत स्वतः नेतृत्व करीत उडी घेतली आहे. माजी आमदार संजयमामांवर टिका टिप्पणी करण्यातच विरोधक धन्यता मानत आहेत. त्यांनी कारखाना कसा चालू करणार? त्या करीता निधीची उभारणी कशी करणार? अर्थसहाय्य कोण करणार ? सभासदांना अधिक दर मिळावा यासाठी काय उपाययोजना करणार? हे आजपर्यंत एकाही भाषणात जाहीर केलेले नाही.विरोधी आघाडीत उमेदवार असलेल्या लोकांनीच आजपर्यंत सर्व सामान्य सभासदांना वेगवेगळया माध्यमातुन किती त्रास दिला आहे हे सभासद स्पष्टपणे सांगत आहेत.सर्व पर्याय संपल्यामुळेच माजी आमदार संजयमामांचे नेतृत्वाला जनाधार मिळत आहे. बरेच लोक विधानसभेची झालेली चूक सुधारून मामांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहात आहेत. त्यामुळे आदिनाथ साखर कारखान्यावर परिवर्तन अटळ आहे असे मत शिंदे गटाचे प्रवक्ते ड. अजित विघ्ने यांनी मांडले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### जुनी पोलिस लाईन गृहनिर्माण सोसायटीच्या चेअरमनपदी व्यवहारे, सचिवपदी येळे

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

मुरारजी पेठ भागातील जुनी पोलीस लाईन भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली असून संस्थेच्या चेअरमनपदी अनिकेत व्यवहारे व सचिवपदी वसंत येळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून संस्थेची निवडणुक होत नव्हती. सुमारे दोन वर्षापासून संस्थेचे तत्कालीन संचालक मंडळ बरखास्त करून उपनिबंधक कार्यालयाकडून प्रशासकाची नेमणूक करण्यात आली होती. प्राधिकृत अधिकारी शरद नागणे व सहाय्यक नागनाथ देवसानी यांच्याकडे संस्थेचा कारभार होता. संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी १४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यामध्ये अरुण देशमुख, वसंत येळे, वसंत ढेरे, मधुकर व्यवहारे, संजय घाडगे, अनिकेत व्यवहारे, दत्ता भोसले, प्रकाश सुरवसे, प्रभाकर व्यवहारे, नामदेव पवार, विकास घाडगे, दत्तात्रय सुरवसे यांची पुरुष सर्वसाधारण गटातून बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच नागरबाई ढोबळे व लक्ष्मीबाई पावडे यांची महिला राखीव गटातून निवड केली गेली. या सर्व नूतन संचालक मंडळाची बैठक नुकतीच निवडणुक निर्णय अधिकारी डी.पी. सुरवसे यांच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीत संस्थेचे नूतन चेअरमन म्हणून अनिकेत व्यवहारे यांची तर सचिव म्हणून वसंत येळे यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीत नुतन पदाधिकारी व सर्व नुतन संचालकांचा सत्कार निवडणूक निर्णय अधिकारी डी पी सुरवसे, प्राधिकृत अधिकारी शरद नागणे व सहाय्यक नागनाथ देवसानी, किरण पवार, विश्वराज देशमुख, बळीराम पावडे यांच्या हस्ते करण्यात आला.

### अपंगाचे बनावट ओळखपत्र देणाऱ्यास अटक; गुन्हे शाखेची कारवाई

**सोलापूर, दि. १० एप्रिल -**

एस टी बसच्या प्रवासासाठी अर्पगत्वाचे बनावट ओळखपत्र देणाऱ्यास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. संगमेश्वर मल्लिकार्जुन अळगुडगी (रा. कर्णिक नगर, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव असून तो एस टी महामंडळात कामास आहे. याबाबत शहर गुन्हे शाखेचे पोलिस कर्मचारी विनोद रजपूत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना एस टी प्रवासाच्या सवलतीसाठी बनावट अपगंत्वाचे ओळखपत्र काही लोकांना देण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यावेळी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रंगभवन येथे एस टी महामंडळाच्या स्टॉपवर चौकशी केली असता एस टी महामंडळात काम करणाऱ्या संगमेश्वर अळगुडगी याच्याकडून बनावट अपंगत्वाचे ओळखपत्र देण्यात येत असल्याचे दिसून आल्याने पोलिसांनी अळगुडगी यास ताब्यास घेऊन चौकशी केली. त्यावेळी अळगुडगी याच्याकडून दोन मोबाईल फोन व अपंगत्वाचे दोन बनावट ओळखपत्रे मिळून आली. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अळगुडगी यास ताब्यात घेऊन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केली. संगमेश्वर अळगुडगी यास न्यायालयात हजर केले असता त्यास पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर पुढील तपास करीत आहेत.

### माहेरी असणाऱ्या विवाहितेला पतीकडून मारहाण

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

माहेरी असलेल्या विवाहितेला पतीकडून मारहाण करण्यात आली. हा प्रकार आठ एप्रिल रोजी रात्री ९.४५ वाजता मंगळवेढा येथे घडला. अक्षता हनुमंत कुलकर्णी (वय २० रा. तेलगाव ता. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. अक्षता या आठ एप्रिल रोजी मंगळवेढा येथे त्यांच्या माहेरील घरी होत्या. त्यावेळी तेथे त्यांचा पती हनुमंत याने घरगुती कारणातून त्यांना लोखंडी रॉडने मारहाण केली. यामध्ये सर्वांगास मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून आई रेश्मा शेख यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात ९ एप्रिल रोजी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

# भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक महोत्सव शहरात उत्साहात साजरा

## दिगंबर व श्वेतांबर जैन पंथीयाची एकत्रित मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल -**

अहिंसा परमो धर्मः या जैन तत्वज्ञानाच्या तेजस्वी ध्वजाखाली, २४ वे तीर्थंकर अरिहंत परमात्मा श्री भगवान महावीर स्वामी यांचा २६२४ वा जन्मकल्याणक सोहळा शहरात अतिशय भक्तिपूर्ण वातावरणात पार पडला.

सकाळी सात वाजता छत्रपती रंगभवन जवळील कीर्ती स्तंभाजवळ जैन बोर्डिंग शिक्षण संकुलाचे अध्यक्ष संजय गांधी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून सुभाषचंद्र चंद्रनाथ वनकुद्रे उपस्थित होते. त्यानंतर भ.महावीरांच्या तैलचित्राच्या शोभा यात्रेला सुरुवात झाली. ही शोभायात्रा विजापूर वेस मार्गे शुक्रवार पेठेतील मंदिरात आल्यानंतर, तेथे भ.महावीरांच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला.पालखीत महावीर स्वामींची मूर्ती विराजमान केल्यावर पुन्हा ही शोभा यात्रा मार्गस्थ झाली. भगवान महावीरांच्या तैलचित्र असलेल्या रथाचा सारथी चढावा शाश्वत उज्वल मोहरे यांनी घेतला. चांदीच्या पालखीतील भगवान महावीरांच्या मूर्तीला विराजमान करण्याचा सवळे घालून मूर्ती विराजमान करण्याचा चढावा इंजिनीयर स्मित संजय शहा यांनी घेतला





मंगळवार पेठ पोलीस चौकीजवळ श्वेतांबर जैन बांधवांची मिरवणूक सामील होऊन ही संयुक्त मिरवणूक बुबणे जैन मंदिर, टिळक चौक मार्गे शुक्रवार पेठ येथे आली आणि तिथून पूर्वस्थळी या मिरवणुका विसर्जित झाल्या. त्यानंतर महाप्रसादाने या भव्य कार्यक्रमाची सांगता झाली. शोभायात्रेमध्ये वीतराग विज्ञान सर्वोदय पाठशाळेच्या विद्यार्थ्यांचे लेझीम टिपरी, त्याचप्रमाणे महिला मंडळाचे सुद्धा नृत्य लेझीम इ.मुळे शोभायात्रेला विशेष शोभा आली होती. शेवटी सुनील गांधी (हरिभाई देवकरण) यांनी सर्वांचे आभार मानले. आदिनाथ दिगंबर जैन मंदिर शुक्रवार पेठचे नूतन कार्यवाह आशुतोष शहांनी सूत्रसंचालन केले. शहरातही ठिकठिकाणी भ.महावीरांचा जन्मोत्सव धार्मिक कार्यक्रमांनी साजरा झाला.



### वालचंद शिक्षण समूह

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मुलांच्या वसतिगृहातील जैन मंदिरात पवित्र मंत्रोच्चारात भगवान महावीरांच्या प्रतिमेचे अभिषेक, जलस्नान व पूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी भगवान महावीरांच्या प्रतिमेची पालखी साजेश्या अलंकारांनी सजवून भक्तीमय गजरात मंदिरातून बाहेर निघाली. पालखीने वसतिगृह परिसर, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयाचा मार्ग, मुलींचे वसतिगृह आणि पुन्हा डब्ल्यु.आय.टी. जैन मंदिर असा प्रदक्षिणा मार्ग पूर्ण केला.

विद्यार्थिनींनी कलश घेत, आरती करून भगवंतांचे स्वागत केले. वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त पृथ्वीराज, संगीता गांधी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून डॉ. रणजित व माया गांधी यांच्या हस्ते या मिरवणुकीची सुरुवात झाली. याप्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त भूषण शहा, पराग शहा सहभागी झाले होते.

### सोलापूर महानगरपालिका




जगाला अहिंसेचा मार्ग दाखवणारे जगा आणि जगू द्या असे सांगणारे जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांचा जन्म कल्याण महोत्सव महानगरपालिकेच्या वतीने भगवान महावीर चौकातील फलकास पुष्पहार घालून तसेच आचार्य शांतीसागर चौकातील कीर्ती स्तंभास पुष्पचक्र वाहून तर महापालिकेतील कौन्सिल हॉलमध्ये भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करून भगवान महावीरांचा जन्मकल्याण महोत्सव संपन्न झाला यावेळी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पवार, उपयुक्त मगर यांच्या उपस्थितीत भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते विभागीय महिला अध्यक्ष माया पाटील, पंकजा पंडित आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान महावीरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी विक्रांत बशेट्टी, कोमल पाचोरे, अशोक भालेराव, वालचंद पाटील, संजय भस्मे, महावीर नळे, महेश आहेरकर, मृत्युंजय खोबरे, सोहन पाटील, यश पाटील, ओम पाटील, प्रिया पाटील, श्रद्धा शहा, मनोज चवरकर, रोहित थळवे आदी उपस्थित होते.

# स्व.चंद्राम गुरुजींच्या पुतळ्याचे शनिवारी अनावरण

## ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, संजय राठोड यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

दलितमित्र व शिक्षणमहर्षी स्व. चंद्राम चव्हाण गुरुजी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे शनिवारी दि. १२ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता माजी केंद्रीय कृषी मंत्री खा. शरद पवार यांच्या हस्ते अनावरण होणार असल्याची माहिती मागास समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.



येथील विजापूर रोडवरील नेहरु नगर येथे राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली व माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. स्व. चंद्राम चव्हाण गुरुजी यांनी लमाण समाजसेवा संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, कार्य राबवून बहुजन वर्गातील अनेक कुटुंबाना आधार देण्याचे काम केले. सध्या मागास समाज सेवा मंडळ या नावाने ही संस्था कार्यरत आहे. निवासी वस्तीगृह, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ज्यु. कॉलेज, प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, बी.पी. एड. कॉलेज, डी. एड. कॉलेज, तसेच सैनिकी मुलांची शाळा सुरू आहेत. बहुजन वर्गातील हजारो कुटूंबांना उभे करण्याचे काम स्व. चंद्राम चव्हाण गुरुजी यांनी केले आहे. त्यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरण समारंभास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजाभाऊ खरे, बार्शीचे आमदार दिलीप सोपल, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, अभिजीत पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार राणा जगजीतसिंह पाटील, आमदार उत्तमराव जानकर, शिक्षक आमदार जयंत आसगावकर, आमदार प्रकाश राठोड जालना जिल्हयातील मंठा येथील आमदार राजेश राठोड, तेलंगणा येथील मंत्री अमरसिंग तिलावत, गुलबर्गाचे खासदार उमेश जाधव, माजी आमदार राजन पाटील, अक्कलकोटचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, यशवंतराव माने, देवानंद चव्हाण, माजी आमदार दिलीपराव माने, जयवंतराव जगताप, शिवशरणअण्णा पाटील, निर्मलालाई ठोकळ, विश्वनाथ चाकोते, बळीरामकाका साठे, माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, माजी आमदार नारायणआबा पाटील, अरुण लाड, बबनदादा शिंदे, नरसिंग मेंगजी, नरसय्या आडम, शहाजी बापू पाटील, धनाजी साठे, सिध्दाराम म्हेत्रे, प्रकाश यलगुलवार,लक्ष्मणराव ढोबळे, रतिकांत पाटील, प्रशांत परिचारक, दिपक आबा साळुंखे, भारत जाधव, चेतन नरोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याच कार्यक्रमात जय नायडू लिखित पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळा तसेच गरिब, होतकरू, हुशार विद्यार्थ्यांना पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे, असे सुभाष चव्हाण यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस पुतळा अनावरण समितीचे राज कस्तुरे, विजय चव्हाण, जयवंत हक्के, रवि चव्हाण, संजय डोपरे, अशोक कुमार उपस्थित होते.

### शाळकरी मुलाच्या मृत्यूप्रकरणी स्कूल बसचालक व क्लिनरविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सोलापूर ते मंगळवेढा रोडवरील बेलाटीजवळील कोळी वस्ती येथे ८ एप्रिल रोजी झालेल्या स्कुल बसमधून पडून शाळकरी मुलाच्या मृत्यूप्रकरणी स्कूल बसचालक व क्लिनरविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तिपण्णा वालू राठोड (रा. बसवेश्वर नगर तांडा, देगाव, ता उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन स्कुल बसचालक दिलीप भारत माळकर (वय ४४, रा. कवठे, ता. उत्तर सोलापूर) आणि क्लिनर अजित भिमा पवार (रा. गोविंद तांडा, ता. उत्तर सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुराग तिपण्णा राठोड (वय १३, रा. बसवेश्वर नगर तांडा, देगाव) असे मरण पावलेल्या मुलाचे नाव आहे.

८ एप्रिल रोजी सकाळी आकराच्या सुमारास कवठे येथील श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळेच्या बस क्र एमएच १२ एफसी ३८०९ यातून अनुराग राठोड हा शाळा सुटल्यानंतर घराकडे येत होता. पावणे बाराच्या सुमारास स्कुल बस ही कोळी वस्ती येथे आली असता बसमधून अनुराग राठोड हा खाली पडला आणि त्याच्या डोक्यावरून स्कुल बसचे पाठीमागील चाक गेले. त्यामध्ये अनुराग राठोड हा जागीच मृत झाला. स्कुल बस चालविताना चालक दिलीप माळकर व क्लिनर अजित पवार यांनी निष्काळजीपणा केल्याचे दिसून आल्याने याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक खामकर पुढील तपास करीत आहेत.




# मंदिर संस्कृती रक्षणासाठी समन्वय आणि संघटन आवश्यक

## मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट; मंदिर न्यास अधिवेशनात २०० हून अधिक मंदिर विश्वस्तांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा आणि पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिरातील संवर्धनाचे काम करतांना पुरातत्व विभागाने मंदिर, देवतांच्या मूर्ती, मंदिरांतील पुरातन परंपरा, तसेच मंदिराचे ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व यांची हेळसांड करू नये. तसे झाल्यास मंदिर विश्वस्त, भक्त आणि हिंदू रस्त्यावर उतरून याचा विरोध केल्याशिवाय रहाणार नाहीत. मंदिर महासंघाचाही याला विरोध असेल. मंदिर संस्कृती रक्षणासाठी मंदिर विश्वस्त आणि पुजारी यांचा परस्पर समन्वय आणि संघटन आवश्यक आहे, असे मत मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी व्यक्त केले.






### अधिवेशनातील ठराव

१. मंदिरांच्या भूमिंचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखण्यासाठी nti land grabbing act शासनाने तात्काळ लागू करावा.

२. मंदिरांमध्ये भक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेला निधी हा सरकारला दिलेली देणगी किंवा कर नाही. त्यामुळे सरकारला मंदिरांतील पैसा विकासकामांसाठी वापरण्याचा कुठलाही अधिकार नाही. यासाठी महाराष्ट्र सरकारने मंदिरांची संपत्ती विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी.

३. श्री तुळजाभवानी मंदिर आणि पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिर येथील मुख्य मंदिर आणि परिसर येथे विकासकामे करतांना मंदिर, देवतांच्या मूर्ती, मंदिरांतील पुरातन परंपरा, तसेच मंदिराचे ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व यांची हेळसांड करू नये. हेळसांड होतांना आढळल्यास मंदिर महासंघ याचा तीव्र विरोध करेल.

येथील अक्कलकोट रोड, एमआयडीसी मधील पद्मावती कन्व्हेन्शन हॉलमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशनात ते बोलत होते. या अधिवेशनात सोलापूर, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांतील मंदिर विश्वस्त सहभागी झाले होते. तुळजाभवानी मंदिरातील पुजाऱ्यांवर होत असलेल्या आरोपांविषयी घनवट म्हणाले की दोषींवर निश्चित कारवाई करावी; परंतु नॅरेटिव्ह करून पुजाऱ्यांची बदनामी करणे थांबवावे. मंदिरे, हिंदूंची आधारशीला बनण्यासाठी प्रयत्न करावेत. तुळजापूर येथील अधिवक्ता शिरीष कुलकर्णी, देवीच्या पुजाऱ्यांची अपकिर्ती केली जात आहे. दोषी कोण हे न्यायालय ठरवेल आणि त्यांना योग्य ती शिक्षाही देईल. मात्र मंदिर समितीतील कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने आरोप सिद्ध होण्यापूर्वी निरपराध पुजाऱ्यांवर कारवाई करू नये, अन्यथा आम्ही कायदेशीररित्या त्या अधिकाऱ्यांना धडा शिकवू,

अधिवेशनाची सुरुवात सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये, सुनील घनवट, निवृत्त सहधर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख, 'प्रज्ञापूरी ज्ञानपीठा'चे पिठासन धर्माधिकारी प्रसाद पंडित, तुळजाभवानी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, पंचमुखी हनुमान मंदिराचे विश्वस्त आणि उद्योजक सत्यनारायण गुर्रम यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा संदेश पू. (कु.) दीपाली मतकर यांनी वाचला, तर अधिवेशनाचे सूत्रसंचालन हिंदू जनजागृती समितीचे मिनेश पुजारे यांनी केले. यावेळी दीलीप देशमुख यांनी मंदिरांसंदर्भातील कायदेविषयक मार्गदर्शन केले.

### तुळजापूर देवस्थान घोटाळ्यात ८.५ कोटींचा अपहार समोर आणला

तुळजापूर मंदिरे जोपासण्याचे काम भक्तांचे आहे, सरकारचे नाही. शासन अधिग्रहित श्री तुळजापूर देवस्थानातील सरकारी अधिकारी व ठेकेदारांनी केलेला ८.५ कोटींचा घोटाळा आम्ही न्यायालयीन लढ्याच्या माध्यमातून समोर आणला; मात्र या प्रकरणातील आरोपींवर अद्याप कारवाई झालेली नाहीये. **- किशोर गंगणे,** पुजारीमंडळ माजी अध्यक्ष,

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बौद्ध साहित्य संमेलनाचे भीमराव आंबेडकर यांना निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सोलापुरात होणाऱ्या राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलनाचे निमंत्रण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांना देण्यात आले. सोलापुरात शनिवार दि. ३ मे २०२५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात राज्यस्तरीय बौद्ध साहित्य



संमेलन होत आहे. या संमेलनाच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांना सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात आले आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, कार्यवाह भालचंद्र साखरे यांच्या हस्ते त्यांना निमंत्रण पत्र देण्यात आले. शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, प्रफुल्ल जानराव, मुख्याध्यापक विनोद वर, अविनाश भालशंकर, रंजीत माने, अशोक कांबळे यांची उपस्थिती होती.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ महत्वाचे...

### महिलेकडून कपडे धुण्याचे लिक्विड प्राशन

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

अज्ञात कारणातून महिलेने कपडे धुण्याचे लिक्विड प्राशन केले. यात तिला त्रास होऊ लागल्याने उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल केले. हा प्रकार गुरुवारी सकाळी दहा वाजता ७० फूट रोड येथील इंदिरानगर घडला. उमा नारायण हंचाटे (वय ४८, रा. इंदिरानगर, ७० फूट रोड सोलापूर) असे उपचारासाठी दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सकाळी दहा वाजता उमा या त्यांच्या सत्तर फूट रोडवरील घरी होत्या. त्यावेळी त्यांनी अचानकपणे अज्ञात कारणातून कपडे धुण्याचे लिक्विड प्राशन केले. या त्यांना त्रास होऊ लागल्याने त्यांच्या मुलाने त्यांना शासकीय रुग्णालय उपचारात दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### कन्ना चौकातील सिंधी खाण्याजवळ महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

येथील कन्ना चौक परिसरात असलेल्या सिंधी खाण्याजवळ महिलेला तीन महिलांनी हाताने मारहाण केली. हा प्रकार गुरुवारी सकाळी ११ वाजता घडला. रेशमा सलीम शेख (वय ३०, या. शास्त्री नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सकाळी रेशमा या कन्ना चौक येथील शिंदी खाण्याजवळ कामानिमित्त गेल्या होत्या. त्यावेळी तेथे जयश्री व इतर दोन महिलांनी हाताने मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने दुपारी दीड वाजता त्या स्वतः शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### गवळी वस्तीत तरुणाला जमावाकडून मारहाण

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

दमानी नगर परिसरातील गवळी वस्ती येथे तरुणाला पाच जणांच्या जमावाने मारहाण केली. गुरुवारी रात्री १२ वाजता हा प्रकार घडला. गणेश गोपाळ राक्षे (वय २५, रा गवळी वस्ती सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. गुरुवारी रात्री बाराच्या सुमारास गणेश हा त्याच्या गवळी वस्ती येथील घराजवळ थांबला होता. त्यावेळी तेथे आलेल्या आदी माने आदी भोसले व इतर तीन यांनी विनाकारण गणेश यास चाकूने मारहाण केली. यात गणेशा डोक्याला जखम झाली आहे. तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागला भाऊ सागर राक्षे याने रात्री सव्वा बारा वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### संशयातून महिलेला झाडू कापण्याच्या कात्रीने मारहाण

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

महिलेवर संशय घेऊन तिला लाथा बुक्क्यांनी तसेच झाडू कापण्याच्या कात्रीने मारहाण करून जखमी केले. ही मारहान बुधवारी रात्री दहा वाजता कुमठा नाका परिसरातील सम्राट अशोक सोसायटीत घडली. दिपाली पांडुरंग कांबळे (वय ३९) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. बुधवारी रात्री दिपाली या त्यांच्या सम्राट अशोक सोसायटीतील घरी होत्या. त्यावेळी त्यांच्यावर संशय घेऊन दारूच्या नशेत झाडू कापण्याच्या कात्रीने त्यांना मारहाण केली. यात त्यांच्या गळ्याला जखम झाली आहे. तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याने त्यांच्या सर्वांगास मुक्कामार लागला आहे . रात्री साडेदहा वाजता त्या स्वतः उपचाराकरिता शासकीय रुग्णाला दाखल झाल्या. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### मुलाबरोबर तक्रार; वडिलांनी स्वतःला जखमी करून घेतले

**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

मुलाबरोबर झालेल्या तक्रारीचा राग अनावर झाल्याने वडिलांनी अज्ञात वस्तूने डाव्या हाताला व गळ्याला जखमा करून घेतल्या हा प्रकार बुधवारी रात्री ८.१५ वाजता शहरात घडला. दत्तात्रय बालपण कोंडा ( वय ५२, या. पाच्छा पेठ, सोलापूर) असे जखमी करून घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी रात्री ते नीलम नगर परिसरातील सिद्धेश्वर नगर येथील घरी होते. त्यावेळी तेथील घराच्या बाहेर दत्तात्रय यांची त्यांच्या मुलासोबत तक्रार झाली. या तक्रारीनंतर दत्तात्रय यांना राग अनावर झाल्याने त्यांनी स्वतः अज्ञात वस्तूने डाव्या हातावर तसेच गळ्यावर जखमा करून घेतल्या. यानंतर मुलगा विनोद याने त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# पंढरपूर विकास आराखडा समाजमाध्यमांवर व्हायरल

## ● शासन, प्रशासनाकडून कोणताही अधिकृत दुजोरा नाही; नागरिकांमधील संभ्रमावस्था वाढली



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० एप्रिल -**

श्री विठ्ठल मंदिर परिसरातील बहुचर्चित असलेल्या विकास आराखडा काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांना सादर केल्यानंतर या विकास आराखड्यातील माहिती बुधवारी समाजमाध्यमांवर व्हायरल झाली.

मुळात अशा प्रकारे हा आराखडा समाज समाजमाध्यमांवर जाहीर व्हायरल करण्यापेक्षा जिल्हा प्रशासनातील जबाबदार आधिकाऱ्यांनी त्याबद्दल माहिती देणे अपेक्षीत होते. जिल्हा प्रशासनाकडून अजूनही अधिकृतपणे हा आराखडा जाहीर करण्यात आला नसल्यामुळे पंढरपूरकर नागरिकांमध्ये आराखड्याबद्दल आणखीनच संभ्रमावस्था वाढलेली दिसत आहे.चंद्रभागेतील पात्रात कायम स्वरूपी स्वच्छ व शुध्द पाणी राहावे यासाठी कृत्रिम कालवे तयार करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये जुना दगडी पुलापासून कृत्रिम कालवा बांधण्याचेही विकास आराखड्यात नमूद करण्यात आले आहे. मात्र या पूर्वीच्या प्रसिध्द झालेल्या विकास आराखड्यामध्ये वाराणसीच्या धर्तीवर चंद्रभागा नदीवरील सर्व अतिशय प्राचिन अशा १२ घाटांच्या विकासाबाबतचा कोणताही उहापोह सध्याच्या व्हायरल झालेल्या आराखड्यामध्ये करण्यात आलेला दिसत नाही.

### ▶▶ बाधितांना सर्वोत्तम मोबदला

विठ्ठल मंदिर परिसरात कॉरिडॉरमध्ये बाधित होणाऱ्या व्यापारी आणि दुकानदारांना याच भागात नवीन दुकान गाळे बांधून देण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे. शिवाय बाधित होणाऱ्या मालमत्ताधारकांना इतर प्रकल्पापेक्षा अधिकची नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन यापूर्वीच मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

### ▶▶ हा पोरकटपणा : नागरिकांच्या उद्विग्न प्रतिक्रिया

मुख्यमंत्र्यांनी येत्या तीन महिन्यात कॉरिडॉरच्या कामाला सुरवात होईल असे जाहीर केले होते. त्यानंतर पंढरपूरकरांसाठी आराखड्यातील माहिती जाहीर करण्याची मागणी सातत्याने होत होती. मात्र अशा प्रकारे आराखड्याची माहिती कोणताही अधिकृत दुजोरा न देता समाज माध्यमांवर व्हायरल झाल्याने हा शासन, प्रशासनाचा निव्वळ पोरकटपणा असल्याच्या प्रतिक्रिया पंढरपूरकरांमधुन ऐकावयास मिळत आहेत.

### ▶▶ असा आहे तिर्थक्षेत्र विकास आराखडा

विठ्ठल मंदिर कॉरिडॉर की ज्यामध्ये श्री विठ्ठल मंदिर परिसरातील चौफळा ते महाद्वार या भागाचा विकास केला जाणार आहे. या भागातील १०० मीटर अंतरापर्यंतच्या मालमत्ता बाधित होणार आहेत. या परिसरात शासनकडून लवकरच भुसंपादन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या शिवाय चंद्रभागा स्नान व्यवस्था, रस्ते विकास, वाहनतळ विकास, पालखीतळ विकास, वारकरी विश्रांती कक्ष आदी बाबींचा देखील या विकास आराखड्यात विचार करुन योग्य प्रकारे विकास करण्याचे नियोजन आहे. या परिसरात शासनकडून लवकरच भुसंपादन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**● मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉर, मंदिरापासून अंदाजे रुंदी**

चौफळा ते पश्चिमद्वार घाट : ( शंभर मीटर ). पश्चिमद्वार ते नामदेव पायरी : ( साठ ते शंभर मीटर ). संत नामदेव पायरी ते महाव्दार घाट : ( शंभर मीटर ). चौफळा ते महाद्वार घाटापर्यंत : (पाचशे मीटर लांबी)

**● ६० मीटरपर्यंत बाधित होणाऱ्या मालमत्ता**

निवासी मालमत्ता : १६३ (२८.६२ कोटी मूल्य). अनिवासी मालमत्ताः ३८४ (७०.५० कोटी मूल्य ).

**● ८० मीटरपर्यंत बाधित होणाऱ्या मालमत्ता**

निवासी मालमत्ता : २९० (५२ कोटी ३४ लाख). अनिवासी मालमत्ता : ४३८ ( सुमारे ५३ कोटी ).

**● १०० मीटरपर्यंत बाधित होणाऱ्या मालमत्ता**

निवासी मालमत्ता : ४२४ (८३ कोटी ६४ लाख). अनिवासी मालमत्ता : ५१० (७२ कोटी ५२ लाख).

# बांधकाम साईटवरून ७० लाखांचे साहित्य चोरीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

शहरातील गुरूनानक चौकात बांधण्यात येणाऱ्या धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या इमारतीच्या कामाच्या साईटवरील ७० लाखांचे बांधकामाचे साहित्य स्वतःच्या फायद्यासाठी वापरणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत धर्मा नरसप्पा कोडवान (वय ४५, रा. ओम नमः शिवाय नगर, कुमठा रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फियादीवरुन सुजित मल्लिकार्जुन गायकवाड (रा. भिमा नगर, जुळे सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धर्मा कोडवान यांच्या मालकाचे बांधकाम सेंट्रींगचे ६० ते ७० लाखांचे बांधकाम साहित्य गुरुनानक चौकात सुरु होणाऱ्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय या शासकीय इमारतीच्या बांधकामाच्या साईटवर ठेवलेले होते. ७ नोव्हेंबर २०२४ ते ८ एप्रिल २०२५ या कालावधीत सुजित गायकवाड याने कोडवान यांचे बांधकाम साहित्य सुजित गायकवाड याने स्वतःच्या फायद्यासाठी वापर केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मल्लिकार्जुन नगरातून ४० हजारांची दुचाकी लंपास

सोलापूर : शहरातील अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगरात असलेल्या अरमान रेसीडेन्सीच्या पार्किंगमधून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सोहेल बशीर निगेवान (वय २४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ एप्रिल रोजी रात्री सोहेल निगेवान यांनी त्याची एमएच १३ डीझेड १८९२ क्रमांकाची दुचाकी ही घराजवळ पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस नाईक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# दुध भेसळ गुन्ह्यातील फरार आरोपींना अटक

## राजस्थानमधून घेतले ताब्यात; भोसे येथील प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१० एप्रिल-**

दि.२० फेब्रुवारी करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सागर कुंजीर यांना गोपनिय बातमीदारा मार्फत मौजे भोसे ता.पंढरपूर गावचे हददीत भेसळयुक्त दुध तयार करून त्याची वाहतुक होत असलेबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाच्या मदतीने छापा टाकून कारवाई करण्यात आली. यामधील मुख्य आरोपी दत्तात्रय महादेव जाधव (रा.भोसे ता.पंढरपुर) याचे मालकीचे जागेतुन कृत्रीम दुध बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आला होता. त्याअनुषंघाने करकंब पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील एक आरोपी सचिन अरुण फाळके (वय ३१, रा.पांढरेवाडी ता.पंढरपुर) यास अटक करण्यात आली होती. मुख्य आरोपी दत्तात्रय महादेव जाधव व पत्नी सोनाली दत्तात्रय जाधव दोघे रा.भोसे ता.पंढरपूर तसेच अनिकेत बबन कोरके रा.सुगाव भोसे ता.पंढरपूर, पृथ्वीराज उर्फ सोन्या नवनाथ शिंदे रा.पांढरेवाडी ता.पंढरपूर हे फरार होते.







गुन्हयाचा तपास पंढरपूरचे उप-विभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले हे करीत असताना तांत्रीक तपास व गोपनीय बातमीदार यांचे मदतीने मुख्य आरोपी दत्तात्रय महादेव जाधव, त्याची पत्नी सोनाली दत्तात्रय जाधव हे दोघे खाटुबडी राजस्थान येथे असल्याची बातमी मिळाल्याने पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे सपोनि अशिष कांबळे व सोबत पोहेकॉ प्रसाद आवटी, मपोहेकॉ मोनिका पवार, पोकॉ शहाजी मंडले यांनी खाटुबडी (राजस्थान) येथे जाऊन दोन्ही आरोपींना शोधुन अटक केली. सपोफौ शरद कदम, पोहेकॉ सुरज हेंबाडे यांनी अनिकेत बबन कोरके यास पुणे येथुन तर पृथ्वीराज शिंदे यास अकलुज येथुन ताब्यात घेतले. सदर कारवाईसाठी सायबर विभागाचे पोकॉ रतन जाधव यांनी तांत्रीक मदत केली.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, व त्यांची टिम सपोनि सागर कुंजीर, पोसई हमीद शेख, निलेश गायकवाड, पोहेका बापुराव मोरे, अशोक भोसले, निलेश रोंगे, पोना राहुल लोंढे, विनोद शिंदे, पोकॉ सिताराम चव्हाण, स्वप्निल बागल इत्यादी पोलीस अधिकारी व अंमलदार करीत असुन सध्या अटक आरोपी पोलीस कोठडीत असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

# धर्मपुरी जि.प. शाळेच्या इमारतीचे बांधकाम रखडले

## ● प्रशासनाच्या ढिसाळ कारभार; एक वर्षापासून प्रलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

धर्मपुरी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या इमारतीचे काम प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे रखडले आहे.

धर्मपुरी ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती यांनी एका महिन्यापूर्वी आमरण उपोषणाचा इशारा पत्राद्वारे दिल्यानंतर जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी लेखी स्वरूपात पत्र देऊन धर्मपुरी ग्रामस्थांना पाच महिन्यामध्ये शाळेचे सर्व काम नवीन मॉडेल डिझाईन प्रमाणे पूर्ण करण्याचे कळविले होते. परंतु एक महिना झाला तरी प्रत्यक्षात अजून



कामाला सुरवात झाली नाही. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे धर्मपुरी शाळेचे बांधकाम एक वर्षापासून प्रलंबित आहे. बसायला जागा नसल्यामुळे शाळेचा पट कमी होत आहे, याला सर्वस्वी बांधकाम विभाग जबाबदार आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.




दोन महिन्यानंतर पावसाळ्याला सुरूवात होणार आहे आणि पाऊस सुरु झाला की प्रशासन पावसाचे कारण देऊन अजून वर्षभर बांधकाम पुढे ढकलण्याची शक्यता आहे. यामुळे गावातील मुलांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी त्वरित बांधकाम सुरु न केल्यास व येणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी इमारत उभीमु न राहिल्यास पूढील शैक्षणिक हक्कासाठी पुन्हा उपोषणास बसणार व न्याय मागण्यासाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे ॲड. संदीप वाघ यांनी सांगितले. तरी प्रशासनाने शाळेचे बांधकाम त्वरित सुरु करून वेळेत पूर्ण करावे, अशी मागणी धर्मपुरी ग्रामस्थांनी व पालकांनी केली आहे



**सोलापूर : सोलापुरातील मूर्तीकार मंजुळे यांच्या हनुमान मूर्तींना धाराशिव, तुळजापूर आदी भागात मोठी मागणी असते. उद्याच्या हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर मूर्तीकार मंजुळे हे मूर्तींवर शेवटचा हात फिरवताना. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# शहरातील गुंठेवारीचा प्रश्न लागणार मार्गी



## ● हजारो प्रलंबित प्रकरणे देखील निघणार निकाली
## ● महसूल विभागाच्या पुढील कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

गुंठेवारीसंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने निर्णय घेण्याचे पाऊल उचलल्याने सोलापुरातील 'गुंठेवारी' चा हा प्रश्न आता मार्गी लागणार आहे. यासाठी आमदार विजयकुमार देशमुख यांनी वारंवार पाठपुरावा आणि बैठकीच्या माध्यमातून जोरदार प्रयत्न केले. 'गुंठेवारी' चा हा प्रश्न मार्गी लागत असल्याने हजारो प्रलंबित प्रकरणे देखील निकाली निघणार आहेत.

महसूल विभागाच्या पुढील कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षापासून गुंठेवारीचा महत्त्वपूर्ण प्रश्न निकाली निघत नसल्याने शहरातील अनेक विकास कामे खोळंबली होती. सन २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार विजयकुमार देशमुख यांनी सोलापूर हद्दवाढ भागातील गुंठेवारीचा प्रश्न मांडला होता. यावरून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोलापुरातील गुंठेवारी संदर्भात बैठक घेऊन हा विषय मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार बुधवारी मुंबईत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात गुंठेवारी संदर्भात बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, भूमी अधीक्षक दादासाहेब घोडके व उपभूमी अधीक्षक सावंत आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित विभागाचे अधिकारी हे व्हिडिओ कॉन्फ्रन्सिंगद्वारे उपस्थित होते.

या बैठकीत सोलापूर शहराची १९९२ मध्ये हद्दवाढ झाल्यानंतर सोलापूर शहरालगतचे मजरेवाडी, कुमठे, सोरेगाव, नेहरू नगर, प्रताप नगर, देगाव, बसवेश्वरनगर, शिवाजीनगर, बाळे, केगाव, दहिटणे, कसबे सोलापूर, शेळगी ही गावे सोलापूर महापालिकेत समाविष्ट झाली होती. परंतु या गावकऱ्यांना शहराप्रमाणे कोणत्याही सुविधा मिळाल्या नाहीत. गुंठेवारीला परवानगी नसल्याने अनेकांना नोटरीद्वारे जागा घेऊन घरे बांधावी लागत आहेत. या १२ गावातील नागरिकांचे प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. या भागातील राहिवाश्यांना गुंठेवारीला परवानगी मागीतल्यावर भूमीअभिलेख कार्यालयाकडून महापालिकेचा प्राथमिक लेआउट मागितला जातो. तर महापालिकेचे अधिकारी त्या जागेचा मोजणी नकाशा व मालकीचे मूळ कागदपत्रे मागतात. शिवाय ते नसल्याने बांधकाम परवानगी मिळत नाही. अशावेळी स्वतःच्या हक्काची जागा असताना देखील अनेकांना ही जागा विकता येत नाही किंवा परवानगी घेऊन जागा खरेदी करता येत नाही. आणि तेथे घरही बांधता येत नाही. अशी मोठी अडचण निर्माण झाली आहे. यामुळेच या भागाचा विकास रखडला असल्याने हा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा अशी मागणी आ. विजय देशमुख यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. यामध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना आमदार विजय देशमुख यांच्याशी संपर्कात राहून सोलापूर शहरात तात्काळ गुंठेवारीचे कॅम्प आयोजित करून गुंठेवारीची प्रकरणे तत्काळ निकाली काढावी असे आदेश दिले. यामुळे आता लवकरच गुंठेवारीचा मोठा प्रश्न मार्गी लागण्याचे आणि अनेक प्रकरणे देखील निकाली लागणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, महसूल विभागाच्या पुढील कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. या बैठकीस ज्ञानेश्वर कारभारी, सोमनाथ रगबले, किरण पवार, ॲड. फुलारी आदी उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८३

**झाडू संतांचे मारग । आडरानीं भरलें जग ।**
**उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ।।**

औरंगाबादला आम्ही भाड्याने ज्या गल्लीत राहत होतो, त्या गल्लीतील अनेकांचा परीचय आम्हाला झाला होता. नेमका कोण कुठे राहतो, हे माहित नव्हते; पण येता-जाता, हिंडता-फिरता रस्त्यावर भेट झाली की अनेकांशी नमस्कार, रामराम व्हायचा. एके दिवशी मी एके ठिकाणी केलेल्या किर्तनाची, वृक्ष लागवड करणे व पाणी अडवणे हे पुण्य कर्म तर आत्महत्या हे पाप कर्म या मथळ्याखाली काही वृत्तपत्रातून बातमी आली. गल्लीतल्या एका महाशयाने ती बातमी वाचली; अन ते आमच्या घरी आले. अरे व्वा तुम्ही कीर्तन करतां हे माहित नव्हते. तुम्ही कीर्तनात फक्त पाणी आडवा, पाणी जीरवा एवढेच सांगू नका तर पाण्याचा नियोजनबध्द वापर, पाण्याचे योग्य व्यवस्थापन करा, असेही सांगत जा, असे ते म्हणाले. पाण्याच्या थेंबा-थेंबाचे महत्त्व किती असते, हे लोकांना पटवण्यासाठी मी कीर्तनातून कसे आणि काय बोलावे, हे त्यांनी मला छान प्रकारे समजावले. आपणालाही कोणीतरी चांगले सांगणारा आहे, याचा मला आनंद वाटला.



योग असा की एके दिवशी मी सकाळी त्यांच्या घरा समोरून श्रीरामभक्त हनुमान मंदिराकडे जात होतो. ते घर त्यांचे आहे हे मला माहित नव्हते. पण ते अंगणात कार धुत असल्याने त्यांचे घर असल्याचे कळले. नळाला पाणी आले होते. त्यांनी नळाला मोटर जोडली होती. वेगवान पाण्याने ते कार धुत होते. बरेच पाणी वाया जात होते. रस्त्यावर बरेच पाणी साठले होते व वाहतही होते. मला राहावले नाही. मी त्यांना याबाबत विचारले. ते म्हणाले, दररोज नाही धुत, एक दिवस आड पाणी येते, त्यामुळे एक दिवस आड धुतो. कधी कधी चार दिवसाला धुतो. आम्ही कार धुतली काय आणि नाही धुतली काय, उरलेले पाणी तर वायाच जाईल ना!. आम्हाला पाण्याचे महत्त्व कळते माऊली ! पाणी आहे म्हणून धुतो. कमी पडले असते तर आम्ही थेंबा-थेंबाचा विचार केला असताच की !. असे ते बोलले. यांच्याबद्दल आपल्या मनात जो विचार आला असेल, तसा विचार माझ्याही मनात आला. मी काहीतरी बोलण्याच्या आत त्यांनी सहजपणे विषयाला बगल दिली, अन् जणू त्यांच्याकडून काही चुकलेच नाही, अशा अविर्भावात मला, चला चहा घेऊ, असे ते म्हणाले. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर, किती लोक बोलतात तसे किंवा सांगतात तसे वागतात ? हा प्रश्न माझ्या मनात आणखी बळकट झाला होता. असो, त्यांनी विषयाला बगल दिली तरीही मी, जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या, झाडू संतांचे मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग। शेष उरलें तें सेवूं।। या वचनाची मनात आठवण करुन त्यांचेशी या विषयावर बोलत राहीलो. त्यांनी असे पाणी वाया घातले नाही तर ते पाणी इतरांच्या कामी कसे येऊ शकते. सर्वांनी आवश्यक तेवढे पाणी घेऊन नळ बंद केले तर त्याचा चांगला परिणाम कसा होऊ शकतो. नळाला मोटारी लावून पाणी घेणे कसे चुकीचे आहे. असे बरेच काही बोलून मी त्यांच्या घरातून बाहेर पडत असतांना ते म्हणाले, माऊली साहेब यापुढे तुम्हाला आमच्याकडून पाणी वाया घालवलेले कधीही दिसणार नाही. खरे म्हणजे ते बोलले तसे पुढे वागलेही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस, महात्मा फुले जन्मदिन पौर्णिमा |
| दि. ११ एप्रिल २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - चैत्र | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. चतुर्दशी (२७.२१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - उ. फाल्गुनी (१५.०९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - ध्रुव (१९.४४) | |
| करण - गर (१४.०९) | |

### राशीभविष्य

**मेष :** मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नोकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

**वृषभ :** आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील.

**मिथुन :** कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत. स्पर्धेमध्ये यश मिळेल.

**कर्क :** उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील.

**सिंह :** आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**कन्या :** आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**तुळ :** प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**वृश्चिक :** आपल्या पराक्रम वृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**धनु :** न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर:** अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**कुंभ :** प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल.

**मीन :** आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

# एसटी स्टँड समोरील नियोजित रॅम्प रद्द

## वाहतूक कोंडी वाढण्याच्या शक्यतेमुळे एसटीने केलेली मागणी प्राधिनकरणाकडून मान्य

## ९.६ किमीच्या उड्डाणपूल परिसरात सहा ठिकाणी रॅम्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने एसटी स्टँड समोर प्रवेश आणि निर्गमन रॅम्प असणे गरजेचे असून, तसा प्लॅन तयार केला. एसटी स्टँड समोर किंवा परिसरात रॅम्प नको. यामुळे उलट वाहतुकीची कोंडी वाढेल, अशी भूमिका एसटी विभागाने घेतल्यामुळे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी नियोजित प्लॅन बदलला. रैम्प आता दुसऱ्या ठिकाणी बनवण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक राकेश जवादे यांनी दिली.

दरम्यान, प्राप्त माहितीनुसार, एसटी स्टँड परिसराची जागा एसटी महामंडळाची नाही. ती करार पद्धतीवर एसटीला मिळालेली आहे. सदर रॅम्प एसटीच्या जागेवर नियोजित होता.भविष्यात जागेचा करार संपल्यानंतर अडचणी येऊ शकते, असे अधिकाऱ्यांना वाटते. या पार्श्वभूवर नियोजित रॅम्पला विरोध केल्याची माहिती मिळाली आहे.

> **महापालिकेच्या वतीने भूसंपादनाचे काम सुरू**
>
> राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महापालिका यांच्या संयुक्त मोहिमेत सदरचे कामकाज सुरू आहे. महापालिका प्रशासन भूसंपादनाच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे सदरचे काम महापालिका प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आले आहे. सोलापूर बस स्थानक समोर येणाऱ्या रॅम्पला एसटी महामंडळाने निवेदनाद्वारे रद्द करण्याची मागणी केली होती. त्यानुसार सदरचा रॅम्पा रद्द करण्यात आला आहे. प्रस्तावित उड्डाण पुलाच्या खालून एसटीचे आउट आणि इन सुरू राहणार आहे.
>
> **- राकेश जवादे,**
> प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण.



शहरात ९.६ किमी अंतराचे उड्डाणपूल होणार आहेत. यासाठी केंद्री रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी ९६६ कोटी रुपयांची निधी मंजूर केल आहे. दोन उड्डाणपुलांना सहा ठिकाणी प्रवेश आणि निर्गमन रॅम्प असणार आहेत. तसेच दोन सर्व्हिस रस्तेही असणार आहेत. तसा आराखडा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी बनवला आहे. या आराखड्यास महापालिकेनेही मंजुरी दिली असून, आता भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याची सूचना नितीन गडकरी यांनी केली आहे. जोपर्यंत भूसंपादन होत नाही, तोपर्यंत निविदा काढता येणार नाही. यापार्श्वभूवर आता महापालिकेच्या अधिकाऱ्यांनाही आता भूसंपादनासाठी युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राष्ट्रपिता घोषित करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केंद्र सरकारने राष्ट्रपिता घोषित करावे, अशी मागणी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनमनातील राष्ट्रपिता' या पुस्तकाचे लेखक सुशील फडके यांनी पत्रकार परिषदेत केली.

सर्वोच्च न्यायालयास दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनमनातील राष्ट्रपिता' हे पुस्तकरुपी पत्र पाठविण्यात आले होते. तसेच १ फेब्रुवारी २०२४ रोजी सोलापूर येथे या जाहीर पत्राबाबत अवगत केले होते. आपला देश वाचवण्यासाठी डॉ.आंबेडकर यांना राष्ट्रपिता घोषित करणे अत्यंत आवश्यक असल्याचे या पत्रात नमूद केले होते. आजपर्यंत या मागणीची दखल सर्वोच्च न्यायालय व शासनाने घेतलेली नाही. दिनांक १४ एप्रिल पूर्वी शासनाने याबाबत पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे. अनेक संस्था संघटना यासंदर्भात आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. आंदोलने झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सर्वोच्च न्यायालय व शासन-प्रशासनाची असेल. डॉ. आंबेडकर यांना राष्ट्रपिता घोषीत करण्याच्या मागणीला उरुवेला महा बुद्ध सेवा ट्रस्ट (पुणे), बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ (सोलापूर), वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर, रमाई युथ फाऊंडेशन सोलापूर, ऑल इंडिया पंथर सेना शाखा मंगळवेढा तालुका, पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र या विविध संघटनांनी पाठिंबा दिला आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या पत्रकार परिषदेस पुस्तकाचे सहलेखक रजनीकांत क्षीरसागर, बापु भास्कर, परमेश्वर हासबे उपस्थित होते.



## श्राविका संकुलात भगवान महावीरांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

येथील श्राविका शिक्षण संकुलात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर समाज जगाला शांती आणि अहिंसेचे संदेश देणारे भगवान महावीर यांची जन्मकल्याणक उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

याप्रसंगी श्राविका संस्थेच्या विश्वस्त देवेश शहा, वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, मुख्याध्यापिका राखी देशमाने, मुख्याध्यापक स्वाती कांबळे, प्राचार्य विलास लेंगरे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, अरिहंत रत्नपारखे, अनंतमती बुन, यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी श्राविका संस्थेच्या विश्वस्त देवई शहा यांच्या हस्ते भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पुष्पांजली समर्पित करून ध्वजारोहण करण्यात आले तसेच सामूहिक ध्वजगीत म्हणण्यात आले. यानंतर प्रशालेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख अनंत बळ्ळे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन अनंत बळ्ळे यांनी केले तर आभार क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांनी मानले

## सकल माळी समाजसेवा संस्थेच्या पुरस्कारांचे रविवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

सकल माळी समाज सेवा संस्थेतर्फे गतवर्षीप्रमाणे यंदाही पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम रविवार दि. १३ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता समाज कल्याण केंद्र, रंगभवन चौक, सोलापूर येथे होणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष श्रीरंग येळवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पालकमंत्री जयकुमार गोरे,आमदार देवेंद्र कोठे आणि माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची ११ एप्रिल रोजी जयंती आहे. या जयंतीचे औचित्य साधून महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले जीवनगौरव पुरस्कार २०२५, महात्मा जोतीराव फुले राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक, शिक्षक, उद्योजक, समाज प्रबोधनकार असे पुरस्कार या कार्यक्रमात देण्यात येणार आहेत. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापिका, शिक्षिका, समाज प्रबोधनकार असे पुरस्कार शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनीय कार्य करत असलेल्या विविध समाजातील मान्यवरांना या थोर महापुरुषांच्या नावाने पुरस्कार देण्यात येणार आहे. यावेळी संस्थेचे सचिव संतोष गायकवाड उपस्थित होते.

## इथेनॉलची वाहतूक करणारे तीन टँकर पेटले

### लाखोंचे नुकसान; बुधवारी पहाटेची घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

पाकणी (ता. उत्तर सोलापूर) येथील हॉटेल स्वराज्य समोर पार्क केलेले जयहिंद शुगरचे इथेनॉल वाहतूक करणारे तीन टँकरने बुधवारी पहाटेच्या सुमारास अचानक पेट घेतला. यामध्ये लाखों रुपयांचे नुकसान झाले असून आग विझवितेवेळी तिन्ही टँकर चालक जखमी झाले. पहाटेच्यावेळी टँकरला लागलेल्या अचानकपणे आगीमुळे ही आग कशामुळे लागली याबाबत नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा ऐकायला मिळत आहे.

पाकणी येथील इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन या ऑइल पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना साखर कारखान्याकडून इथेनॉल पुरवठा केला जातो. रात्री साखर कारखान्यावरून इथेनॉल घेऊन आलेले टँकर कंपनीमध्ये सकाळी खाली होत असल्याकारणाने ते हॉटेल स्वराज्यसमोरील जागेत एमएच ४३ वाय ८४३६, एमएच २१ एबी ७४४४ आणि एमएच ४३ - ८०३७ या क्रमांकाचे टँकर पार्क केलेले होते. बुधवारी पहाटेच्या सुमारास या टँकरला अचानकपणे आग लागली. आगीने तात्काळ रौद्र रुप धारण केल्यामुळे लागलीच तिन्ही टँकरने पेट घेतला. जिथे टँकर पार्क केलेले होते, तिथे कोणत्याही प्रकारची सोय, सुरक्षा नव्हती. असे असतानाही वाहन चालक आपली वाहने अशा खाजगी पार्किंग मध्ये लावतात. आग लागलेल्या तीन टँकर पैकी एक टँकर भारत पेट्रोलियम कार्पोरेशन साठी इथेनॉल घेऊन आला होता तर दुसरा टँकर हिंदुस्तान पेट्रोलियम साठी इथेनॉल घेऊन आलेला होता आणि तिसरा टँकर या ठिकाणी मोकळा असल्याचं समजते. परंतु दोन टँकर इथेनॉलने भरलेले असताना तिसऱ्या टँकर मध्ये आग कशी लागली हा संशोधनाचा विषय आहे.

आग मोठ्या प्रमाणावर लागल्या कारणाने चिंचोली एमआयडीसीतील अग्निशामक दलाचे फायर ऑफिसर अंभोरे, ज्योतीराम शिंदे, के टी साळुंखे, व्हि.टी शिंदे, आडूबगिरे, घुगे, डोलतोडे, डी ए रकटे, एन जी राठोड तसेच सोलापूर महानगरपालिकेचे अग्निशामक दलाचे कर्मचारी यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पहाटे साडेचार वाजता लागलेली आग सकाळी उशिरापर्यंत अग्निशामक दलाचे कर्मचारी आग विझविण्याचे शर्तीचे प्रयत्न करीत होते. याची माहिती मिळताच घटनास्थळी तालुका पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे, पोलिस उपनिरीक्षक कांबळे, राठोड, गंपले, कोंडी बीटचे हवालदार देवकर, पाकणी गावचे पोलीस पाटील तुकाराम पाटील तसेच महसुली विभागाचे मंडल अधिकारी स्वामी, पाकणी गावचे तलाठी एम. एन. हकीम, कोतवाल दीपक चंदनशिवे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी उत्पादन शुल्कचे अधिकाऱ्यानी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आग नेमकी कशी लागली याची चौकशी होणे गरजेचे आहे, अशी चर्चा उपस्थित नागरिकांमध्ये होताना ऐकायला मिळत होती. जय हिंद साखर कारखान्याकडून घटनास्थळाला दुपारपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याने भेट दिलेली नव्हती. तसेच दुपारपर्यंत या संबंधित कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्याची नोंद तालुका पोलीस स्टेशनकडे झालेली नव्हती.

## २५ मे रोजी धनगर समाजातील वधू-वर पालक परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दीनिमित्त २५ मे रोजी सोलापुरात धनगर समाजातील वधु-वर, पालक परिचय मेळावा आयोजित केला आहे, अशी माहिती राजमाता सामाजिक प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रामचंद्र धर्मशाले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उपक्रमाचे यंदा नववे वर्ष आहे. २५ मे रोजी सुंदर मल्टिपर्पज हॉल, नेहरूनगर, विजयपूर रोड, सोलापूर येथे कार्याध्यक्ष रामचंद्र धर्मसाले व उपाध्यक्ष चंद्रकांत धालपे (नातेपुते) यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी १० ते ३ या वेळेत मेळाव्याचे आयोजन केले आहे. संस्थेने वधु-वरांच्या माहिती पुस्तिकेत मोफत नावनोंदणी करीता दि. ३० एप्रिल पर्यंत मुदत दिली आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन प्रा. डॉ. यशपाल भिंगे यांच्या हस्ते होणार आहे. नाव नोंदणीसाठी पालक व इच्छुकांनी संस्थापक रविंद्र पां. नागणकेरी , कार्याध्यक्ष रामचंद्र धर्मसाले, चंद्रकांत धालपे यांच्याशी संपर्क साधावा. फॉर्म घेण्यासाठी साई टेक्स्टाईल्स्, चाटी गल्ली, सोलापूर,श्रेया ॲग्रो, आसरा चौक, सोलापूर, डॉ. शिंदे डेंटल हॉस्पिटल, सैफुल चौक, सोलापूर, श्री ॲटो, शिवाजी चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र नागणकेरी, माजी कार्याध्यक्ष सुहास गडदे, सदाशिव व्हनमाने, नंदकिशोर केरूरकर, रवींद्र कानलकिरी आदी उपस्थित होते.

## आंतरजातीय प्रेमविवाह, सैराट बाप अन् अटकेतील बापाला माफ करणारी प्रेमळ मुलगी!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

मुलीचे बापावर अगाध प्रेम असते. बाप जरी तिच्या जिवावर उठला तरी ते प्रेम तसुभरही कमी होत नसते. त्याचा प्रत्यय आणून देणारी घटना पंढरपूरच्या न्यायालयात घडली.

घरच्या मंडळींचा विरोध झुगारून मुलीने बंड करून परजातीच्या तरूणाशी प्रेमविवाह केल्यामुळे संतापलेल्या बापाने आपल्या घराण्याची इज्जत गेली म्हणून तिसऱ्याच दिवशी मुलीसह जावयाचा काटा काढण्याचा डाव रचला. परंतु तो यशस्वी झाला नाही. त्यानंतर काही दिवसांनी तो पिस्तूल घेऊन एका मोटारीतून तडक निघाला होता. परंतु वाटेत रात्री गस्त घालणाऱ्या पोलिसांनी केलेल्या तपासणीत त्याच्या मोटारीत बेकायदा पिस्तूल सापडले. त्याच्यासह इतर दोघांना पोलिसांनी अटक केली. तपासादरम्यान पोटच्या मुलीने विरोध झुगारुन केलेल्या आंतरजातीय विवाहामुळे घराण्याची अब्रू गेली म्हणून संतापलेल्या बापाने 'सैराट' होऊन पोटच्या मुलीसह जावयाला खलास करण्याचा डाव रचल्याचे निष्पन्न झाले.


अटकेनंतर बापासह अन्य दोघा साथीदारांनी जामिनावर सुटण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. परंतु बाप तुरूंगातून सुटून बाहेर आला तर मुलगी आणि जावई दोघांच्याही जीविताला धोका निर्माण होईल, असा आक्षेप सरकार पक्षाने घेतला होता. तब्बल दोनवेळा बापाचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. दरम्यान या खटल्यात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर पुन्हा बापाने जामीन अर्ज दाखल केला असता एव्हाना, गरोदर झालेल्या मुलीचे मन द्रवले. तिने बापाला माफ करण्याचे मनापासून ठरविले. जावयाने देखील साथ दिली. त्यासाठी न्यायालयात शपथपत्र दाखल केले. बापाला माफ करावे, बापापासून मला आणि माझ्या नवऱ्याच्या जीविताला कोणताही धोका नाही. उलट, मी गरोदर असल्याने पित्याच्या आधाराची खरी गरज आहे. त्यामुळे बापाला जामिनावर सुटका करण्यास कोणताही आक्षेप नसल्याचे तिने शपथपत्रात नमूद केले. परिणामी, तब्बल तीन महिन्यांनंतर बापाची तुरुंगातून सुटका झाली. या बहुचर्चित प्रकरणात बापातर्फे ज्येष्ठ फौजदारी वकील धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. सिध्देश्वर खंडागळे, ॲड. सुहास कदम, ॲड. वैभव सुतार, ॲड. शिवप्रसाद ढोले काम पाहात आहेत. सिध्दनाथ नगरीपासून सुरु झालेले क्रोधाचे सैराटी वादळ अर्धनारी नटेश्वर नगरीतून पंढरीत आल्यानंतर पूर्णपणे विरून गेले.

लेक बापाला नेहमी म्हणत असते

पाच बोटे अमृताचे, पंचप्राण तुमचे त्यात,

पाठीवरी फिरवा हात, या हो बाबा एकच वेळ !

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (१०४) नम्र विनंती

रा.स्व. संघानी राष्ट्रीय जीवनाचे पुनर्जागरण आणि पुनर्गठन करण्यासाठी संघटित - सजग प्रयत्न केले आहेत. व पुढेही नित्य करणार आहे. मानव कल्याण हा संघाचा आग्रह आहे. त्यासाठी मानव स्वयंसेवक निर्माण करणे हा उद्देश आहे. आणि राष्ट्राचा कायाकल्प घडवून आणणे हा हेतू आहे . संघाच्या माध्यमातून ध्येयपूर्तीचा हा यज्ञ डॉक्टर हेडगेवार यांनी सुरू केला होता. एक करोड पेक्षा जास्त प्रशिक्षित सदस्य; पन्नास लाखापेक्षा जास्त कार्यकर्ते; एक लाखापेक्षा जास्त दैनंदिन शाखा; चाळीस देशांमध्ये हिंदू जनजागरण शाखा; आज कार्यरत आहेत. यापेक्षा जास्त व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. आज सारे RSS विरोधी नकली RSS वर अटॅक करतात. असली आरएसएस ते मुद्दामहून समजून घेत नाही. झोपी गेलेल्या जागे करू शकतो पण झोपेचे सोंग घेतलेल्या जागे करू शकत नाही. आपल्या देशावर अनेक आक्रमणे झाली आणि त्या आक्रांतांनी आपल्यावर राज्य केले. हे कसे शक्य झाले; तर आपल्यामध्ये संघटना नव्हती- सजगता नव्हती. सारे हिंदू भाई भाई न म्हणता हिंदू मुस्लिम भाई भाई चा नारा घुमवून हिंदूंना जास्तीत जास्त असंघटित ठेवले. घाबरून कित्येक हिंदूंनी मुस्लिम धर्म स्वीकारला होता. तरीसुद्धा त्यांच्यात जातीभेदाचे विष पेरण्याचे काम धगधगते ठेवले. हिंदू मुस्लिम एकता बिन स्वराज्य नही हा नारा पण घुमत होता. डॉक्टर हेडगेवार धगधगत्या ज्वालामुखी सारखे जन्मजात देशभक्त होते. आणि तेव्हा त्यांच्या काळात आणि आज सुद्धा देशात भारतमातेसमोर नुसता गोंधळ मांडलेला आहे. तेव्हा हे भारत माते आज तूच आमच्यावर कृपा कर. अधर्म निर्दालूनी धर्मरक्षण कसे करायचे हे आम्हाला शिकव; अशी तुला आम्ही विनंती करत आहोत. महिषासुरदैत्य इथे पुन्हा मातला आहे; तेव्हा त्याचे मर्दन करण्याचा वसा / व्रत सर्वांनी घेण्याचे ठरवू दे. राष्ट्राप्रतीनिष्ठा सगळ्यांच्या मनात जागव. हे भारत माते आज मी तुलाच अशी नम्र विनंती करत आहे.

।। भारत माता की जय ।।

**- क्रमशः**

# हरहर महादेव गर्जनेत दुमदुमला मुंगीघाटाचा डोंगर

## भक्ती शक्तीचे दर्शन, कावडी सोहळ्याने शिखर शिंगणापूर यात्रेची सांगता

### लाखो भाविकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा । विलास भोसले**
**नातेपुते, दि.१० एप्रिल-**

शिंगणापूर येथील शंभू महादेव यात्रेत बूधवारी मुंगीघाटातील कावडसोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. मानाच्या कावडी चढविताना हरहर महादेव गर्जनेत मुंगीघाटाचा डोंगर अक्षरशः दुमदुमून गेला. भक्तीशक्तीचा हा विराट सोहळा पाहण्यासाठी मुंगीघाट परिसरात लाखो भाविकांची उपस्थिती होती. रात्री उशिरा सासवड येथील भुतोजीबुवा तेली यांच्या मानाच्या कावडीने शंभू महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक केल्यानंतर शिखर शिंगणापूर यात्रेची सांगता झाली.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाच्या यात्रेस चैत्र शुद्ध पंचमीच्या दिवशी शिवपार्वती हळदी सोहळ्याने प्रारंभ झाला, त्यानंतर अष्टमीच्या दिवशी शिवपार्वती विवाहसोहळा संपन्न झाला. याचदिवशी शंभू महादेव मंदिर ते बळीच्या मंदिरास मानाचे पागोटे (धज) बांधण्याचा सोहळा मंगलमय वातावरणात पार पडला. नवमीच्या दिवशी धाराशीव जिल्ह्यातील भातांगळी येथील देवाची करवली असलेल्या मानाच्या काठीने शंभू महादेवाचे दर्शन घेतले. तर शुक्रवारी एकादशीच्या दिवशी लाखो शिवभक्तांनी एकादशीचा उपवास धरून महादेवाचे दर्शन घेतले. सायंकाळी इंदोर राजघराण्यातील काळगावडे राजे यांनी घोड्यावरून येऊन दर्शन घेतले.

शिंगणापूर यात्रेत कावड सोहळ्याला विशेष महत्त्व आहे. ही यात्रा संपूर्ण महाराष्ट्रात कावड यात्रा म्हणून ओळखली जाते. शनिवारी द्वादशीच्या दिवशी सकाळपासूनच पुष्कर तलावातील जलतीर्थ घेऊन वाजतगाजत पायरी मार्गाने आलेल्या जवळपास एक हजारहून अधिक कावडींनी जलाभिषेक करून शंभू महादेवाचे दर्शन घेतले. याशिवाय सकाळपासूनच मुंगीघाटातील कावडीसोहळ्याचा थरार रंगला होता. सकाळी ११ वाजलेपासून फलटण, बारामती, इंदापूर, माळशिरस तालुक्यातील लहानमोठ्या कावडी मुंगीघाटातून चढण्यास सुरुवात झाली. त्यानंतर २ वाजल्यापासून सासवड पंचक्रोशीतील सासवड, खळद, शिवरी, बेलसर, एखतपूर, कुंभारवळण आदी ठिकाणच्या मानाच्या कावडी चढविण्यास प्रारंभ झाला. मुंगीघाट डोंगरावरून मानवी हातांची साखळी करून कावडी घेऊन चढविताना भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. हरहर महादेव, म्हाद्या धाव अशी शिवगर्जना करीत कावडीधारक भाविकांनी साहस, श्रद्धा आणि भक्तीशक्तीचे विराट दर्शन घडवून अवजड कावडी घेऊन चार टप्प्यात मुंगीघाट सर केला. रोमहर्षक व नेत्रदीपक असा कावड सोहळ्याचा थरार पाहण्यासाठी घाटमाथ्यावर उपस्थित असलेले लाखो शिवभक्त टाळ्यांचा गजर करत कावडी घेऊन येणाऱ्या भाविकांचा उत्साह वाढवित होते. सायंकाळी साडेसातच्या सुमारास सासवड येथील कैलास काशिनाथ कावडे यांची मानाची कावड मुंगीघाटातून वर चढविण्यात आली. यावेळी उपस्थित असलेल्या लाखो भाविकांनी एकच जल्लोष केला. डोंगर माथ्यावर कावड आल्यानंतर कावडीधारक भाविकांनी ढोलताशांच्या गजरात, गुलालाची उधळण करत, हरहर महादेव शिवगर्जना करीत, फटाक्यांच्या आतषबाजीत, कावडी नाचवून आनंद व्यक्त केला. यावेळी सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने माणचे प्रांताधिकारी उज्वला गाडेकर, पोलीस उपअधीक्षक अश्विनी शेंडगे, सपोनि दत्तात्रय दराडे, तहसीलदार विकास अहिर, गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे, शिंगणापूर सरपंच अनघा बडवे, उपसरपंच राजू पिसे, देवस्थानचे व्यवस्थापक मंदार पत्की यांनी मानाच्या कावडींचे स्वागत केले.



### परीक्षा लांबणीवर गेल्याने भाविकांची संख्या घटली

यावर्षी शिंगणापूर यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांची संख्या घटल्याचे दिसून आले. राज्यभरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या परीक्षा एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होत आहेत. यावर्षी परीक्षा लांबणीवर गेल्याने मराठवाडा, विदर्भातून येणाऱ्या भाविकांची संख्या कमी दिसून आली. उष्णतेच्या लाटेचा फटकाही शिंगणापूर यात्रेला बसला असून उष्णतेच्या झळामुळे भाविक मुक्कामी न थांबता लगेच माघारी फिरत होते. या सर्वांचा परिणाम येथील व्यावसायिकांवर झाल्याचे दिसून आले.

---

## महत्वाचे...



## प्रतिक राऊतचे एमबीबीएस परिक्षेत यश; जिव्हाळा ग्रुपच्या वतीने सन्मान

**करमाळा, दि.१० एप्रिल -**

चिखलठाण (ता. करमाळा) येथील प्रतिक संजय राऊत याने एम.बी.बी. एस. परिक्षेत यश संपादन केले आहे.या यशाबद्दल त्याचा शेटफळ येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने सन्मान करण्यात आला. चिखलठाण तालुका करमाळा येथील प्रतीक संजय राऊत यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, चिकाटी व परिश्रम पूर्वक अभ्यास करून बेंगलोर येथील प्रसिद्ध श्री सिद्धार्था विद्यापीठातून एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले असून या अभ्यासक्रमात करून प्रथम श्रेणीमध्ये येण्याचा मान मिळवला आहे त्याच्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन होत असून सर्वत्र स्वागत केले जात आहे. शेटफळ येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने त्याचा व त्याचे वडील संजय राऊत यांचा सन्मान करण्यात आला यावेळी लोकविकास फार्मर प्रोडूसर कंपनीचे अध्यक्ष वैभव पोळ नानासाहेब साळुंखे, प्रशांत नाईकनवरे, विजय लबडे गजेंद्र पोळ, महादेव पोळ विलास धेंडे उपस्थित होते.

## करकंब ग्रामदैवत श्री कनकंबादेवी यात्रा महोत्सव शनिवारपासून

**करकंब, दि. १० एप्रिल-**



करकंब येथे सालाबादप्रमाणे ग्रामदैवत श्री.कनकंबादेवी यात्रा महोत्सवास शनिवारपासून सुरुवात होत आहे शनिवार दि १२ रोजी पहाटे देवीला अभिषेक व पूजा. सा. ६ वा.गावातुन देवीचा छाबीना व पालखीची वाजत गाजत मिरवणूक कनकंबा मंदिर,एसटी बस स्धानक,धाकटी वेस येथून निघून सोमवार पेठेतील अमरसिंह देशमुख, उजवलसिंह देशमुख यांच्या वाड्यामध्ये देवीच्या पालखीची विधिवत पूजन करण्यात येणार आहे. सोमवार दि.१४ रोजी सा.७ वा.दादा साळुंखे प्रस्तुत सिनेस्टार मृणाल कुलकर्णी यांचा लावण्यखणी कार्यक्रम,मंगळवार दि.१५ रोजी सा.७ वा.आनंद महाजन जळगावकर यांचा लोकनाट्य तमाशा,गुरुवार दि १७ रोजी दुपारी ४ वा.भव्य निकाली कुस्त्यांचा जंगी फडाचे आयोजन ट्रस्ट कमिटी व पंच कमिटीच्यावतीने करण्यात आले असल्याचे अशोकसिंह देशमुख यांनी सांगितले. यात्रा उत्सव यशस्वी करण्यासाठी पंच कमिटीचे अमोल शेळके, बाजीराव खाडे, अजितसिंह देशमुख, पांडुरंग शेटे, शिवाजी सलगर, राजेंद्र खारे, विलास धनवे, शंकर राऊत, भीमराव मदने, संतोष शिंदे आदी परिश्रम घेत आहेत. या यात्रेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन भाजलिंग रामचंद्र देशमुख यांच्यातर्फे करण्यात येणार आहे.



## हत्तूर जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**हत्तूर, दि.१० एप्रिल-**

हत्तूर (ता.दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद शाळेला १२५ वर्षे पूर्ण झाल्याने शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच राजेंद्र कुलकर्णी होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी प्रा. भिमाशंकर व्हनमाने, शिक्षक नेते विरभद्र यादवाड, केंद्रप्रमुख नागनाथ स्वामी आदी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. मान्यवरांच्या हस्ते हवेत फुगे सोडून उदघाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतरामायण, शेतकरीगीत, भीमगीत, कवाली, कोळी गीतावर आधारीत नृत्याविष्कार सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी केंद्रप्रमुख आमसिध्द म्हेत्रे, प्रा.सिद्धाराम म्हेत्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आमगोंड़ा हिरकुर, बनसिद्ध पटेवडियर, राजशेखर भरले, सिद्धाराम पाटील, विकास पाटील, मल्लीनाथ पुजारी, कांतप्पा पावटे, राजशेखर पाटील, महादेव ममदापुरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमास श्रीकांत भरले, राघवेंद्र पाटील, विश्वनाथ पाटील, सोमनाथ वाघमोडे, अस्लम शेख, सिकंदर नदाफ यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक सिद्धाराम गुरव, शशिकांत चव्हाण, चिन्नया स्वामी, सतिश राठोड, अंकुश माळी, श्रीमती अंजली वठारे, स्मिता मुराळी, कविता अंबिगार, गेजगे, प्रतिभा चिट्टे, भालेराव, शोभा काटकर आदींनी परिश्रम घेतले.

## औरादची मल्लिकार्जुन यात्रा उद्यापासून; विविध धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. १० एप्रिल -**



औराद (ता.दक्षिण सोलापूर) येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेस उद्या शनिवारपासून प्रारंभ होत आहे. चार दिवस या यात्रेत विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष लिंगराज पाटील यांनी दिली. शनिवार १२ एप्रिल रोजी सकाळी औराद व इंदिरानगर येथील हनुमान मूर्तीस अभिषेक करून जयंती साजरी करण्यात येईल. दुपारी यल्लम्मा देवी अक्षता सोहळा होईल. श्री सिध्दनाथ देवाची यात्रा होऊन संध्याकाळी ८ वाजता गावातील सर्व देवतांना तैलाभिषेक होणार आहे. रविवारी १३ एप्रिलला रात्री ८ वाजता श्री महादेव मंदिरापासून कलश मिरवणूक निघेल. रात्री १० वाजता कलगीतऱ्याच्या गाणी होतील. पालखी व नंदीध्वज मिरवणुकीने मंदिरात 'श्रीं' चे आगमन हाईल. दि. १४ एप्रिलला दिवसभर 'श्रीं'च्या चरणी नैवेद्य व दंड नमस्कार होतील. मंगळवार, १५ एप्रिल रोजी सकाळी कलगीतुऱ्याची मैफिल रंगणार असून दुपारी ३ ते ६ नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचे मैदान होणार आहे. महादेव गणेश तरूण मंडळातर्फे महाप्रसाद दिला जाणार आहे. रात्री १० वाजता 'गंडन आज्ञे अर्थात गंडनमान मगनप्राणा' हे कन्नड सामाजिक नाटक सादर करण्यात येणार आहे.

---



## विधवा महिलेस उदरनिर्वाहासाठी दिली पिठाची गिरणी

### सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानचा पुढाकार

**सांगोला, दि.१० एप्रिल-**

तिप्पेहळी (ता.सांगोला) येथील सचिन नरळे यांचे गेल्या महिन्यात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, आई, दोन लहान मुले असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पत्नी मनिषा नरळे याही आजारी असतात. त्यांना आजारपणाच्या खर्चासाठी सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने नरळे कुटुंबीयांना उदरनिर्वाहासाठी छोटीशी मदत म्हणून पिठाची गिरणी भेट देण्यात आली.

तिप्पेहळी येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन या कुटूंबास वेळोवेळी मदतही केली आहे. सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने नरळे कुटुंबीयांना उदरनिर्वाहासाठी ही छोटीशी मदत म्हणून पिठाची गिरणी मनोज उकळे यांच्या हस्ते भेट देण्यात आली. उद्योगपती किरण पांढरे यांनीही नरळे कुटुंबीयांना रोख ५ हजार रुपयांची मदत देऊन सहकार्य केले. तसेच यापुढेही नरळे कुटुंबीयांना मदत करू असे सांगितले. यावेळी आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, अरविंद केदार, शशिकांत येलपले, अनिल विभुते, अरविंद डोंबे, रमेश गोडसे, प्रसन्न कदम, महादेव दिवटे, प्रमोद दौंडे, पोलीस पाटील राजू करांडे, विश्वनाथ सांगोलकर, प्रा.दत्तात्रय नरळे, पांडुरंग बजबळकर, सुहास माने, उदय नरळे, किरण मोरे आदिसह नरळे

## श्री गणपती फार्मसी महाविद्यालयात एम. फार्मसी अभ्यासक्रमास मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. १० एप्रिल-**

अकोले खुर्द, तालुका माढा येथील श्री गणपती फार्मसी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५- २६ पासून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (झउख), नवी दिल्ली यांच्याकडून एम. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवानगी मिळाली असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यांनी दिली. एम. फार्म (फार्मास्युटिक्स) आणि एम. फार्म (फार्माकॉलॉजी) या दोन विषयांसाठी सदर मान्यता मिळाली आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहेत. प्रत्येक विभागात १५ जागा असतील. गणपती फार्मसी महाविद्यालय हे सोलापूर जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय आहे जिथे एम. फार्म (फार्माकॉलॉजी) चा अभ्यासक्रम सुरू होत आहे.

एम. फार्मसी अभ्यासक्रमास परवानगी मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एम. फार्म पदवी मिळविण्याची संधी मिळेल आणि फार्मास्युटिकल इंडस्ट्रीमध्ये उच्च पदांसाठी नोकरी तसेच संशोधन करण्याची संधीं प्राप्त होईल अशी माहिती संस्थेचे सचिव डॉ.आर. डी. बेंदगुडे यांनी दिली. जिल्ह्यातच उच्च दर्जाचे शिक्षण मिळण्याची सोय झाल्याने विद्यार्थ्यांना इतर शहरांना धाव घ्यावी लागणार नाही. तसेच महाविद्यालयातील शिक्षकांना सुद्धा त्यांच्या पीएचडी करिता निमल स्टडी करायचा असल्यास येथेच तो कमी खर्चामध्ये करता येईल. संस्थेच्या सुविधा, अनुभवी शिक्षक आणि आधुनिक प्रयोगशाळा यामुळे विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळेल असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे यांनी दिला. यावेळी डॉ. सचिन सकट, डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शिवराज ढगे व प्रा. शैलेश पेंदोर उपस्थित होते

---

## बार्शीचे डॉ. राहुल पालके यांचे जीवन जगूया हसत खेळत या विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० एप्रिल -**

बालमनांवर योग्य संस्कार झालेत तर ही मुले देशाचे भविष्य घडवू शकतात. या कोवळ्या मनांना प्रफुल्लित करुन त्यांच्याबरोबर निरागस जगले पाहिजे. बालमनांना घडवण्यासाठी लहान होता आले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. राहुल पालके यांनी केले. विवेकानंद संस्कार केंद्र कन्याकुमारी अंतर्गत बार्शी शाखेत आयोजित केलेल्या 'जीवन जगूया हसत खेळत' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी विवेकानंद संस्कार केंद्र बार्शीचे प्रमुख विनोद कबाडे, दत्तात्रय लिंगरे, निलेश कोटकर हे उपस्थित होते. डॉ. पालके यांच्या शाब्दिक कोटी ऐकून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलत होते. गणिताच्या पाठाला एक मुलगा झोपला होता. सरांनी विचारले असता तो म्हणाला, कालचाच झोपाळाच बरा होता . भूगोलाच्या तासाला पृथ्वी गोल आहे. असे एकजण म्हणाला, चपटे सर मात्र ती चपटी आहे असे कपटींना म्हणाले ... विद्यार्थ्यांना या मार्गदर्शनातून त्यांनी त्यांच्या आवडत्या विषयात चांगल्या पद्धतीने कसे यश मिळवायचे हे त्यांनी सांगितले. भाषा,गणित,भूगोल इतिहास, सामान्य विज्ञान, परिसर अभ्यास या विषयातील विनोदी किस्से सांगत त्यांनी बालमनांना प्रफुल्लित केले. हसत खेळत शिक्षण ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर मुलांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी दिली पाहिजे असल्याचे असे मत याप्रसंगी त्यांनी मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले कबाडे यांनी हे संस्कार केंद्र सन २००९ पासून बार्शीत अविरतपणे कार्य करत असून त्याद्वारे मुलांच्या शारीरिक, बौद्धिक व आध्यात्मिक प्रगतीचा विचार अग्रस्थानी आहे, असे सांगितले.

## शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत विविध उपक्रमाचा लाभ घ्या

### तहसीलदार शेख यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० एप्रिल**

महाराष्ट्र शासनामार्फत १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत विविध उपक्रम राबवले जात आहेत. याचा बार्शी तालुक्यातील सर्व पात्र शेतकरी खातेदार यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार एफ.आर. शेख यांनी केले आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम ४२ ब, क, ड अंतर्गत पात्र खातेदार यांना अकृषीक परवानगी देण्याची प्रक्रीया मोहिम स्वरुपात सुरु करणेत आलेली आहे. सदर संहितेच्या कलम ४२ ब अंतर्गत मंजुर अंतिम विकास परवानाधारक यांना ग्राम महसूल अधिकारी यांचेमार्फत नोटीस बजावणी चालू आहे.

नोटीस प्राप्त होताच नोटीसीत नमुद अकृषीक व रुपांतरीत कर शासनास जमा केले नंतर त्यांना अकृषीक परवानगी देण्यात येत आहे. तसेच ४२ ड अंतर्गत संबंधित गावच्या गावठाण हद्दीपासुन २०० मीटर क्षेत्रामध्ये येणाऱ्या खातेदार यांना संबंधित गावच्या ग्राम महसूल अधिकारी यांचेमार्फत नोटीसा बजावणी सुरु आहे. नोटीस प्राप्त होताच नोटीसीत नमूद अकृषीक व रुपांतरीत कर शासनास जमा केले नंतर त्यांना कॅम्प आयोजित करुन सनद वाटप करणेत येणार आहे. तसेच ७/१२ उताऱ्यावरील पोट खराब क्षेत्र वहितीखाली आले असल्यास सदर क्षेत्राचे लागवड लायक क्षेत्रामध्ये रुपांतरीत करणेची मोहीम सुरु आहे. याबाबत शेतकरी खातेदार यांनी ग्राम महसूल अधिकारी/मंडळ अधिकारी यांचेशी संपर्क साधुन पोट खराब क्षेत्र लागवड लायक क्षेत्रामध्ये रुपांतरीत करणेबाबत अर्ज करावा. जिवंत ७/१२ मोहिमेअंतर्गत मयत खातेदार यांचे वारस नोंद ७/१२ वरती करणेची मोहीम सुरु करणेत आली असुन आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे वारस नोंदीबाबत अर्ज सादर करावे. या मोहिमेचा जास्तीत जास्त खातेदार यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## मंगळवेढ्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांनी मराठीचा वापर करावा : शहराध्यक्ष हजारे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१० एप्रिल-**

मंगळवेढा शहरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांमध्ये आरबीआयच्या नियमाप्रमाणे मराठी वापरणे अनिवार्य आहे. मराठी वापर न झाल्यास मनसे स्टाईल आंदोलनाचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मंगळवेढा शहराध्यक्ष दत्तात्रय (राजवीर) हजारे यांना दिला आहे.

याबाबतचे निवेदन शहरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांना महाराष्ट्र नविनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष श्रीकांत जाधव, विद्यार्थी सेना तालुकाध्यक्ष रवी कोरे, शेतकरी सेनेचे सरचिटणीस प्रवीण कोंडूभैरी, नवनिर्माण वाहतूक सेना शहराध्यक्ष कृष्णा ओमणे, विद्यार्थी सेना उपाध्यक्ष आदित्य क्षीरसागर, श्री. चव्हाण व सोमनाथ कदम आदी उपस्थित होते.



महाराष्ट्रात मराठीचा वापर सर्व राष्ट्रीयकृत बँकांमध्ये होत नसून येणाऱ्या सर्व ग्राहकांना बँकांच्या स्लिप चेक देवाण-घेवाण सर्व हिंदी व इंग्रजी मध्ये आहे. त्यामुळे आपली मराठी भाषा कुठेतरी संपत चाललेली आहे त्यामुळेच गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे मंगळवेढा शहरातील राष्ट्रीयकृत बँकांना निवेदन देण्यात आले.

यापुढे बँकातील सर्व व्यवहार व बँकातील बँकांचे कर्मचारी यांनी मराठी येत नसेल तर मराठी शिकून घेतलं पाहिजे अशी तंबी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सर्व राष्ट्रीयकृत बँकांना दिली. यापुढे आपल्याकडून मराठी वापरली गेली नाही तर आम्ही आमच्या मनसे स्टाईलने आपणास मराठीचा वापर कसा करावा हे दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही आपल्याच महाराष्ट्रात आपल्याच भाषेसाठी लढावं लागतं याची खंत आम्हाला आजही वाटते. यापुढे सर्व बँकांना निवेदन दिले जाणार नाही डायरेक्ट ॲक्शन होणार. पहिला मान मराठीचा असणार. मंगळवेढ्यातील सरकारी कार्यालय असो राष्ट्रीय उद्यान असो अन्य कोणताही मराठी पाठांचा विषय असो मंगळवेढ्यात इंग्लिश अक्षर खपवून घेतलं जाणार नाही. हे सर्व मंगळवेढ्यातील सरकारी व निमसरकारी यांनी मराठीचा वापर हा आपल्याकडून झाला पाहिजे याची काळजी घ्यावी असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनी दिला आहे.

## पैशाच्या कारणातून दोघांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील मानेगावात पैशाच्या कारणातून महिलेसह दोघांना मारहाण करण्यात आली. ही मारहाण बुधवारी रात्री १०.३० वाजता झाली. सुरज धनाजी माने (वय २५) व साळुबाई चंद्रकांत माने (वय ७० दोघे रा. मानेगाव ता. बार्शी) अशी मारहाण करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. लक्ष्मण काळे व सेस्तर काळे यांच्याबरोबर सुरज व साळूबाई यांचा आर्थिक व्यवहार आहे. या व्यवहारातून लक्ष्मण व सेस्तर यांनी अज्ञात वस्तूने व लाथाबुक्क्यांनी त्यांना मारहाण केली. यात सुरज याच्या पाठीला जखम झाली आहे. तसेच सर्वांगास मुक्कामार लागला आहे. त्याचबरोबर साळूबाई यांना सर्वांगास मुकामार लागल्याने वैराग येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ शंकर यांनी गुरुवारी रात्री सव्वा दोन वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.



## नियमांचे पालन करून डॉ. आंबेडकर जयंती साजरी करा

### सपोनि मनोज पवार; मंद्रुपमध्ये बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करताना सर्व उत्सव मंडळानी शासनाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मंद्रूप पोलीस ठाणे हद्दीमधील शांतता समिती सदस्य, जयंती मंडळे, पोलीस पाटील यांची पोलीस ठाणे येथे बैठक घेण्यात आली.यावेळी सपोनि पवार बोलत होते. यावेळी सपोनि पवार पुढे म्हणाले कि, जयंती मंडळांनी मिरवणुकीसाठी पोलिसांकडून पूर्वपरवानगी घ्यावी. ध्वनिप्रदूषण मर्यादा नियमांचे पालन करावे. समाजात तेढ निर्माण होणाऱ्या भडकावू, द्वेषपूर्ण, सामाजिक किंवा धार्मिक भावना दुखावणारा मजकूर, बॅनर, घोषणाबाजी किंवा गाणी वाजवू नये. मिरवणूक मार्गावर व कार्यक्रमस्थळी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे व स्वयंसेवकांची नेमणूक करावे. अनुचित घटना घडल्यास आयोजक यांना जबाबदार धरून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जयंती उत्सव शांततेत पार पडण्याची जबाबदारी जयंती मंडळाचे पदाधिकारी यांची असेल असेही पवार म्हणाले. यावेळी पोलीस ठाणे हद्दीमधील सर्व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## राजर्षी शाहू लॉ कॉलेज बार्शी येथील दोघांची न्यायाधीश पदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० एप्रिल-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित राजर्षी शाहू लॉ कॉलेज, बार्शीमधील समाधान गुंड व विशाल कवडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षेत वर्ग एकचे दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर व प्रथम न्यायदंडाधिकारी पदी नुकतीच निवड झाली आहे. त्यांनी कायद्याचे शिक्षण राजर्षी शाहू लॉ कॉलेज, बार्शी येथून पूर्ण केले होते.





समाधान गुंड हे बृहन्मुंबई महानगरपालिका येथे सहाय्यक कायदा अधिकारी वर्ग- १ या पदावर ते २०२४ पासून कार्यरत होते तर विशाल कवडे हे सहाय्यक विधी अधिकारी विधी व न्याय महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई येथे २०२४ पासून कार्यरत होते.

वरील दोघांनीही प्रतिकूल परिस्थिती असतानाही हे यश संपादन केले आहे. वरील दोघांनाही कॉलेजमधील प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे व कॉलेजमधील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले होते.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी, पी. टी. पाटील, जॉईंट सेक्रेटरी अरुण देबडवार व खजिनदार जयकुमार शितोळे तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे व कॉलेजमधील सर्व प्राध्यापक यांनी समाधान गुंड व विशाल कवडे यांचे अभिनंदन केले.

## महत्वाचे...



### श्री मल्लिकार्जुन यात्रेच्या धार्मिक कार्यक्रमाची नंदीध्वज पूजनाने सुरूवात

**जन्मेजयराजे व अमोलराजे भोसले यांच्या हस्ते झाले पूजन**

**अक्कलकोट : दि १० एप्रिल**

अक्कलकोट येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा उत्सवानिमित्त पहिल्या दिवशीच्या धार्मिक कार्यक्रमात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांनी बुधवारी मानकरी रोडगे, नंदिकोले या मानकऱ्यांच्या घरासमोर नंदीध्वजाची विधीवत पूजा करून दर्शन घेतले. दरम्यान मंगळवारी ८ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता नंदीध्वज काठ्यांच्या संवाद्य मिरवणुकीने यात्रा उत्सवाला प्रारंभ करण्यात आला. सलग पाच दिवस सदर पाच मानकऱ्यांच्या घरासमोरून नंदीध्वजाची विधीवत पूजा करून नंदीध्वज काट्यांची सवाद्य मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गावरून काढण्यात येते. १२ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३५ मिनिटांनी रथोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे.



### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात व्याख्यान संपन्न

**बार्शी, दि.१० एप्रिल-**


येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदीप बोधले यांचे विविध स्पर्धा परीक्षांची तयारी यामधील मराठी व्याकरण विषयाचे महत्व याविषयावर मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दीपक गुंड होते. यावेळी किरण बोधले हे उपस्थित होते.



### कुर्डुवाडी येथे चित्तोडगड प्रतिज्ञा मुक्ती दिवस साजरा

**कुर्डुवाडी, दि. १० एप्रिल-**

कुर्डुवाडी येथे गाडोलिया घिसाडी समाजाच्यावतीने ६ एप्रिल चित्तोड प्रतिज्ञामुक्ती दिवस महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी या महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गणपत पवार यांच्या हस्ते झाले. या महोत्सवाचे अध्यक्षस्थान दिगंबर चव्हाण जालना यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मंगेश सिताराम सोळंके मुंबई यांनी आपल्या पूर्वजांचा त्याग, बलिदान आणि मूळस्थान इतिहास विसरू नका आणि भविष्य निर्माण केल्याशिवाय राहू नका असे समाजाला आवाहन केले. सुरेश साळुंके सातारा यांनीही मार्गदर्शन केले. अशोक पवार मुंबई युवा अध्यक्ष यांनी युवा संघटन मजबूत करण्यासाठी राज्यातील तमाम युवा यांनी सोबत यावे असे आवाहन केले. प्रास्ताविक पवन प्रल्हाद यांनी तर आभार विष्णू पवार यांनी मानले.



### मोडनिंब भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त पालखी सोहळा

**मोडनिंब, दि.१० एप्रिल-**

मोडनिंब (ता.माढा ) येथील प्राचीन १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, मुनीसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदिर यांच्या वतीने महावीर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.शहरातून भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त पालखी सोहळा मिरवणूक काढण्यात आली. मंदिर परिसर आकर्षक फुलांनी सजवण्यात आला होता. सकल जैन समाजाच्या प्रभातफेरीत अहिंसा परमो धर्म की जय, महावीर भगवान की जय अशा घोषणा देण्यात आल्या. पालखी सोहळ्यात सर्व जैन श्रावक आणि श्राविका सहभागी झाले होते. राजवाडा सभागृह येथे राहुल शहा यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत कार्यालयात प्रतिमापूजन झाले. यावेळी सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. सात वाजता पाळण्याचा कार्यक्रम झाला. पाळणा सोहळ्याने जन्मकल्याणक उत्सवाची सांगता झाली. हा जन्मकल्याणक उत्सव पार पाडण्यासाठी सखुबाई रामचंद्र ट्रस्टचे सारंग शहा, विशाल मेहता, राहुल शहा, प्राजक्त शहा, राजकुमार शहा, बाहुबली दोभडा,प्रितम शहा, अजित खडके ,निलेश गुरसाळकर, क्षितिज शहा ,रत्नदीप मेहता, बाळू गुरसाळकर, संजय शहा, संकेत पूरवत, सिद्धांत गांधी, प्रेम गांधी आदींनी परिश्रम घेतले.

## अकलूज येथे भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० एप्रिल-**

अहिंसा परमो धर्माची शिकवण देणारे जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर श्री भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक महोत्सव अकलूज परिसरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा झाला.





सकाळी विसाहूमड दिगंबर जैन मंदिर व ट्रस्ट यांच्यावतीने शिवापूर पेठेतील जैन मंदिरातून वाजत गाजत भगवान महावीरांचा रथ व पालखी ग्रामप्रदक्षणा साठी निघाली. यामध्ये श्रावक, श्राविका हजारोंच्या संख्येने जैन समुदाय सहभागी झाला होता. पालखीचे ९ वाजता मंदिरात आगमन झाले.या वेळी समाजाचे अध्यक्ष इंद्रराज दोशी यांनी सर्वांचे स्वागत केले. मंदिरामध्ये भगवान महावीरांच्या मूर्तीस बाहुबली गांधी व सौ. मुग्धा गांधी यांच्या हस्ते पंचामृत अभिषेक होऊन दुपारी सन्मती ग्रुपच्या वतीने महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. तर सायंकाळी सुमती महिला मंडळाच्या वतीने भगवान महावीराचा जन्मोत्सव सोहळा संपन्न होऊन व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमही पार पडले. संग्रामनगर येथील गुमास्ता कॉलनी येथे सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीरांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळी आठ वाजता भगवान महावीरांची प्रतिमा असलेली पालखी संग्रामनगर परिसरातून वाजत गाजत निघाली. यावेळी श्रावक, श्राविकांनी भगवान महावीरांचा जयघोष केला. येथे भगवान महावीरांच्या मूर्तीला सागर भालेराव व सौ पूजा भालेराव यांच्या हस्ते पंचामृत महाभिषेक करण्यात आला. यानंतर समाजाच्या वतीने उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन ही करण्यात आले. सायंकाळी महिलांनी भगवान महावीरांचा जन्मसोहळा साजरा केला.बागेचीवाडी येथील श्री नवदेवता दिगंबर जैन मंदिरात सकाळी ७ वाजता भगवान महावीरांच्या मूर्तीस पंचामृत अभिषेक मंदिर समितीचे अजित गांधी व सौ. वसुमती गांधी यांच्या हस्ते करण्यात आला. संग्रामनगरच्या भगवान आदिनाथ दिगंबर जिनालय व स्वाध्याय भवन या मंदिरात प.पू. सुव्रता माताजी यांचे प्रवचन झाले. तर सायंकाळी वितराग विज्ञान पाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## वर्धमान महावीर यांची शिकवण आचरणात आणणार

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात 'रासेयो' च्या स्वयंसेवकांनी घेतली शपथ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० एप्रिल-**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर वर्धमान महावीर यांनी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह अशी पाच तत्वे सांगितली. त्यांनी दिलेली ही शिकवण आयुष्यभर आचरणात आणणार अशी शपथ कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी घेतली.




महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात वर्धमान महावीर जयंती निमित्त रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार यांनी स्वयंसेवकांना ही शपथ दिली. मुक्या प्राण्यांची हिंसा करणार नाही, नेहमी सत्य बोलेन, संदर्भ ग्रंथाचे वाचन करून शाश्वत ज्ञान प्राप्त केले जाईल अशी शपथ स्वयंसेवकांनी उस्फूर्तपणे घेतली.

**विद्यार्थ्यांचा सामाजिक प्रसार माध्यमाला उत्स्फूर्त प्रतिसाद**

कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार यांनी वर्धमान महावीर जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाची अहिंसा शपथ सामाजिक प्रसार माध्यमावर प्रसारित केली त्यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, बालाजी कांबळे, महेश जोगदे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, मल्लिकार्जुन मसुती, विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा व प्राचार्य डॉ एस. आर. लोखंडे यांनी कौतुक केले.

## करमाळा तालुक्यातील जेऊर पोस्ट ऑफिसला आग

**सर्व कागदपत्रे वस्तू जळून खाक, जिवीतहानी नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१० एप्रिल-**

जेऊर (ता.करमाळा) येथील पोस्ट ऑफिसला आज दि.१० एप्रिल रोजी दुपारी अचानक आग लागली. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी जेऊर मेन पोस्ट ऑफिस मधील सर्व पोस्टाचे साहित्य आगीत जळून खाक झाले.



यामध्ये पोस्टाची सर्व महत्त्वाची कागदपत्रे, संगणक, विविध पत्रे, पार्सल वस्तू, बँकांची कागदपत्रे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. काल पोस्ट ऑफिसला महावीर जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी असल्याने कर्मचारी ऑफिसमध्ये नव्हते. त्यामुळे जीवित हानी झाली नाही मात्र महत्त्वपूर्ण दस्तऐवज नष्ट झाल्याने पोस्ट ऑफिसचे प्रचंड नुकसान झाले आहे. आगिने रुद्ररूप धारण करताच करमाळा नगरपरिषदेची अग्निशमन दलाची गाडी बोलवण्यात आली व स्थानिक नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. तोपर्यंत संपूर्ण पोस्ट ऑफिस जळून खाक झाले होते. छतावरून धुरांचे लोट दिसत होते. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू होता. मात्र ही आग का लागली याचे तर्क-वितर्क व्यक्त केले जात असले तरी आग लागण्याचे कारण समजू शकले नाही.

## अन्नछत्र मंडळाच्या परिसरात श्रींच्या पादुकांची प्राणप्रतिष्ठाना

**जन्मेजयराजे व अमोलराजे भोसले यांची उपस्थिती**



**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट : दि १० एप्रिल**

पश्चिम महाराष्ट्रात ग्राम अभियान टिम आगाशिव नगर शहर कराड यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिर येथे श्रींच्या पादुकांचा प्राण प्रतिष्ठा सोहळा व श्री समर्थ दत्त याग संपन्न झाला. या कार्यक्रमात एक हजार दोनशे महिला सहभागी झाल्या होत्या.

दरम्यान श्रींच्या पादुका प्राण प्रतिष्ठा सोहळा, श्री समर्थ दत्त याग, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते महाआरती, महाप्रसाद या नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्रात ग्राम अभियान टिम आगाशिव नगर शहर कराड यांच्या वतीने भोसले पिता-पुत्रांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन पश्चिम महाराष्ट्रात ग्राम अभियान टिम आगाशिव नगर शहर कराड यांचे प्रतिनिधी राजेश पवार यांनी केले. विविध धार्मिक कार्यक्रम पुरोहितांच्या हस्ते संपन्न झाला.

## भगवंत आपल्या जवळ व आपल्या हृदयातच : हभप घाणेकर

**टेंभूर्णीत कीर्तन संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१० एप्रिल-**

कस्तुरीमृग सुगंधाच्या शोधार्थ सर्वत्र फिरतो. परंतु त्यास माहीत नसते की,सुगंध आपल्याजवळच आहे. तदवत भगवंत आपल्या जवळ व आपल्या हृदयात असतो. पण आपल्याला त्याची माहिती नसते.आपण आपल्या विषय वासनेत गुंतलेलो असतो असे प्रतिपादन हभप सुखदा मुळ्ये-घाणेकर महाराज (पनवेलकर) यांनी केले.



कीर्तन सेवा आरती व अभय देशपांडे यांनी पार पाडली.तर अन्नदानसेवा धनाजी चोरमले यांनी केली.हभप विनायक टल्लू यांनी हार्मोनियम वादन केले तर तबला वादन अमोल सितारे यांनी केले.या कार्यक्रमास शहरातील महिला व पुरुष भाविकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

टेंभुर्णी येथील श्री विष्णू मंदिरात चैत्र शु. द्वादशीनिमित कीर्तन झाले. त्यावेळी हभप सुखदा मुळ्ये-घाणेकर महाराज बोलत होत्या. देशाला देव मानून सेवा केली पाहिजे असेही त्यांनी सांगितले. त्यांनी यावेळी सुंदर दृष्टांत दिले. यामुळे उपस्थित मंत्रमुग्ध झाले. सीमेवरील सैनिकाप्रति ही त्यांनी सहृदयता जपली.

कीर्तनाची सांगता रघुपती राघव राजाराम...हेचि दान देगा देवा..श्री गणेश वंदना..वंदे मातरम् व श्री गणेश आरतीने झाली.शेवटी सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आला.

## तामलवाडीच्या श्री विष्णू-महादेव यात्रा पुरवणीचे शानदार प्रकाशन!

**हनुमान जयंतीदिवशी होणार यात्रेची सांगता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील ग्रामदैवत श्री विष्णू-म हादेव यात्रा सोहळ्यानिमित्त आज यात्रेच्या मुख्य दिवशी हजारो भाविकांनी श्रींच्या दर्शनासाठी मंदिरात रीघ लावली आणि श्रींच्या चरणी नतमस्तक झाले. सायंकाळी कुस्त्याचा जंगी फड रंगला. दरम्यान, शुक्रवार, दि. ११ मार्च रोजी सायंकाळी श्रींची पालखी मिरवणूक होवून हनुमान जयंतीदिवशी यात्रेची सांगता होणार आहे. दरम्यान, श्री विष्णू महादेव यात्रेनिमित्त सोलापूर तरुण भारतच्या वतीने काढलेल्या पुरवणीचे प्रकाशन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात आणि शानदारपणे पार पडले.



या प्रकाशन सोहळ्यासाठी सोलापूर तरूण भारतचे समुह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, व्यवस्थापक विनायक पुला, मराठवाडा आवृत्तीप्रमुख राजाराम मस्के, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी यांच्यासह श्री विष्णू-महादेव यात्रा समितीचे अध्यक्ष शाहीर गायकवाड, उपाध्यक्ष इंद्रजित घोटकर, सचिव ज्ञानेश्वर माळी, सहसचिव सुधाकर लोंढे, उपसरपंच सुधीर पाटील, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजी गायकवाड-पाटील, ग्रामसेवक चैतन्य गोरे, माजी सैनिक मारूती पाटील, सरस्वती विद्यालयाचे अध्यक्ष बसवणप्पा मसुते, प्रवचनकार विनायक पाटील, सोसायटीचे माजी चेअरमन शिवदास पाटील, सरस्वती विद्यालयाचे सहशिक्षक महादेव मसुते, शिवरत्न चॅनलप्रमुख सर्जेराव गायकवाड, सचिन शिंदे, सुनील पाटील, नागनाथ मसुते, ज्ञानेश्वर पाटील, बबन राऊत यांच्यासह स्थानिक मान्यवरांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन सहशिक्षक सिध्देश्वर मसुते यांनी केले.

या यात्रेनिमित्त पहिल्या दिवशी कावड मिरवणूक सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. यानंतर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. तर आज दि. १० एप्रिल रोजी शेरण्याचा यात्रेतील मुख्य कार्यक्रम पार पडला आणि यात्रा विशेष पुरवणी सोहळाही उत्साहात पार पडला. येथील श्री विष्णू-महादेवाचा महिमा तसा अगाधच आहे. या मंदिरात श्री विष्णू अन् महादेवाची स्वयंभू पिंड एकत्र आहे. या यात्रा काळात धार्मिक विधी, पारंपरिक कार्यक्रम पार पडतात. आज शेरण्या कार्यक्रमानिमित्त अनेक लोकांनी श्रींच्या मंदिरात येवून आपले नवस पार पाडले आणि महाप्रसाद वाटप केला. महाप्रसादात नारळ, पेढे, चुरमुरे, लाडू आदींचा समावेश असतो. या सोहळ्यासाठी मंदिरात मोठी गर्दी दिसून आली. पहाटे श्रींची महापूजा झाल्यापासून दर्शनाला

**हजारो भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन**

सुरूवात झाली आणि रात्री उशिरापर्यंत भाविकांची गर्दी दिसून आली. यासाठी तामलवाडी पंचक्रोशीच नाही तर धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील अनेक भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते.

प्रतिवर्षी चैत्र शु. एकादशीला मानकरी पांडुरंग विभुते यांच्या घरून श्रींची पालखी टाळ, मृदंगाच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी अन् शिवा पार्वते हरऽऽ हर महादेव अशा नामघोषात निघते आणि पुढील चार दिवस पालखीतील देव श्री विष्णू-महादेवांच्या मंदिरात वास्तव्यास आले आहेत. द्वादशीला ग्रामदैवतांच्या कावडीची मिरवणूक निघाली. गुरूवारी शेरण्या दिवशीच दुपारनंतर जंगी कुस्त्यांचा फड भरविला. पंचक्रोशीतील अनेक मल्लांनी या कुस्त्यात सहभागी होवून आपली कसब व कौशल्य दाखविले. उद्या दि. ११ मार्च रोजी सायंकाळी श्रींचा पालखी सोहळा मिरवणूक रात्रभर असते आणि हनुमान जन्मोत्सव साजरा झाल्यानंतर यात्रेची सांगता होते.